
# श्रीमहिपति ताहराबादकर

## आणि इतर संत

१९६०

म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १२८०



REFBK-0010974

चरित्र माला

# महिपति ताहराबादकर व इतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: चरित्र
क्रमांक ... नों: दि:

संतचरित्र माला : ११

श्री. ग. दे. खेर

मूल्य सव्वा रुपया

REFBK-0010974

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

**संतचरित्र माला : ११**

श्री : २७२

© १९६०
वोरा अॅण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई

आवृत्ती पहिली
१९६०

मूल्य रु. १-२५

पृष्ठसंख्या ८४

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

मुद्रक :
गो. य. हिरवे
साथीदार प्रिंटर्स
२५२ नारायण पेठ,
टिळक रोड, पुणें २

*संतचरित्र-माला*

१. **श्रीवासुदेवानंद सरस्वती अर्थात् टेंबेस्वामी**
२. **श्रीगजानन महाराज**–शेगांव
३. **श्रीमाणिकप्रभु**–माणिकनगर
४. **श्रीबीडकर महाराज**–पुणें
५. **श्रीगुलाबराव महाराज** वऱ्हाड
६. **श्रीगुप्ते-गजानन महाराज** नाशिक
७. **श्रीसिद्धारूढ स्वामी**–हुबळी
८. **श्रीअक्कलकोट स्वामी**
९. **श्रीगोंदवलेकर महाराज**
१०. **श्रीमाधवनाथ महाराज**–इंदूर
११. **महिपति ताहराबादकर इ.**

महाराष्ट्रांतील अलीकडच्या काळांतील अशीं अनेक श्रेष्ठ संतांचीं चरित्रें

**मूल्य प्रत्येकीं रु. १-२५**

तसेंच महाराष्ट्रांतील आधुनिक विद्यमान संतश्रेष्ठ
**श्रीमत् प.प.श्रीधरस्वामीमहाराज**
यांचें चरित्र : पहिला भाग : साधना
**मूल्य रु. १-५०**

# संतांचिया गांवीं

संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ ।

नाहीं तळमळ दुःखक्लेश ॥१॥

तेथें मी राहीन होऊनि याचक ।

घालितील भीक तेचि मज ॥२॥

संतांचिया गांवीं वरो भांडवल ।

अवघा विठ्ठल धन वित्त ॥३॥

संतांचें भोजन अमृताचें पान ।

करिती कीर्तन सर्वकाळ ॥४॥

संतांचा उदीम उपदेशाची पेठ ।

प्रेम सुख सांटी घेती देती ॥५॥

तुका म्हणे तेथें आणिक नाहीं परी ।

म्हणोनि भिकारी झालों त्यांचा ॥६॥

१. महिपति ताहराबादकर
२. अमळनेरचे सखाराम महाराज
३. नाशिकचे यशवंतराव महाराज
४. जळोजी आणि मळोजी

## उपोद्घात

* * * *

या संतचरित्रमालेंतील चरित्रें नगर जिल्ह्यांतील समशेरपूरचे कै. ह. भ. प. विनायकबुवा शालिग्राम यांच्या 'नूतन संतचरित्र' या प्रासादिक व रसाळ ओवीबद्ध ग्रंथावर प्रामुख्यानें आधारलेलीं आहेत. अर्थात् अन्य अनेक चरित्रांचाहि या संत-मालेंत अंतर्भाव करण्यांत आलेला आहे. या मालेंतील कांहीं चरित्रांतून पुरेशा माहितीचा अभाव दृष्टोत्पत्तीस येईल पण तरीदेखील प्रत्येक चरित्रकथन हें परिपूर्ण आणि प्रासादिक बनविण्याचा प्रांजल प्रयत्न केलेला दिसेल. प्रत्येक संताचें हें धांवतें दर्शन असलें तरी तें दर्शन भाविकाच्या अंतःकरणांतील भक्ति दृढ करण्यास खात्रीनें उपयोगी पडेल. केवळ कपोल-कल्पित सुरस कथांपेक्षां संतांचें ओझरतें दर्शन घडविणाऱ्या या सत्यकथा वाचकाच्या अंतःकरणां-तील भक्तीचा नंदादीप सतत तेवत ठेवण्यास उपयोगी पडतील असा विश्वास वाटतो. अर्थात् अंतःकरणांत उत्कट भक्ति दृढमूल होण्यासाठीं श्रद्धेचें बलिष्ठ असें अधिष्ठान हवें असतें. सत्प्रवृत्त वाचकांच्या अंतःकरणांत निदान या श्रद्धेचा उदय होण्यास ही संतचरित्रमाला खचित उपयोगी पडेल, एवढा दावा संतकृपेच्या बळावर जर लेखकानें केला तर तो अस्थानीं होणार नाहीं. या संतचरित्रांनीं एवढें जरी पुण्य पदरीं पडलें तरी आमचे श्रम सार्थकीं लागले असें आम्हीं समजूं.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ............... वि: ...............
नों. दि: ...............

# महिपति ताहराबादकर : १

* * * * * * * * * * * * * * * *

प्रवरेच्या दक्षिणेस दहा मैलांवर ताहराबाद या नांवाचें एक गांव आहे. तेथें दासोपंत या नांवाचे एक देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण रहात असत. कर्ममार्गांत ते अत्यंत निपुण होते. संसारांत असूनसुद्धां ते विरक्त होते. कितीहि संकटें आलीं तरी पंढरीची वारी त्यांनीं कधीं चुकविली नाहीं. कुलकर्णीपण व जोशीपण हीं वडिलोपार्जित वतनें जरी त्यांच्याकडे असलीं तरी त्यांना पांडुरंगाचेंच चरण अधिक प्रिय असत. ते संसारांत नांदत होते तरी संसारबंधनें मात्र त्यांनीं आपल्या पाठीशीं लावून घेतलीं नाहींत. सदासर्वकाळ भजन, पूजन व कीर्तन यांपलीकडे अन्य जगच त्यांना दिसत नसे. ज्ञानेश्वरी त्यांना तोंडपाठ येत होती आणि असंख्य अभंग त्यांच्या जिभेवर नाचत होते. निर्जळी एकादशीचें व्रत त्यांनीं दीर्घकाल केलें. दया, क्षमा आणि शांति हे गुण तर त्यांनीं आपल्या घरचे केले होते.

दासोपंतांना पत्नीहि सुदैवानें सती अनुसयेसारखी लाभली होती. एके दिवशीं दासोपंत पंढरीच्या वारीला चालले असतांना त्यांची पत्नी त्यांना म्हणाली, "आपल्याबरोबर मीहि पंढरीला येतें. या संसाराचा मला आतां वीट आला आहे. कारण पुत्रप्राप्तीविना हें संसार-मंदिर मला उदासवाणें वाटतें. आपल्याला मुलगा नसल्यामुळें हीं इतकीं वतनें तरी काय कामाचीं? मुलगा नसलेल्या पुरुषाला इहलोकींहि सुखलाभ होत नाहीं आणि परलोकींहि त्याच्या पदरांत सौख्य पडत नाहीं, असें म्हणतात. म्हणून माझें मन फार उदास झालें आहे. मग घरीं एकटें राहण्यापेक्षां मला आवडणाऱ्या पांडुरंगाचें दर्शन घेण्यासाठीं तरी मी आपल्याबरोबर पंढरपुरास येते. आपण माझी ही इच्छा मोडूं नका. मला बरोबर न्या."

तिला नाहीं म्हणण्याचें दासोपंतांना कांहींच कारण नव्हतें. तिला आपल्याबरोबर घेऊन ते पंढरपूरला गेले आणि दीर्घकाळ त्यांनीं तेथें वास्तव्य केलें.

पहांटे उठून चंद्रभागेचें स्नान करावें, पुंडलिकाचें दर्शन घेऊन क्षेत्र-प्रदक्षिणा करावी व नंतर पांडुरंगाचें दर्शन घ्यावें असा त्यांचा नित्य-क्रम असे.

त्या सुमारास एका स्वामींचा मुक्काम पंढरपुरांत होता. एके दिवशीं ही पती-पत्नी स्वामींच्या दर्शनाला गेली. स्वामींचें दर्शन घेतल्यावर स्वामी गंगाबाईस म्हणाले, "पांडुरंगाच्या प्रसादानें तुला त्वकरच भगवद्भक्त असा पुत्र प्राप्त होईल."

स्वामींचा हा आशीर्वाद ऐकून त्या पती-पत्नींना हर्ष झाला. त्यांचा मनोरथ पूर्ण होणारा आशीर्वाद त्यांना लाभला होता. त्या उभयतांनीं स्वामींना पुन्हां आदरपूर्वक वंदन केलें व तीं आश्रमांत परतलीं.

आश्रमांत आल्यानंतर तीं विचार करूं लागलीं, "हंगाम संपल्यावर कां कुठें वृक्षाला फळ धरत असतें ? पण पांडुरंगाच्या मनांत असेल तर या जगांत अशक्य अशी कोणती गोष्ट आहे ? ज्यानें पाण्यांत मोठमोठे दगड तरंगत ठेवले किंवा ज्यानें निर्जीव अशी भिंत चालवली त्याला कोणती गोष्ट अशक्य आहे ?"

दासोपंत आणि गंगाबाई या पती-पत्नींनीं पुत्रप्राप्तीसाठीं आजवर अनेक प्रयत्न केले होते, तीर्थाटनें केलीं होतीं, व्रतेंवैकल्यें पार पाडलीं होतीं, परंतु त्यांना पुत्रप्राप्ती झाली नाहीं. अशा अवस्थेंत त्यांना आतां स्वामींनीं पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद दिला होता. स्वामींच्या आशीर्वादावर विसंबून त्यांची कालक्रमणा चालली होती.

एके दिवशीं प्रातःकाळीं दासोपंत निद्रावस्थेंत असतांना गळ्यांत तुलसीमाला घातलेला एक वृद्ध ब्राह्मण त्यांच्या स्वप्नांत आला व तो

त्यांना म्हणाला, " आपल्याला पुत्रप्राप्तीची इच्छा आहे ना? तर मग हा प्रसा[illegible] कसल्याहि विकल्प न आणतां हा प्रसाद खा. आपली इच्छा पूर्ण होईल. "

दासोपंत जागे झाले आणि पाहतात तों त्यांना स्वप्नांतील ब्राह्मण दिसेना. प्रसादाचा पेढा मात्र त्यांच्याजवळ होता, पण प्रसाद देणारा ब्राह्मण मात्र गुप्त झाला होता. त्या चमत्काराचा कांहींच अर्थ त्यांना कळेना.

दासोपंतांनीं ही हकीगत आपल्या पत्नीच्या कानांवर घातली. त्या माउलीलाहि परमानंद झाला. कसलाहि विकल्प मनांत न आणतां त्या उभयतांनीं तो प्रसादाचा पेढा खाऊन टाकला.

पुढें कालांतरानें स्वामींचा आशीर्वाद व ब्राह्मणाचा दृष्टान्त या गोष्टी खऱ्या ठरल्या. आशीर्वादाचें आणि प्रसादाचें फळ त्यांना मिळालें. गंगाबाईला शके १६३७ मध्यें पुत्ररत्न झालें. दासोपंतांना व गंगाबाईंना परमावधीचा आनंद झाला. उतारवयांत, आशीर्वादानें झालेल्या या मुलाचें बारसें थाटानें करावयाचें ठरलें.

मग दासोपंताच्या या नवसाच्या पुत्राचा जन्मोत्सव थाटानें सुरू झाला. याचकांना तृप्त करण्यांत आलें. मुलाला बघावयास गांवांतील असंख्य स्त्री-पुरुष गोळा झाले. मुलगा गोरापान होता. त्याच्या मुखावर सदैव हास्य विलसत होतें. त्याच्याकडे पाहून सर्वांना अतिशय आनंद झाला. दासोपंतांची व गंगाबाईची जन्मोजन्मींची पुण्याई स्वामींच्या आशीर्वादानें फळास आली होती. या गोजिरवाण्या मुलाला स्त्रियांनीं पाळण्यांत घातलें व मुलाचें नांव महीपति असें ठेवण्यांत आलें. तेथें जमलेल्या अनेक स्त्रियांनीं पाळणे म्हटले. एका वृद्ध स्त्रीचें रूप धारण करून साक्षात् जगन्माता या बारशाच्या वेळीं आली होती व तिनेंहि सुरेख पाळणे म्हटले. तिचें नांव विचारतांच ती जगन्माता म्हणाली,

"मी पंढरीला आपल्या पतीकडे जात आहें. हा महोत्सव पाहून मला [illegible] निघून गेली. मग [illegible] बराच शोध करूनहि ती कोणाला दिसली नाहीं. सर्वांना या प्रकाराचें फारच आश्चर्य वाटलें.

दिवसेंदिवस बाळ वाढत होता. कलाकलांनीं वाढणाऱ्या चंद्राप्रमाणें तो सर्वांना आनंद देत होता. त्याच्या बाल-लीला पाहून-दासोपंत व गंगाबाई यांना अस्मान ठेंगणें होई. पुढें यथाकाल महिपतीची मुंज उरकण्यांत आली. पुरोहितानें त्याला संध्या वगैरे ब्रह्मकर्म सांगावें व लगेच महिपतीनें तें घडाघड तोंडपाठ म्हणून दाखवावें, अशी त्याची ग्रहणशक्ति शीघ्र स्वरूपाची होती. स्नानसंध्या वगैरे नित्यकर्म तो विधिपूर्वक व मोठ्या आस्थेनें करी. या वयांत ज्ञानेश्वरीचीं शेंकडों पारायणें त्यानें केलीं. विशेषतः तुकोबारायांचे अभंग तो अत्यंत गोड गात असे. नाथांच्या साऱ्या गौळणी त्याला तोंडपाठ येत असत. भजन, पूजन, कीर्तन व मनन यांतच त्याचा सारा वेळ जाई. बालसुलभ अशा खेळांचा त्याला तिटकारा असे. कोणीहि साधु भेटला कीं, लगेच महिपति त्याला 'भक्तांच्या गोष्टी मला सांगा' म्हणून विनवीत असे. त्याला कोणी संतकथा सांगितल्या तर लगेच तो आठवणीनें त्या कथा उतरून ठेवीत असे. नाभाजीकृत भक्तमालिका ग्रंथ महिपतीनें वाचला होता. त्यामुळें त्याच्या अंतःकरणांत प्रेमरसानें ठाण दिलें होतें. त्या ग्रंथाला तो एक क्षणभरहि विसंबत नसे. इतर सामान्य व्यवहारांतील गोष्टी त्याला मुळींच रुचत नसत. भक्तिरसांत तो सदैव डुंबत राही.

महिपतीला पंढरपूर हें क्षेत्र फारच प्रिय वाटे. पंढरीसारखें क्षेत्र नाहीं व पांडुरंगासारखे दैवत नाहीं, अशी त्याची श्रद्धा होती. सर्व नक्षत्रांमध्यें जसा चंद्र सोज्वळ तसें सर्व क्षेत्रांमध्यें पंढरपूर हें सोज्वळ क्षेत्र आहे; तेथें सदैव वसती करणारा पांडुरंग हा जणूं दीनदुबळ्यांचा उद्धार

करण्यासाठीं तेथें वाट बघत उभा आहे; अशी पंढरी जो पाहत नाहीं त्याच्यांत व दगडांत फरक तो काय राहिला अशी त्याची प्रांजल भावना झालेली होती. संतांनीं वर्णन केलेलें पंढरीचें महात्म्य वाचून महिपति अगदीं भारावून गेला होता आणि केव्हां एकदां पंढरीच्या दर्शनाला जातों, असें त्याला होऊन गेलें होतें. पंढरी प्रत्यक्ष डोळयांनीं पाहीन तेव्हांच अन्नग्रहण करीन; असा निर्धार करून तो एकदां आपल्या आईवडिलांना म्हणाला, "पांडुरंगाच्या दर्शनासाठीं मला तुम्ही पंढरपूरला न्या. मानवाला जरी उत्तम गति प्राप्त होत असली तरी पांडुरंगाच्या दर्शनानें त्या गतीला शीघ्रता प्राप्त होईल."

आपल्या प्रिय पुत्राची पंढरीवरील ही दृढ भक्ति पाहून महिपतीच्या आई-वडिलांना परमावधीचें समाधान वाटलें. पांडुरंगाच्या प्रसादानेंच त्यांना हा मुलगा झाला होता. तेव्हां त्याला पंढरीच्या दर्शनाला घेऊन जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

एके दिवशीं महिपतीसह व आपल्या पत्नीसह दासोपंत पंढरपूरला जायला निघाले. त्यांच्या प्रेमांतले अनेक लोकहि त्यांच्याबरोबर पंढरीला निघाले. पोचल्यावर सर्वांनीं चंद्रभागेंत स्नान केलें. पुंडलिकाचें दर्शन झाल्यावर मंडळी महाद्वारीं आली. तेव्हां त्यांना विटेवर उभें असलेलें साक्षात् परब्रह्म दिसलें. साजिरें श्रीमुख, कानांत दिव्य मकराकार कुंडलें, गळयांत कौस्तुभ मण्यांचा हार, कटि पितांबर, नासाग्री दृष्टि असें विठ्ठलाचें तें उभें रूप पाहून सर्वांचें अंतःकरण उचंबळून आलें. महिपतीनें मनोभावें हात जोडले, मन एकाग्र केलें व सगुणरूपाचें ध्यान केलें.

मग अठ्ठावीस युगें विटेवर उभ्या असलेल्या त्या साक्षात् परब्रह्माला उद्देशून महिपति म्हणाला, "पांडुरंगा, तुझा व माझा अनेक जन्मांचा ऋणानुबंध असला पाहिजे. मी तुझा खरोखरच दासानुदास आहें. विटेवर उभा राहून तूं सर्वांचीं सुख-दुःखें जाणतोस. हें करतांना तुला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ

अनुक्रम ..........
नों. दि: ..........

किती कष्ट घ्यावे लागतात? सर्व भक्तांचा उद्धार करीत आज अठ्ठावीस युगें तूं असाच या ठिकाणीं उभा आहेस तरीदेखील तुला ' खालीं बस ' असें कोणी म्हटलें नाहीं. नाना प्रयत्न करून तूं भक्तांचें सदैव रक्षण करतोस, दुष्टांचा संहार करतोस, धर्मरक्षणार्थ वारंवार सगुण अवतार धारण करतोस. चराचर सृष्टीचा भार सहन करण्यासाठीं पृथ्वीचा जन्म, प्राण्यांना प्रकाश देण्यासाठीं सूर्याचा जन्म त्याप्रमाणें भक्तांच्या कल्याणासाठीं तुझा अवतार आहे. पण हे दयाघना, तूं स्वतः पंढरीला राहून मलाच कां बरें दूर लोटलेस? कमींत कमीं मला पंढरीचें गवत अगर एखादा दगड तरी बनवायचें होतेंस. या तुझ्या महाद्वाराच्या पायरीचा मान जर तूं मला दिला असतास तर मी कृतार्थ झालों असतों. मी तुला अनन्यभावें शरण आलों आहे. माझें हित कशांत आहे तेंच मला कळेनासें झालें आहे. तुझ्याशिवाय मला तें कोणीहि समजावून देणार नाहीं. तूं संताच्या रूपानें वावरत असतोस. तरी संतांची–तुझी सेवा घडावी एवढीच माझी इच्छा आहे. तरी माझे मनोरथ पूर्ण कर. ”

पंढरीची याप्रमाणें प्रार्थना करून महिपतीनें त्याच्यासमोर लोटांगण घातलें असतांना त्याची शुद्ध पार हारपली. ' मी कोण? ' याचेंसुद्धां त्याला भान राहिलें नाहीं. त्या अवस्थेंतून जागृत झाल्यावर पांडुरंगाला त्यानें पुनः पुन्हां वंदन केलें.

त्या दिवसापासून महिपति सदैव विठ्ठलाच्या चिंतनांत निमग्न असे. एके दिवशीं सायंकाळीं तो भजनांत अत्यंत तल्लीन झाला. भजन संपवून सर्व मंडळी घरीं गेली तरी महिपति भजनांत तल्लीन होऊन राहिला होता. पहाटेच्या सुमारास विठ्ठल त्याच्या स्वप्नांत आला आणि म्हणाला, “ तुझ्या गांवांत येऊन मी तुझे मनोरथ पूर्ण करीन. ”

असें म्हणून विठ्ठलानें त्याच्या कपाळावर बुक्का लावला, गळ्यांत तुळशीची माळ घातली व डोक्यावर वरदहस्त ठेवला.

जागा होऊन पाहतो तों त्याला पांडुरंग कोठेंच दिसेना. तो भांबावून गेला. आपल्याला भास झाला, कां तें सारें सत्य होतें, या गोष्टीचा निर्णय त्याला करतां येईना. " पांडुरंगा, पांडुरंगा " अशा एकसारख्या हांका तो मारूं लागला. ' काय झालें ? ' ' कुठला पांडुरंग ? ' म्हणून लोक त्याला विचारूं लागले. आई-वडील त्याला म्हणाले, " अरे, तुला वेड़-बीड तर लागलें नाहीं ना ? उगाच कोणाला हांका मारीत सुटला आहेस ? चल, आपण आतां देवळांत जाऊं या ! "

यावर महिपति म्हणाला, " कोण तुम्ही ? हे सर्व लोक कशासाठीं जमले आहेत ? माझा विठ्ठल कोठें गेला ? मी दुसऱ्या कोणालाहि जाणत नाहीं. माझा पांडुरंग कोठें आहे, हें जर कोणाला माहीत असेल तर मला सांगा. माझ्या मस्तकावर वरदहस्त कोणीं ठेवला ? माझ्या गळ्यांत ही माळ कोणी घातली ? पांडुरंगाशिवाय इतर जग मी ओळखीत नाहीं."

एवढें बोलून तो धांवत धांवत देवळांत गेला, व पांडुरंगाला नमस्कार करून म्हणाला, " विठ्ठला, मी जागृतावस्थेंत आहे कां स्वप्नांत आहें, हेंच मला कळत नाहीं. "

तेथें असलेल्या स्वामींनीं त्याला हांक मारली व ते त्याला म्हणाले, " तुझें नांव महिपति आहे. तुझी स्थिति मी तुला समजावून सांगतों. मनांत उगाच विकल्प आणूं नकोस. "

महिपति स्वामींना म्हणाला, " माझें अज्ञान दूर करा हो ! "

पुन्हां स्वामी म्हणाले, " प्रथम तूं खालीं बस व मी तुला काय सांगतों तें नीट ऐक. पांडुरंगाच्या प्रसादानें तुझा पुनर्जन्म झाला आहे. तुझ्या मस्तकावर वरदहस्त ठेवून त्यांनीं तुला संतचरित्रें लिहिण्याबद्दल आज्ञा केली आहे. "

अशा तऱ्हेनें स्वामींनीं त्याचें समाधान केलें व त्याला घरीं जाण्याचीं आज्ञा केली. स्वामींना नमस्कार करून महिपति आपल्या आई-वाडिलांसह

ताहराबादला परत आला. पंढरपूरला घडलेल्या प्रकारानें महिपतीला एकसारखें सात्विक समाधान वाटत होतें.

दासोपंत व त्यांची पत्नी यांना सुनमुख बघण्याची अनावर इच्छा झाली. ते महिपतीसाठीं मुली बघूं लागले. मग एका सद्गृहस्थाची मुलगी निश्चित केली. ज्योतिषांनीं वधु-वरांच्या पत्रिका पाहिल्या तेव्हां छत्तीस गुण जमून आले. मग तिथि निश्चित झाली. मंगल वाद्यें वाजूं लागलीं. लग्न-घरांत आनंद नाचूं लागला. नवरी पिवळी झाली. देवक बसलें. वधु मंडपांत आली. भटजींनीं अंतरपाट धरला व मंगलाष्टकें म्हणण्यास प्रारंभ केला. गजानन, कुलस्वामिनी, ग्रामदेवता आदि सर्व देवदेवतांना आशीर्वादार्थ पाचारण केलें गेलें. अखेरचें मंगलाष्टक म्हटल्यानंतर 'शुभ मंगल सावधान'चा मोठा घोष झाला. वाद्यांचा गजर झाला. पानसुपारी वाटली. अत्तर लावलें. सर्व ब्राह्मणांना दक्षिणा दिली. व्याही, विहीण, मानकरणी कोणीहि रुसलें नाहीं. जांवईबुवा मात्र अंगठीसाठीं क्षणभर रुसून बसले पण ते क्षणभरच!

महिपतीचें लग्न तर मोठ्या थाटामाटांत पार पडलें. देणीं-घेणीं, ब्राह्मण भोजन वगैरे सारे कार्यक्रम यथासांग पार पडले. पांच दिवसांचा लग्नसोहळा आटोपून दासोपंत आपल्या मुलाला व सुनेला घेऊन ताहराबादला आले.

ताहराबादला आल्यावर महिपतींचा नित्याचा कार्यक्रम पुन्हां सुरूं झाला. वडिलोपार्जित कुलकर्णीपणाचीं व जोशीपणाचीं वतनें त्यांच्याकडे आलीं होतीं पण महिपतीचें लक्ष त्यांत लागेना. संसारांत राहून ते संसारापासून अगदीं अलिप्त असत. त्यांनीं अभिमान तर पार टाकून दिला होता. त्यांची निरहंकारी अवस्था झालेली असल्यामुळें मान-अपमान, लौकिक इत्यादि गोष्टींची त्यांनीं कधींच पर्वा केली नाहीं. सर्व विषयांचा त्याग केल्यामुळें माया-ममता या गोष्टीहि त्यांच्या अंतःकरणांत

उरल्या नाहींत. हें वाईट आहे किंवा हें चांगलें आहे हा भेदाभेद पार नाहींसा झाला. राजा व रंक या भेदांनाहि त्यांच्या ठायीं जागा उरली नाहीं. विष्णुदासाप्रमाणें हे सारे भेदाभेद त्यांना अमंगल वाटूं लागले.

महिपतींची अशी निर्लोभी अवस्था झाल्यामुळें त्यांना द्रव्याची किंमत वाटेनाशी झाली. तुकारामांप्रमाणें धनराशी त्यांना मृत्तिकेसमान वाटूं लागली. एकदां संसार थाटला म्हणजे कधीं ना कधीं त्या संसारांत अडचणी उभ्या राहणें हा नित्याचा अनुभव आहे. महिपतींना आपल्या संसारांत अशा अडचणी दिसल्या म्हणजे ते पांडुरंगाचा धावा करूं लागत; व पांडुरंग आपल्या अडचणींचें निवारण करील असा विश्वास त्यांना वाटे. एखादी नवीन सासुरवाशीण ज्या उल्हासानें आपल्या माहेरी जाते त्याच उल्हासानें महिपति दर आषाढी-कार्तिकीला पंढरीला जात असत. एकदां महिपति वारीला गेले म्हणजे घरावर तुळशीपत्र ठेवूनच जात. मुखानें हरिनामाचें संकीर्तन सदैव चालूंच असे. त्यांच्या जिव्हेला जणूं हरिनामाची अवीट गोडी लागलेली होती. सदैव विठ्ठल-नामांत दंग राहावें, एवढाच त्यांचा नित्याचा उद्योग बनला होता.

महिपतींची ही दृढ भक्ति पाहून एके दिवशीं पांडुरंग त्यांच्या स्वप्नांत आला आणि म्हणाला, "तूं संतसेवा कर. त्यांचीं चरित्रें उत्तम प्रकारें लिही. जसजशी तुला स्फूर्ति होईल तसतशीं संतचरित्रें लिहून काढ. तुला लिहितां कसें येईल याची काळजी करूं नकोस. मी तुला साहाय्य करीन. मी तुझ्या हृदयांत आहें."

असा दृष्टान्त देऊन पांडुरंग अंतर्धान पावला. महिपति जागृतावस्थेंत आले. ते मनाशीं म्हणाले, "खरोखर देवानें मला चमत्कार दाखविला. माझ्या दृष्टीसमोर जें रूप होतें तेंच मला दिसलें. शिवाय माझ्या मनांत जें कार्य करावयाचें होतें तेंच करण्याची आज्ञा मला जगन्नाथानें दिली. अमावस्येच्या अंधारांत आपण दिवटीच्या प्रकाशाची इच्छा करावी तोंच

तेथें भगवान् सूर्यनारायण अवतीर्ण व्हावे किंवा आसन्नमरण झालेल्या एखाद्या रोग्यानें वनांत औषधी-वनस्पति धुंडाळण्यास जावें तोंच तेथें अमृताचें कुंड सांपडावें म्हणजे जो आनंद होईल तो महिपतींना झाला.

मग महिपतींनीं पांडुरंगाचें ध्यान करून म्हटलें, "माझ्या हातून संतसेवा घडावी असें तूं म्हणतोस, पण तशी सेवा तूंच करवून घे. करता करविता तूंच असल्यानें मीपणाचा अहंकार बाळगण्यांत काय अर्थ आहे? पांडुरंगा, तुझी आज्ञा मला प्रमाण आहे. माझें लेखन-सामर्थ्य मला कळून चुकलें आहे. तेव्हां संतचरित्रांचें लेखन मी करीन--तुझा आधार आहे, म्हणूनच करीन. मी सर्वस्वीं तुझ्या आधीन आहे."

असें म्हणून महिपतींनीं संतचरित्र लेखनास प्रारंभ केला. सरस्वती त्यांच्या जिभेवर बसली आणि त्यांना रसाळ व लालित्यपूर्ण रचना पुरवूं लागली. सरस्वतीच्या सुरस आणि लालित्यपूर्ण शब्द-पुरवठ्यानें व पांडुरंगाच्या पाठिंब्यानें तयार झालेलीं संतचरित्रें भाविक लोकांत लोकप्रिय होऊं लागलीं. भक्तविजय, अनंतव्रत, संतविजय, संतलीलामृत, अपराध निवेदन, कथासारामृत, मुक्ताभरण, दत्तजन्म, भक्तलीलामृत, गणेश पुराण, पांडुरंग स्तोत्र, तुळशी महात्म्य, ऋषिपंचमी कथा वगैरे ग्रंथ त्यांनी सुबोध करून लिहिले. त्यांनीं अभंगपर संतचरित्रें व 'पंढरी महात्म्य' हा ग्रंथ तयार केला. हें सर्व साहित्य घेऊन महिपति पंढरीला जात व रोज पांडुरंगासमोर ते ग्रंथ वाचून दाखवीत. ग्रंथ-लेखन संपलें कीं त्यांनीं पुन्हां ते पांडुरंगाला वाचून दाखवावेत, असा त्यांचा क्रम चालला होता. नवनवीन ग्रंथ नित्यशः तयार होत होते आणि प्रत्यक्ष पांडुरंग त्या ग्रंथांचा श्रोता बनला होता. असा दुर्लभ श्रोता लाभल्यावर महिपतींची प्रतिभा सहस्रमुखांनीं बहरावी यांत नवल तें काय! महिपति या प्रासादिक लेखन- कार्यांत अगदीं तल्लीन होऊन गेले. अशा अवस्थेंत आपली परंपरागत वतनें त्यांना नकोशी व्हावींत यांत नवल तें काय?

एके दिवशीं महिपति देवपूजेला बसले असतांना कोण्या एका अधिकाऱ्याचे नोकर आले व 'महिपतींना त्वरित आपल्या धन्यानें बोलविलें आहे' असें सांगूं लागले. 'देवपूजा झाल्यावर मी येतों असें कृपाकरून तुमच्या धन्याला सांगा' असें महिपतींनीं सांगून पाहिलें पण नोकर त्यांना अद्वातद्वा बोलूं लागले. तेव्हां पूजा तशीच अर्धवट टाकून महिपति त्या अधिकाऱ्याकडे गेले, त्यांनीं तेथील काम केलें व ते तडक घरीं परत आले. घरीं आल्यावर कुलकर्णीपणाची लेखणी त्यांनीं आपल्या हातांत घेतली व ती पांडुरंगाला अर्पण केली. पांडुरंगाला लेखणी अर्पण करून महिपति म्हणाले, "गांवाच्या कामासाठीं आमच्या वंशजांनीं सात पिढ्या ही लेखणी आपल्या हातांत धरूं नये."

अशा तऱ्हेनें पांडुरंग-भक्तीच्या आड येणाऱ्या लेखणीचा महिपतींनीं त्याग केला; आणि अहर्निश ते पांडुरंग-भक्तींत मग्न होऊन गेले. पांडुरंगसेवेसमोर धन त्यांना मृत्तिकेसमान वाटूं लागलें.

महिपतींनीं आपली लेखणी पांडुरंग-चरणीं अर्पण केली व आपल्या घराण्याचीं सारीं वतनें सोडून दिलीं म्हणून महिपतींचे नातेवाईक त्यांना नावें ठेवूं लागले. ते म्हणूं लागले, "लोक वाटेल त्या खटपटी-लटपटी करून वतनें मिळवितात. वेळप्रसंगीं त्यासाठीं पैसाअडका खर्च करतात, पण हा महिपति अगदीं मुलखावेगळाच दिसतो. स्वतः पांडुरंगाची भक्ति करतो पण बायका-मुलांचे हाल होतात या गोष्टीची कुठें आहे याला जाणीव ? म्हणे सात पिढ्या आमच्या वंशजांनीं आपल्या हातांत लेखणी धरूं नये. असें म्हणायला याला कांहींच कसें वाटत नाहीं ?"

साऱ्या नातेवाइकांनीं महिपतींची अशा प्रकारे निर्भत्सना केली पण महिपतींचें पांडुरंगाचें व्यसन सुटलें नाहीं. त्यांची भक्ति यत्किंचितहि ढळली नाहीं. हानि-लाभ किंवा निंदा-स्तुति या गोष्टी ते सारख्याच मापानें मोजूं लागले. नातेवाइकांच्या निर्भत्सनेकडे त्यांनीं मुळींच लक्ष

दिलें नाहीं. त्यांचें हें देवाचें व्यसन पाहून लोक म्हणूं लागले, "देव-पूजेसाठीं यानें वतनें सोडलीं. याचे देवच जर कोणी चोरून नेले तर हा बहुधा प्राणच सोडील!"

अभद्र माणसांनीं वर्तविलेलीं अभद्र जातकें खरीं ठरत असतात कीं काय कोणास ठाऊक! एका चोरानें खरोखरच महिपतींची देवाची पोथी पळविली.

नित्याप्रमाणें स्नान करून महिपति फुलें घेऊन देवघरांत गेले. त्या ठिकाणीं त्यांना पोथी दिसेना. आपली पोथी चोरीला गेल्याचें कळल्या-वर महिपति म्हणाले, "पांडुरंगा, कोठें गेलास रे तूं? माझ्यापेक्षां श्रेष्ठ असा दुसरा कोण भक्त तुला सांपडला? माझी पूजा तुला आवडली नाहीं, होय ना? कां माझ्यावर रागावलास? 'तुझ्या घरीं राहीन' असें पंढरीला असतांना तूं मला वचन दिलें होतेंस ना? मग हीच का तुझी सत्यप्रियता? मी तुला येथें बळजबरीनें तर आणलें नाहीं ना? तुझ्या पूजेसाठीं मीं वतन सोडलें, लोकनिंदा सहन केली. तेव्हां तुझें हें वागणें बरें नव्हे. तूं जर मला दिसला नाहींस तर मी माझा प्राणच देईन. मी या जगांतून गेलों तरी जगांत कसलाहि कमीपणा येणार नाहीं. मी संतसेवा करावी अशी आज्ञा तूंच केलीस ना? संतचरित्रांच्या लेखनांत मला साहाय्य करण्याचें वचन तूंच मला दिलेस ना? आणि तें वचन देऊन आतां तूं निघून गेलास. तुझ्या मनांत येईल तें तूं कर. जास्त बोलून तरी काय उपयोग आहे? पांडुरंगा, मी जरा उणा-अधिक शब्द वापरला म्हणून तर तूं गप्प नाहीं ना राहिलास?"

अशा तऱ्हेनें महिपतींनीं शोक केला आणि नंतर पांडुरंगाचा धांवा केला. पण पोथीचा पत्ता लागला नाहीं आणि महिपतींचा धांवा थांबला नाहीं.

महिपतींची पोथी चोरून चोर भराभर आपला मार्ग आक्रमीत होते.

परंतु चालतां चालतां त्या चोरांना एकदम अंधत्व आलें व त्यांना पुढील मार्ग सांपडेना. 'आम्हांला रस्ता दाखवा' असें म्हणून ते चोर रडूं लागले. त्याचवेळीं महिपतींना भेटण्यासाठीं कुलकर्णी नांवाचे एक गृहस्थ येत होते, त्यांची व या चोरांची गांठ पडली. त्या चोरांनीं घडलेला खरा प्रकार कुलकर्ण्यांना निवेदन केला. त्यावर कुलकर्णी त्या चोरांना म्हणाले, "अरेरे! तुम्हीं सद्भक्ताचा छळ केलांत म्हणून तुम्हांला ही अशी स्थिति प्राप्त झाली. तुमच्यावर परमेश्वर कोपला व त्यानें तुम्हांला अंधळे केले. तरी आतां ही पोथी ताबडतोब महिपतींना परत करा."

यावर चोर म्हणाले, "तुम्ही आम्हांला महिपतीमहाराजांकडे घेऊन चला. आम्ही त्यांना अनन्यभावानें शरण जाऊं. ते आम्हांला क्षमा करतील. परमेश्वरा, ही बुद्धि आम्हांला कशी रे झाली?"

चोरांचे पश्चात्तापाचे हे बोल ऐकून कुलकर्णी त्या चोरांना घेऊन महिपतींकडे आले; व त्यांना म्हणाले, "हे चोर आपणांस शरण आले आहेत. त्यांना अंधत्व प्राप्त झालें म्हणून ते रडत बसले होते. म्हणून मी त्यांना आपल्याकडे घेऊन आलों आहें."

मग चोरांनीं सारी हकीगत महिपतींना निवेदन केली, आपला गुन्हा मान्य केला व ते म्हणाले, "आम्हांला चांगली दृष्टी असतांना या दुष्कर्मानें आम्हांला अंधत्व आलें. आपण संत-देव आहांत. कृपावंत होऊन आम्हांला क्षमा करा व आमची दृष्टि आम्हांला परत द्या."

त्यांना पश्चात्ताप झालेला पाहून महिपतींनीं त्यांच्या मस्तकावर वरद-हस्त ठेवला तत्क्षणींच त्यांना दिव्यदृष्टि प्राप्त झाली. त्या चोरांना अत्यानंद झाला. कारण कुकर्मामुळें त्यांची दृष्टि गेली होती पण संत-संगतीमुळें त्यांना आतां दिव्यदृष्टि प्राप्त झाली होती. एखादा ओढा गंगेला मिळाल्यानंतर ज्याप्रमाणें त्या ओढ्याचें पाणी पावन होतें त्याप्रमाणें ते चोर पावन झाले होते. तेव्हांपासून त्यांनीं आपलें चौर्य-कर्म

सोडलें व ते नियमानें पंढरीची वारी करूं लागले. परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें बनलें होतें. महिपतींबरोबर ते सारे चोरहि पंढरीचे महान् भक्त बनले. द्रव्याची लालसा त्यांच्या अंतःकरणांतून निपटून निघाली. त्यांना वैराग्य प्राप्त झालें. ठायीं ठायीं प्रत्येक वस्तूंत त्यांना पांडुरंगाचें रूप दिसूं लागलें.

ही वार्ता वाऱ्यासारखी गांवोगांव पसरली आणि महिपतींच्या दर्शनासाठीं माणसांची रीघ लागली. ताहराबादेला पुण्यक्षेत्राचें स्वरूप प्राप्त झालें. तेथें मोठी जत्राच भरली. संतांच्या पदस्पर्शानें कोणत्याहि भूमीचें पवित्र अशा क्षेत्रांत रूपांतर व्हावें यांत नवल काय? भक्तराज पुंडलिकाच्या सान्निध्यानें विठ्ठलाची पंढरी नगरी पावन नाहीं कां झाली? संतांची ज्या ठिकाणी वस्ती असते त्या स्थानाला भाविक लोक भूवैकुंठ मानतात त्याप्रमाणें ताहराबादहि भूवैकुंठ बनलें; आणि त्या गांवाला जत्रा लोटूं लागली.

दिवस-रात्रींचा पाठशिवणीचा खेळ सुरूच होता. प्रत्येक नव्या दिवशीं महिपतींचा महिमा नव्यानें वाढत होता; परंतु महिपतींच्या कार्यक्रमांत कोणत्याच प्रकारचा खंड पडला नव्हता. पंढरीची वारी सुरूच होती. एकदां महिपति आषाढी वारीला पंढरपुराकडे जायला निघाले. माध्यान्ह स्नानासाठीं त्यांनीं वाटेंत एका गांवीं मुक्काम केला. त्या मुक्कामांत ते एका ब्राह्मणाच्या घरीं गेले व स्नान-संध्यादि कर्मासाठीं कांहीं काळ आश्रय मिळेल का, म्हणून त्यांनीं पृच्छा केली.

यावर ब्राह्मण-पत्नी म्हणाली, "दारिद्र्यामुळें आम्ही अत्यंत हाल-अपेष्टांत दिवस कंठीत आहोंत. तुम्हांला पंचपक्वान्नाची अपेक्षा असेल तर आमच्याकडे तीं मिळणार नाहींत. आम्ही गरीब आहोंत. आम्ही आपली भाजी-भाकरी खातों. ती जर तुम्हांला चालत असेल तर खुशाल राहा. तुम्हां साधुसंतांना गोडधोड भोजन लागतें म्हणून आगाऊ सुचवितें."

यावर महिपति म्हणाले, “आम्हांला ज्यावेळेस जें अन्न मिळेल त्यांत आमचें समाधान असतें. देव तुम्हांला सुखी करो !”

मग महिपतींनीं त्या ब्राह्मणाच्या घरीं स्नान केलें व ते पूजेला बसले. इतक्यांत घरधनि ब्राह्मण बाहेरून घरीं परतला. आपल्या घरीं सत्पात्र अतिथि आलेला बघून त्या ब्राह्मणास फार आनंद झाला.

महिपतींची पूजा सुरूं झाली. त्यांच्या पूजेंत विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ति होत्या. त्या मूर्तींना त्यांनीं स्नान घातलें. शुभ्र वस्त्रानें अंग पुसून त्यांना भरजरी पोषाख चढविला. अलंकार घातले. केशरी गंध लावून तुळस, फुलें वगैरे अर्पण केलीं. धूप, कर्पूर टाकून त्यांना ओवाळलें. पेढे व खडिसाखरेचा नैवेद्य दाखविला; व ध्यान केलें. देवांना नैवेद्य अर्पण करतांना महिपति म्हणाले, “पांडुरंगा, तूं घरीं असलास काय किंवा प्रवासांत असलास काय, जेवणाच्या बाबतींत तुझी आपली चैन आहे. आमचें तसें नाहीं. आज आम्हांला फक्त कोंड्याच्या भाकरीचीच मेजवानी आहे.”

इतक्यांत भोजन तयार आहे, असें सांगण्यास ब्राह्मण आला. महिपति उठतात तोंच कोणीतरी घराचा दरवाजा ठोठावला. घरधन्यानें दरवाजा उघडला. त्यांचे जांवई आलेले होते. सर्वांना अत्यानंद झाला.

मग जांवयासाठीं दुसरा खास स्वयंपाक करणें भागच होतें. कारण लग्न झाल्यापासून जांवईबुवा प्रथमच सासुरवाडीस येत होते. मग जांवईबुवांच्या खास पंक्तीला बसण्यासाठीं महिपतींनाहि थांबावें लागले.

जेवणास अवधि होता म्हणून महिपति पुन्हां पोथी वाचण्यास बसले. त्यांनीं संतचरित्रें वाचण्यास प्रारंभ केला. संतांचीं तीं रसाळ चरित्रें ऐकून जांवईबुवा खूष होऊन गेले. महिपतींबरोबर पंढरपूरला निघालेले वारकरीहि तीं संतचरित्रें ऐकून डोलूं लागले. जेवायचेंहि कोणाला भान राहिलें नाहीं.

संतचरित्रांचें वाचन संपल्यावर मग पंगत सुरू झाली. रंगीत पाट, रंगीबेरंगी रांगोळ्या, कस्तुरीचें गंध, सुवासिक उदवत्त्या, आणि पंचपक्वान्नें असा एकंदर मेजवानीचा थाट होता. जेवण आटोपल्यावर महिपति वगैरे मंडळी पंढरीला जाण्यास निघालीं. त्यांना निरोप देण्यासाठीं जांवईबुवाहि त्यांच्याबरोबर गेले ते पुन्हां सासुरवाडीस परतलेच नाहींत. सासुरवाडीच्या मंडळींनीं तीन-चार दिवस खूप शोध केला. जिकडे तिकडे शोधार्थ लोक धाडले. हा शोध केल्यानंतर त्यांना कळून आलें कीं, साक्षात् पांडुरंगच जांवयाचें रूप धारण करून महिपतींच्या पंक्तीला जेऊन गेले. त्यांच्या भक्ताला—महिपतींना—पंचपक्वान्नें खाण्याची इच्छा झाली नव्हती का ? पांडुरंगानें जांवयाच्या रूपानें येऊन भक्ताचे मनोरथ पूर्ण केले. प्रत्यक्ष पांडुरंगाला आपण ओळखूं शकलों नाहीं, याबद्दल त्या ब्राह्मणाला मनस्वी खेद झाला; व पश्चात्तापदग्ध अंतःकरणानें सारी मंडळी पंढरपूरला गेली. महिपतींना भेटून त्यांनीं घडलेली सारी हकीगत त्यांच्या कानावर घातली तेव्हां महिपतींनाहि अत्यंत खेद झाला.

मग महिपति म्हणाले, "हे पांडुरंगा, मी पक्वान्नांबद्दल तुला सहज विनोदानें म्हटलें. त्यावर जांवयाच्या रूपानें या ब्राह्मणाच्या घरीं येऊन तूं माझें मनोगत पूर्ण केलेंस. विनाकारणच तुला त्रास झाला. मला पक्वान्न मिळालें नसतें तर माझा प्राण का गेला असता ? हे नारायणा, पुन्हां मला अशी दुर्बुद्धि देऊं नकोस. पांडुरंगा, यापुढें तूं सतत माझ्या हृदयांत राहा. म्हणजे मला अशी दुर्बुद्धि कधीं होणार नाहीं. यापेक्षां तूं माझ्या घरींच वसतीला ये ना ! मी तुझी अहर्निश सेवा करीन. कारण तुझ्या पायाशिवाय मला आतां दुसरी कसलीच माया उरलेली नाहीं !"

महिपतींचे हे बोल ऐकून श्रीरंगाची पुरातन वालुकामय मूर्ति म्हणाली, "मी तुझ्याबरोबर ताहराबादला येईन."

महिपतींनीं विचारलें, "देवाधिदेवा, मला पंढरीला येण्याचा यापुढें अधिकार राहणार नाहीं का?"

यावर पांडुरंगमूर्ति पुन्हां उत्तरली, "मी आतां तुला त्रास देणार नाही. मी येथें गुप्त होऊन तुझ्या गांवीं प्रगट होईन. मी सर्वव्यापक चैतन्यघन असल्यामुळें मी येथें नाहीं असें कोण बरें म्हणूं शकेल? किंवा मी दोन्ही ठिकाणीं दर्शन देईन. कांहीं झालें तरी मी तुझ्याजवळ राहीन."

पांडुरंगाचें आश्वासन घेऊन महिपति ताहराबादला परतले. एक दिवशीं स्नानसंध्या आटोपून महिपति पांडुरंगाच्या मूर्तीचें ध्यान करित बसले. ध्यान संपवून महिपतींनीं जेव्हां डोळे उघडले तेव्हां त्यांना पांडुरंगाची हंसतमुख मूर्ति विटेवर उभी असलेली दिसली. महिपतींनीं त्या मूर्तीला वंदन केलें व विचारलें, "आपल्याला पंढरी सोडून किती दिवस झाले?"

पंढरीची ती मूर्ति म्हणाली, "तें मला विचारूं नकोस. माझी स्थिति व्यापक आहे, हें तुला माहीत आहे ना?"

● ● ●

कुष्ठरोग झालेला एक संन्यासी आपला रोग बरा व्हावा म्हणून आळंदीला राहात असे. तो नेहमी मनांत म्हणत असे "माझ्या नशिबांत काय आहे कोण जाणें! रोग बरा व्हावा म्हणून आजपर्यंत नाना उपाय केले पण रोग हटण्याऐवजीं तो उल्ट बळावत चालला आहे. अशा स्थितींत मरण आलें तर बरें होईल. पण भोग भोगल्याशिवाय मरण तरी कसें येणार? या शारीरिक व्याधीनें तर मी इतका पीडलों आहे कीं, कोणाला शरण यावें हेंच मला समजत नाहीं. या आळंदीला तर ज्ञानेश्वरांची— साक्षात् त्या महाविष्णूची वसती आहे. पण माझ्या हातून जर कांहींच परमार्थ घडला नाहीं तर मी त्यांच्याकडे कोणत्या तोंडानें करुणा भाकणार? पण मनांतील हा विकल्प खरोखरच चांगला नाहीं. मनांत विकल्प आल्यामुळें थोर थोर तपस्व्यांचें तप भंग पावलें आहे. तेथें माझ्यासारख्या

पामराचा काय पाड ? विकल्पाचें पाप एकदां का मनांत उद्भवलें म्हणजे त्या पापाचें प्रायश्चित्त मिळाल्याशिवाय कसें राहील ? आणि शिवाय जन्मोजन्मींचीं पापें रोगाच्या रूपानें मानवी आयुष्यांत अवतीर्ण होत असतात. कांहींतरी पाप घडलें म्हणूनच इंद्राच्या अंगाला हजारों भोकें पडलीं ना ? पापामुळेंच चंद्राच्या पाठीमागें क्षय लागला ना ? पण संत-कृपेचा प्रभाव एवढा आहे कीं, त्यांच्या कृपेनें सारीं पापें नष्ट होतात; परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें त्याप्रमाणें संतांना शरण आलें म्हणजे सर्व दोष नष्ट होतात. किंबहुना पापी माणसांच्या उद्धारासाठींच संतांचे अवतार असतात; पण असे संत सांप्रतच्या काळीं पृथ्वीवर कोण आहेत ? ”

याप्रमाणें त्या संन्याशाच्या मनांत उद्वेगाचे विचार येत आणि तो खिन्न होऊन जाई. एकदां तो झोपला असतांना श्रीज्ञानेश्वर महाराज त्याच्या स्वप्नांत आले आणि म्हणाले, “ तुम्ही आतां येथून ताहराबादला जाऊन महिपतीला शरण जा. त्यामुळें तुमचा रोग बरा होईल. ”

संन्यासी जागा झाला आणि म्हणाला, “ कोण महिपति ? हे कुठले राहणारे ? मला तर यांची कांहींच माहिती नाहीं. ”

पण उत्कट इच्छा झाली म्हणजे मार्ग सांपडतो या न्यायानुसार चौकशी करतां त्या संन्याशाला महिपतींची सारी माहिती मिळाली; व तो ताहराबादला जाण्यासाठीं निघाला.

तो संन्याशी जेव्हां ताहराबादला महिपतींकडे गेला तेव्हां महिपति तुळशीवृंदावन लिंपीत होते. त्या संन्याशाला बघतांच महिपतींनीं त्याला नमस्कार केला व म्हटलें, “ आपणांस माझे स्नेही ज्ञानेश्वर यांनीं पाठ-विलें आहे काय ? पण माझा अधिकार इतका मोठा नाहीं. मग मी आपला रोग कसा बरा करणार ? त्यांनीं मला विनाकारण थोरपण दिलें पण पायांतली वाहाण पायांतच बरी ! ज्ञानेश्वर म्हणजे साक्षात् महा-

विष्णूचा अवतार ! त्यांनीं रेड्याच्या मुखांतून वेद वदविले. निर्जीव भिंत चालविली. ते मनांत आणतील तें करूं शकतील असें सामर्थ्य अंगीं असतांना त्यांनीं ही उपाधि माझ्याकडे कां बरें पाठविली ? ”

पण ज्ञानेश्वरांची आज्ञा त्यांनीं शिरसावंद्य मानली व त्या संन्याशाला पांडुरंगाच्या नांवानें तीर्थ दिलें, आणि काय चमत्कार ! त्या संन्याशाचा देह पूर्ववत् झाला. ही वार्ता वाऱ्यासारखी सगळीकडे पसरली, व महिपतींची उपाधि अधिकच वाढली. कुष्ठरोगमुक्त झालेला संन्याशीहि त्याच ठिकाणीं राहिला. त्याचा रोग बरा झाला पण परत जाण्याचें नांव तो काढीना. संताच्या संगतींत कालक्रमणा करण्यांत त्याला समाधान वाटूं लागलें.

एके दिवशीं पांडुरंगाच्या मूर्तीशीं महिपतींचें संभाषण चालू असलेलें या संन्याशानें ऐकलें.

संन्याशानें महिपतींना विचारलें, “ येथें दुसरे कोणी नसतांना आपण कोणाशीं बोलत आहांत हें कृपाकरून मला सांगा. ”

महिपति म्हणाले, “ ज्यानें सद्गुरूंचा उपदेश अनुभवला आहे त्यालाच हा प्रकार कळतो. इतरांस तो कळणार नाहीं. पांडुरंगाच्या कृपेनें तुझा रोग बरा झाला आहे. तेव्हां आतां एक क्षणभरहि येथें राहूं नकोस. ”

महिपतींची आज्ञा प्रमाण मानून तो संन्यासी राहुरीला आला व तेथें रामबुवांच्या आश्रमांत त्यानें वास्तव्य केलें. परंतु तेथें त्याचें मन रमेना. वारंवार त्याला महिपतींची आठवण होऊं लागली. महिपतींच्या-बरोबर बोलणारी पांडुरंगाची मूर्ति त्याला वारंवार दिसूं लागली. त्या पंढरीच्या मूर्तीशिवाय त्याला आतां दुसरें कांहीं सुचेनासें झालें होतें. त्या मूर्तीचें दर्शन व्हावें आणि महिपतींना भेटावें यासाठीं तो संन्यासी नेहमीं ताहराबादला येऊं लागला.

महिपतींचा कार्यक्रम सुरूच होता. त्यांचें सारेंच जीवन पांडुरंगमय बनलें होतें. विठ्ठलाशीं खेळावें, विठ्ठलाशीं हंसावें, त्याच्याशीं लडिवाळ-पणा करावा, हट्ट धरावा याप्रमाणें त्यांची विठ्ठलाशीं सलगी सुरू होती. एकदां रंगपंचमीच्या दिवशीं महिपतींनीं विठ्ठल-मूर्तीच्या अंगावर रंगीत पोषाख चढविला व त्या गोजिरवाण्या मूर्तीला उद्देशून ते म्हणाले, " आज तुझें हें ध्यान किती सुंदर दिसतें. मला या तुझ्या ध्यानाची फार आवड आहे. आज सण म्हणून तुझ्या अंगावर हा पोषाख चढविला. पण हो, विठ्ठला, तुला सणाचा नैवेद्य अजून कोठे आला आहे? तुला फार भूक लागली असेल नाहीं का ? "

इतक्यांत सीताराम नातू या नांवाचा एक गृहस्थ नैवेद्य घेऊन आला. त्यानें तो नैवेद्य विठ्ठलाच्या मूर्तीपुढें ठेवला व क्षणभर डोळे मिटले. सीतारामानें डोळे उघडले तेव्हां त्या पांडुरंगाच्या मूर्तीनें आपले दोन्ही हात खरोखरच नैवेद्याच्या ताटावर ठेवलेले दिसले. तें दृश्य पाहून सिताराम घाबरून गेला.

तो सारा प्रकार पाहून महिपति त्याला म्हणाले, " अरे तुझी पुण्याई थोर म्हणून तुला विठ्ठलानें असा चमत्कार दाखविला, ही गोष्ट तुला कशी कळली नाहीं? नामदेवानें नैवेद्याचें दूध समर्पण केलें असतां पांडुरंग तें दूध प्यायला. त्यावेळीं नामदेवाचें वयहि तुझ्याएवढेंच होतें. उगाच तुला कसलें भय वाटतें ? "

• • •

एकदां महिपति आपल्या कांहीं शिष्यांसह नाशिक क्षेत्रीं वास्तव्याला आले. महिपतींचा महिमा दिवसें दिवस वाढत होता. कित्येक लोक त्यांना संत म्हणून मान देत होते परंतु दुसरेहि कांहीं विघ्नसंतोषी लोक होते. महिपतींच्या संतपणाची सत्यता पाहावी असा या दुराचारी माणसांनीं विचार केला. हे लोक एकदां महिपतींकडे आले आणि

मानभावीपणानें त्यांनीं महिपतींना वंदन केलें. त्या लोकांनीं महिपतींची टर उडविण्यासाठी त्यांचें कीर्तन एका भुतांच्या वाड्यांत ठेवलें.

रात्रींची वेळ होती. त्या वाड्यांत मंडळी जमली. महिपतींचें कीर्तन सुरू झालें. कीर्तनाला रंग भरत चालला. मध्यरात्र झाली. कीर्तन ऐन रंगांत आलें असतांना दिवे आपोआप विझले आणि सर्वत्र भीषण अंधकार पसरला. लोकांना त्या भुतांच्या वाड्याची ख्याति माहीत होती. त्यामुळें लोक घाबरले आणि वाट फुटेल तिकडे धांवूं लागले. एकमेकांनीं एकमेकांना तुडविलें. कोणी भीतीनें ओरडूं लागले, कोणाची बोबडी वळली तर कांहींची दांतखीळ बसली. बरेच लोक मूर्छित पडले. जो तो दार शोधूं लागला. त्या ठिकाणीं एकच हलकल्लोळ उडाला.

मग महिपतींनीं त्या सर्वांना अभयदान दिलें व ते म्हणाले, " पंढरीचा पांडुरंगच आपणां सर्वांचा पाठीराखा आहे. त्याच्यावांचून एक तसूभरहि जागा रिकामी नाहीं. "

महिपतींचें याप्रमाणें बोलणें सुरूं असतांनाच एकदम दिवे लागले आणि भुतावळ नाहींशीं झाली. परत भजन, कीर्तन सुरूं झालेलें पाहून त्या दुरात्म्यांना शरम वाटली; व ते कीर्तनांत रंगून गेले. परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सुवर्णांत रूपांतर व्हावें त्याप्रमाणें महिपतींच्या दर्शनानें त्या दुर्जनांचें सज्जनांत रूपांतर झालें, व ते महिपतींच्या कायमचे भजनीं लागले.

एके दिवशीं महिपति आपल्या केशव नांवाच्या शिष्याला म्हणाले, " नाथाष्टमीचा महोत्सव जवळ आला आहे. पैठणला येतोस कां ? "

केशवानें होकार भरतांच गुरु-शिष्य दोघेहि पैठणला जाण्यासाठीं निघाले. वाटेंत त्यांचा एका गांवीं मुक्काम पडला. महिपति केशवला म्हणाले, " मला फार भूक लागली आहे. पण हरीच्या मनांत असेल तर जागच्या जागेवर माझी सोय होईल. कारण मी आज अतिशय दमलों आहे. येथेंच कांहीं सोय झाली तर बघ. "

तेथें एका ब्राह्मणाचें घर होतें. केशवनें त्या ब्राह्मणाला विचारलें, “ आमची भोजनाची कांहीं व्यवस्था होईल कां ? ”

ब्राह्मण म्हणाला, “ मी दारिद्र्यानें अत्यंत वेंगलो आहे. आमच्या घरीं नुसत्या कण्यांची पेज व भाकरी आहे. तेव्हां तुम्हांला जेवायला बोलवायची देखील लाज वाटते. संत महिपति महाराजांची एवढी कीर्ति झाली आहे. तेव्हां माझ्या गरिबाकडे ते कशाला येतील ? पण ज्याअर्थी ते येत आहेत त्याअर्थी माझें भाग्य उदयाला आलें म्हणायचें ! ”

नंतर महिपति व केशव त्या ब्राह्मणाकडे जेवायला आले. ब्राह्मणानें त्यांचें चांगलें स्वागत केलें. इतक्यांत मागच्या प्रसंगाप्रमाणे आयत्या वेळीं दोन पाहुणे आले. व्याही व विहीणबाई आल्यामुळें त्या मंडळींसाठीं भोजनाचा बेत बदलावा लागला. मग ताबडतोब दूध-पुरीचा बेत झाला व सर्व मंडळी जेवून संतुष्ट झाली. त्या दिवसापासून त्या ब्राह्मणाच्या घरचें दारिद्र्य नष्ट झालें. लक्ष्मीची त्याच्यावर कृपा होऊन तो ब्राह्मण धनधान्यसंपन्न झाला; आणि प्रेमानें पंढरीच्या वाऱ्या करूं लागला. महिपतींच्या पायगुणानें त्या ब्राह्मणाचें सारेंच आयुष्य पार बदलून टाकलें होतें.

महिपति नंतर पैठणला गेले. नाथ-षष्ठी महोत्सवाचा काला होईपर्यंत ते पैठणलाच राहिले. गोदावरीच्या तीरावर असलेल्या मंदिरांत नाथांच्या दर्शनासाठीं असंख्य मंडळी येत होती. त्यांच्यासमोर महिपतींचें ‘ भक्तविजय ’ या ग्रंथाचें वाचन सुरू होतें. त्या ग्रंथांतील संतांचीं रसाळ चरित्रें ऐकून लोक अगदीं तल्लीन होऊन जात. चमत्कार असा कीं, महिपतींचें संतचरित्रांचें कथन ऐकण्यास प्रत्यक्ष एकनाथ त्या मंडळींत येऊन बसत. कोणीहि एकनाथ महाराजांना ओळखलें नाहीं. मात्र महिपतींनीं त्यांना बरोबर ओळखलें. महिपतींचें संतचरित्रवाचन सुरूच होतें. त्यांच्या वाचनांत एकनाथांचें आख्यान आलें. त्या आख्यानांत

जेव्हां एकनाथांचे सद्गुरू जनार्दनस्वामी यांचें नांव निघालें तेव्हां नाथांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. त्यावेळीं एकनाथ पुनः पुन्हां उभे राहिले आणि वारंवार नमस्कार करूं लागले. महिपतींनीं हा प्रकार बघितला.

एकनाथांनीं सद्गुरूंची एकनिष्ठेनें कशी सेवा केली हें महिपतींनीं ग्रंथाच्या प्रारंभींच लिहिलें आहे. महिपति नाथ-चरित्र वाचूं लागले. ते म्हणाले, "एकनाथ श्रीसद्गुरुस्वामींची अहर्निश सेवा करीत असे. रात्रीं जनार्दनस्वामी झोपले असतां एकनाथ त्यांचे पाय चेपीत असे. सद्गुरु झोपले असतां त्यांची झोपमोड होऊं नये म्हणून नाथ स्वतः न झोपतां गुरूच्या पायापाशीं तसाच बसून राही. नाथ आपल्या गुरूला स्वतःच्या हातांनीं स्नान घालीत असे. स्नान झाल्यावर गंध, अक्षदा, फुलें वगैरे पूजेचें साहित्य स्वतः तयार करी. पूजा झाल्यावर जेवणाचें पान तयार करून अत्यंत प्रेमानें जनार्दनस्वामींच्या तोंडांत घास घाली. जेवण झाल्यावर त्यांचा हात तो स्वतः धूत असे; आणि जनार्दनस्वामींच्या पानांत जें उरलें असेल तें प्रसाद म्हणून खाऊन आपली भूक तो भागवीत असे. गुरुजींच्या अशा एकनिष्ठ सेवेंत एकनाथाचा सारा वेळ जात असे."

हें सारें चरित्र ऐकून एकनाथ महिपतींना म्हणाले, "आपली वाणी अतिशय मधुर आहे. त्यामुळें माझें फार समाधान झालें आहे."

नंतर सारी मंडळी घरोघर निघून गेली. मग महिपतींनीं एकनाथांना साष्टांग नमस्कार घातला व ते म्हणाले, "आपण कोण आहांत हें मी ओळखलें आहे. आज आपण मला प्रत्यक्ष दर्शन दिलेंत. आपण साक्षात् महाविष्णूचे अवतार एकनाथ आहांत. सर्व लोकांच्या उद्धारार्थ आपण गोदातीरीं प्रकट झालांत. सद्गुरुसेवेची परिसीमा आपण जगाला दर्शविलीत. नामस्मरणानें महापापी लोकांचा कसा उद्धार होतो हें आपण जगाला दर्शवून दिलें. श्रीमत् भागवताचें प्राकृत भाषेंत कथन केलेंत.

रामायणाचा सारांश अवघ्या सात कांडांत आपण सांगितलांत. भागवतावरील टीका, अभंग, गौळणी असे नाना प्रकारचे ग्रंथ आपण रचलेत. आपला महिमा मी काय वर्णावा? आपली सेवा घडावी असें कांहींतरी सांगा. आपली सेवा करणें मला फार आवडेल."

यावर एकनाथ महिपतींना म्हणाले, "तुझ्याबरोबर साक्षात् परमेश्वर बोलतो. तेव्हां मी तुला अधिक सांगायला नको आहे. भक्तांच्या अशाच सुंदर कथा लिहाव्यात. संतसेवेशिवाय या जगांत दुसरें कोणतेंहि पुण्य नाहीं. बरें, येतों आतां मी."

असें म्हणून एकनाथ अंतर्धान पावले. नाथ-महोत्सवाचा काला झाल्यावर सर्व लोक आपापल्या घरीं निघून गेले. महिपतींनींहि क्षेत्राला नमस्कार केला व ते निघाले. वाटेंत एक दिवस शिराळ चिंचोली या गांवीं त्यांचा मुक्काम पडला. दुसरे दिवशीं त्यांनीं तें गांव सोडलें. दोन मैल ते चालून गेले असतील इतक्यांत त्यांना वाटेंत एक ब्राह्मण भेटला व घाबरून जाऊन काकुळतीनें तो महिपतींना म्हणाला, "कसेंहि करून माझें रक्षण करा हो! माझ्या पाठीमागें एक भयंकर नाग लागला आहे, व तो मला दंश करूं पाहात आहे. तरी मला वाचवा हो!"

महिपतींनीं अभय देऊन त्या ब्राह्मणाला पाठीशीं घातले. आपला फणा उभारून विषारी फूत्कार टाकीत तो नाग समोरच उभा होता. कांहीं वेळानें तो वेटोळें घालून बसला. कांहीं केल्या जागचा हालेना. काय होतें तें बघण्यासाठीं सारे लोक धांवून आले. समोर प्रत्यक्ष काळ उभा असलेला बघून सारी मंडळी जरा दूरच उभी राहिली. महिपतींच्या मागें उभ्या असलेल्या त्या ब्राह्मणाची बोबडी वळली. मग महिपतींनीं त्या नागाला वंदन केलें व ते म्हणाले, "आपण जर हा तमोगुण टाकून दिलांत तर आपलें कल्याण होईल. आपण केलेल्या जन्मोजन्मींच्या पातकांमुळें अशा हिंस्र योनींत आपला जन्म झाला. पण

सुदैवानें म्हणा आजचा हा योग जुळून आलेला दिसतो. आतां तुम्हांला जन्म-मरणाचें कांहींच कारण उरलेलें दिसत नाहीं. मात्र मी काय सांगतों तें कृपा करून ऐका. या ब्राह्मणाची मला गरज आहे. तरी एवढी भिक्षा मला घाला. त्याला झाली एवढी शिक्षा पुरे झाली. आतां माझी अधिक उपेक्षा करूं नका."

महिपतींची ही विनंती ऐकून त्या नागानें वेटोळें काढलें आणि विकलांग होऊन तो महिपतींच्या पायापाशीं पडला व निश्चेष्ट झाला.

संतदर्शनानें वाघ, सिंह, सर्प इत्यादि हिंस्र प्राणी आपला तमोगुण टाकतात हीच गोष्ट खरी. मग तो ब्राह्मण महिपतींना कृतज्ञतेनें म्हणाला, "आपल्यामुळेंच माझे प्राण वाचले."

हा सारा अद्भुत प्रकार पाहून सारे लोक भारावून गेले, आणि म्हणूं लागले, "सर्पासारखा भयंकर प्राणी, पण तोसुद्धां संतासमोर नम्र झाला. खरोखर आपण इतके दिवस अंधळ्यासारखे अंधकारांत चाचपडत होतों. पण आज महिपतीमहाराजांनीं आपले डोळे उघडले."

तो ब्राह्मण पुन्हां म्हणाला, "खरोखर साक्षात् कामधेनु मला सांपडली. आजपर्यंत व्यर्थ आम्ही जगलों. गुरूकडून प्राप्त झालेल्या ज्ञानाशिवाय आमचें मनुष्यपण व्यर्थ होय. खरोखर आमच्यापेक्षां पशूच ज्ञानी म्हटले पाहिजेत. कारण सत्पुरुषाचा अनुग्रह होण्यास पूर्वजन्मींचीच पुण्याई हवी!"

एवढें बोलून त्या ब्राह्मणानें महिपतींना अनन्यभावानें नमस्कार केला. त्या ब्राह्मणाचें मनोगत ओळखून महिपति त्याच्या घरीं दोन दिवस राहिले. महिपतींनीं या मुक्कामांत सर्वांना हितकर असा उपदेश केला, व पंढरीची वारी करण्यास सांगितलें. मग आपल्या केशव नांवाच्या शिष्याला ते म्हणाले, "आतां आपण पुढच्या गांवीं जाऊं या!"

सर्वांचा निरोप घेऊन मग ते जवळें या गांवीं आले. तेथें महिपति कीर्तनासाठीं उभे राहिले. कीर्तनाला बरीच मंडळी जमली होती. त्या

मंडळींत साक्षात् पांडुरंग उपस्थित होते. त्यामुळेंच कीं काय कीर्तनाला अपार रंग भरला. श्रोते म्हणाले, "आम्ही आजपर्यंत असें कीर्तन कधीं ऐकलें नव्हतें. सुदैवानेंच हा योग घडून आला. आम्ही आजपर्यंत महिपति महाराजांचें नुसतें नांव ऐकत होतों. पण आज त्यांचें कीर्तन ऐकण्याचा प्रत्यक्ष योग घडून आला. आमचें सद्भाग्यच थोर!"

महिपतींच्या कीर्तनाला अवघा गांव लोटला होता. ज्या स्त्रीच्या घरीं महिपतींचा मुक्काम होता ती दुर्दैवी स्त्री मात्र घरींच राहिली होती. कारण तिच्या एकुलत्या एक मुलाची प्रकृति बरी नव्हती. तिला कीर्तनाला जाण्याची अतिशय इच्छा झाली. कारण पुन्हां अशी संधि येणार नव्हती. तिनें आपल्या मनाचा हिय्या करून आपल्या प्रिय पुत्राला विचारलें, "बाळा, मी जाऊं का रे कीर्तनाला? तूं सांगत असशील तर जातें."

पण बाळ आपल्या मातेच्या आधींच पांडुरंगाच्या घरीं कीर्तन ऐका-यला गेला होता. मग तो काय उत्तर देणार? आईनें पुनः पुन्हां नीट न्याहाळून आपल्या प्रिय पुत्राकडे बघितलें आणि एकदम टाहो फोडला. तिचा पुत्र तिला कायमचा सोडून निघून गेला होता. मग रडण्यापलीकडे त्या मातेच्या हातीं दुसरें काय होतें? ती हंबरडा फोडून म्हणूं लागली, "माझ्या बाळाला कोणी नेलें हो? त्याला नेत असतांना देव काय झोपले होते? का माझ्या घरीं संत आले म्हणून हा प्रकार घडला? 'संत येती घरा, तोचि दिवाळी-दसरा' असें म्हणतात. पण माझ्याबाबतींत संत मला धार्जिणे ठरले नाहींत. महिपतींना घरीं येऊं देण्याची दुर्बुद्धि मला कशी हो झाली? देवा, मी आतां काय करूं रे? कुणाला हांक मारूं? का बाळाला अशीच घेऊन कीर्तनांत जाऊं? सांग कुणाला काय विचारूं तें!"

नंतर तिनें आपल्या मृत पुत्राला आपल्या खांद्यावर टाकलें व दारुण शोक करीत, रडत-ओरडत ती कीर्तनाच्या जागीं आली. तिनें आपल्या

पुत्राचें प्रेत कीर्तनाच्या मधोमध ठेवलें; व ती तेथील सर्व लोकांना सांगूं लागली, "पाहा हा संतांचा पायगुण. हा माझा आजारी मुलगा माझ्याशीं बोलत होता, 'मला आज बरें वाटतें' असें सुद्धां म्हणाला होता, पण संतांना पाहिल्यानंतर मात्र हा मुलगा बोलेनासा झाला. ह्यांच्यामुळें—या संत महिपतींच्यामुळें जर हा मुलगा जिवंत झाला नाहीं तर सध्यां घरोघर जे भोंदु संत दिसतात त्याप्रमाणें यांना मी समजेन."

नंतर तिनें त्या प्रेताचेंच चुंबन घेतलें व ती म्हणूं लागली, "बोल कीं रे बाळ! एक शब्द जरी बोललास तरी पुरे आहे. बोल, बोलतोस ना?"

तो बोलत नाहीं असें बघून ती मोठ्यांदा ओरडली, "या क्षणीं देव धांवत कां येत नाहीं? तेहतीस कोटि देव असून या क्षणीं एकाहि देवाला यायला सवड नाहीं का? कां देवांत देवपणच शिल्लक उरलें नाहीं?"

कीर्तनाचा रसभंग झाला. सर्व लोक तिला म्हणूं लागले, "ए बाई, मृत्युनें का कोणाला सोडलें आहे? राजा, भिकारी, श्रीमंत, दरिद्रि, लहानमोठा मृत्यूला सर्व सारखेच आहेत. एवढेंच काय पण संतांनासुद्धां तो सोडीत नाहीं. या मर्त्य लोकाची रीतच मुळीं तशी आहे!"

त्या दुःखी स्त्रीला परोपरीनें लोक सांगत होते पण त्या मातेचा शोक आवरत नव्हता. मग महिपति त्या मुलाच्या प्रेताजवळ आले व त्या मुलाच्या डोक्यावर हात ठेवून त्यांनीं नामस्मरण केलें. ते म्हणाले, "हे केशवा, नारायणा, मुकुंदा, आनंदकंदा, आतां लवकर प्रसन्न हो. तूं द्रौपदीची लाज राखलीस, प्रल्हादाचें रक्षण केलेंस. तेव्हां हे पतितपावना आतां आमचीहि लाज राख. तुझ्या नांवाची ख्याति उमाशंकर सांगतात. मग तें सारें खोटें समजावें काय? तूं भक्तांच्याजवळ वास्तव्य करतोस अशी

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ........
पो. दि. ........



तुझी ख्याति तूं खरी करून दाखवीत नाहींस ? मी तुझा भक्त नाहीं का ? सांग तरी काय तें !"

सर्व श्रोत्यांचीं मनें एक क्षणभर का होईना पण साशंक झालीं. अजून श्रीहरि कां बरें येत नाहींत ? श्रीहरि कोठे अडकून पडले आहेत ? का एखाद्या भक्तावर संकट आल्यामुळें तें निवारण्यासाठीं ते तिकडे गेले आहेत ? सर्वजण श्रीहरिचा धांवा करूं लागले. त्यांच्या नेत्रांतून एकसारखे अश्रु ओसंडत होते. महिपति म्हणाले, "देवा, तूं आला नाहींस या दुःखापेक्षां तुझें कीर्तन बंद पडलें म्हणूनच मला अतिशय दुःख होत आहे. माझी ही स्थिति तूं जाणतोसच !"

महिपतींचे आर्त उद्‌गार ऐकून चक्रपाणीला त्यांची दया आली. प्रेतानें आपले नेत्र उघडले आणि 'आई' म्हणून मुलानें हांक मारली. मुलानें उठून चहूंकडे बघितलें. तो म्हणाला, "मी इकडे कोणीकडे आलों ? कशासाठीं एवढी मंडळी जमली आहेत ?"

त्या मुलाकडे पाहून मातेच्या आनंदाला पारावर उरला नाहीं. सर्व लोक हर्षभरित झाले. 'महिपतीच्या नादीं लागलों म्हणून आम्हांला पांडुरंग भेटला' असेंच सर्वांना वाटलें. सर्वांनीं महिपतींचा जयजयकार केला. मग महिपतींनीं वनमाळीला अनन्यभावानें ओंवाळलें. पांडुरंगाला वश केल्याबद्दल साऱ्यांनीं महिपतींना धन्यवाद दिले. सगळ्यांनीं विठ्ठलनामाचा गजर केला, व लोक घरोघर समाधानांत निघून गेले.

महिपतींवर सर्वांचा अतोनात विश्वास बसला. गांवांत जे दुःखी होते, रोगग्रस्त होते ते सारे महिपतींच्या दर्शनाला धांवून आले. सर्वांना पांडुरंगाचें तीर्थ दिलें असतां सारे लोक रोगमुक्त झाले. नंतर केशवासह महिपति ताहराबादला परतले.

• • •

कांहीं दिवसांनंतर महिपति पंढरीच्या वारीला निघाले. एका शहरीं त्यांचा मुक्काम पडला. तेथेंहि त्यांनीं भजन, कीर्तन करून सर्व लोकांना

सन्मार्गाला लावलें. त्या शहरांत एक दुष्ट माणूस होता. त्याला भजन, कीर्तन कांहींहि आवडत नसे. त्याचे आई-वडीलहि ईशसेवेपासून सर्वस्वीं अलिप्त होते. सुदैवानें त्याची बायको मात्र सद्‌गुणी होती, पण त्या अश्रद्ध लोकांच्या घरीं तिला फार जाच होत असे. त्या माणसाचे आई-वडील व तो स्वतः तिला म्हणत असत, " या घरांत देवाचें कांहींहि होतां कामा नये. तुला जर भजन-पूजन करावयाचें असेल तर या घरांत तुला थारा मिळणार नाहीं. हें जर तुला ऐकायचें नसेल तूं वार-कऱ्यांबरोबर पंढरीला चालूं लाग. संसार सोडून तुला ईश्वरोपासनेचे चाळे सुचताहेत ! आणि खबरदार जर त्या महिपतीच्या कीर्तनाला गेलीस तर ! जर त्याच्या कीर्तनाला गेलीस तर तंगडी मोडून टाकीन. "

अशा तऱ्हेच्या धमक्या तिला नेहमींच सासू-सासऱ्यांकडून मिळत. ती मनांतून अतिशय कष्टी होई. मग एखादे वेळीं तिनें मनांत विचार करावा, " मानवी देह मिळूनसुद्धां चक्रपाणी माझी सेवा घेत नाहीं ना ? असें काय पाप केलें होतें मी कीं, त्यामुळें अभक्तांच्या घरीं मी पडलें ? तरी पण पंढरीनाथानें मला या घरीं दिलें हें एकापरी चांगलें झालें. कारण मला जर सासुरवास झाला नसता तर माझें मन या असार संसा-रांत रमलें असतें आणि मी हरिचिंतनाला अंतरलें असतें. आतां मला आज जें सुचेल तें मी करणार आहें. आज एकादशी. हरिजागर आहे आज ! तेव्हां आज मी नक्कीच देवळांत जाणार. मला जरी सासू-सासऱ्यांनीं व पतीनें मारून टाकलें तरी हरकत नाहीं. देह हा कधींतरी पडणारच आहे. मग उगाच काळजी कशाला करा ? "

त्या दिवशीं ती कोणाशीं एक चकारशब्दहि बोलली नाहीं. रात्रीं सर्व लोक झोपले आहेत असें पाहून ती तडक देवळांत गेली.

देवळांत महिपतींचें कीर्तन सुरू होतें. त्या ठिकाणीं संतांचें गुणगान चालूं होतें. संतचरित्राचें श्रवण करतांना या स्त्रीचें मन रमून गेलें.

कीर्तनाला अद्‌भुत रंग भरला; आणि ही बाई शांतपणानें कीर्तन ऐकत होती.

घरीं तिच्या पतीला जाग आल्यावर तो आपल्या आईला म्हणाला, "इतकें सांगूनहि ती शेवटीं कीर्तनाला गेलीच तर!"

यावर त्याची आई अत्यंत रुष्ट स्वरांत म्हणाली, "अरे शेळपटा, तुला ती मुळींच जुमानत नाहीं. अगदींच असा कसा तूं? फुकट आहे तुझें जिणें! तुझी बायको तुला न सांगतां गेली हें सांगायला तुला लाज कशी वाटत नाहीं रे?"

आईचे हे रुष्ट स्वरांतील बोल ऐकून तो दुष्ट माणूस तडक देवळांत गेला. त्याचा राग अनावर झाला होता. तिचे केस धरून तिला फरफटत ओढीत आणावें अशी अनावर इच्छा त्याला झाली. देवळांत गेल्यावर त्याची पत्नी स्त्रियांमध्यें बसलेली त्याला दिसली. आरती झाल्यावर सर्वांबरोबर महाराजांना नमस्कार करण्यासाठीं ती गेली. महिपतींच्या समोर जातांच तिला रडूं कोसळलें. त्यांच्या पायांवर डोकें ठेवून तिनें आपली करुण कहाणी त्यांना कशीतरी कथन केली. ती सद्‌गदित होऊन म्हणाली, "आपलें दर्शन पुन्हां होईल असें वाटत नाहीं." असें म्हणून ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

महिपतींना तिची दया आली. तिचें सांत्वन करीत ते म्हणाले, "पांडुरंगाच्या कृपेनें तुझें कल्याण होईल. तुझीं सर्व संकटें दूर होतील."

महिपतींना नमस्कार करून ती घरीं आली. तिच्या पाठोपाठ तिचा नवराहि आला. त्यानें दाराला कडी लावून घेतली; व बायकोला फरफटत ओढून तो म्हणाला, "कीर्तनाला गेली होतीस काय? न विचारतां? थांब तुझें तंगड तोडतो!"

असें म्हणून त्यानें तिचे केस जोरानें हिसडले आणि एखाद्या विषारी सर्पाप्रमाणें तो तिला कडकडून चावला. नंतर त्यानें तिला काठीनें सपा-

सप सपाटे मारले व लाथाहि घातल्या. तिची सासूहि आपल्या प्रिय पुत्राच्या मदतीस धांवून गेली. सासूनेंहि सुनेला रपाटे लगावले व गालगुचे ओढून ती म्हणाली, " अवदसे, तुझ्या अंगांत माज आला आहे काय ? "

सुनेला तो साराच प्रकार असह्य झाला; पण रडण्याशिवाय तिच्या हातांत दुसरें कांहींहि नव्हतें. तिचें ओरडणें ऐकून शेजारीपाजारी धांवले पण घराला आंतून कडी असल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला. शिवाय आंत गेले तरी हीं माणसें ऐकण्यांतलीं नाहींत याबद्दल त्यांना खात्री होती. मग त्या मंडळींनी महिपतींच्या कानांवर हा प्रकार घाल-ण्याचें ठरविलें व ती मंडळी देवळांत गेली.

मंडळी देवळांत गेली पण त्या ठिकाणीं महिपति दिसले नाहींत. सभोवताली तपास केला पण ते आढळले नाहींत. एवढ्या रात्रीं हे कोठें गेले असतील असा विचार सर्वांच्या मनांत आला. अखेरीस सारी मंडळी आपापल्या घरीं निघून गेली.

इकडे या ब्राह्मणाच्या घरीं महाभयंकर प्रकार घडत होता. त्या बाईच्या सासऱ्याला सारा प्रकार कळल्यावर तो म्हणाला, " हिचे पाय तोडून टाका. म्हणजे पुन्हां ती कीर्तनाला जाणार नाहीं."

आणि खरोखरच सासूनें सुनेचे पाय धरले व नवरा आपल्या बाय-कोचे पाय तोडण्यास विळी घेऊन पुढें सरसावला. मग मात्र त्या बाईला आभाळ फाटल्यासारखें झालें. समोर जणूं प्रत्यक्ष यम उभा राहिला होता. मग जमिनीवर डोकें आपटून ती ओरडूं लागली, " मला मदत करायला यावेळीं कोणीच येणार नाहीं ? माझी आतां धडगत दिसत नाहीं. हे पांडुरंगा, हे महिपति महाराजा, तुम्ही माझ्या मदतीला धांवून या रे. महिपति महाराजा, आतां तूंच माझा भाऊ आहेस; माता, पिता सर्व कांहीं तूंच आहेस. "

तिचा हा करुणाजनक विलाप ऐकून महिपति तेथें खरोखरच प्रगट झाले; व आपले पाय पुढें करून ते म्हणाले, "हं, हे पाय तोडा. कारण खरोखर हेच पाय अपराधी आहेत. हे पाय जर येथें आले नसते तर कशाला इतकी वेळ आली असती? या मुलीचा कांहींच दोष नाहीं."

मग तिचा पति म्हणाला, "सगळ्या दारांना आंतून कड्या असतांना तूं रे येथें कसा आलास तें सांग पाहूं!"

महिपति म्हणाले, "परमेश्वर जसा सर्वव्यापक तसाच त्याचा सेवक. तुमची पूर्वपुण्याई थोर म्हणून तुम्हांला अशी सद्‌गुणी बायको मिळाली. हिच्यामुळें प्रत्यक्ष पांडुरंगाचे पाय तुमच्या घराला लागले. तुमचें कल्याण होईल."

सासू-सासरे मग सुनेला म्हणाले, "आपली पूर्वपुण्याई थोर म्हणूनच देवानें आपल्याला पावन केलें. तूं जर आमचें ऐकलें असतेंस व कीर्तन न ऐकतां घरींच राहिली असतीस तर या संतांचे पाय आपल्या घराला लागले नसते. आतां मात्र तूं पंढरपूरला जा."

त्या बाईच्या सासू-सासऱ्याला व तिच्या पतीला परमावधीचा पश्चात्ताप झाला, व त्या सर्वांनीं महिपतींकडून अनुग्रह घेतला. तिघेहि मुळांत दुष्ट असून अखेरीस ते महिपतीचे भक्त बनले. पुढें ते सतत भजन-पूजन करूं लागले. आषाढी-कार्तिकीला पंढरीची वारी करूं लागले. महिपतींच्या सान्निध्यानें त्यांचा उद्धार झाला होता. एवढेंच नव्हे तर त्या गांवांतील इतर दुर्जनहि ही हकीगत ऐकून सज्जन बनले. सत्संगतीचा प्रभाव फार थोर असतो हीच गोष्ट खरी!

• • •

एकदां महिपतींचा मुक्काम पंढरींत होता. त्याचवेळीं जगद्‌गुरु श्रीशंकराचार्य यांचाहि मुक्काम पंढरपुरांत होता. एक दिवस जगद्‌गुरु पांडुरंगाच्या दर्शनाला जात असतांना त्यांना एक वारकरी भेटला. तो

वारकरी तेजःपुंज असून त्याच्या गळ्यांत तुळशीच्या माळा होत्या. खांद्यावर पताका असल्यानें तो फारच शोभून दिसत होता. तोंडानें त्याचा एकसारखा नामजप सुरू असे. पांडुरंगाच्या मंदिरांत महिपतींच्या 'भक्तविजय' या ग्रंथाची हस्तलिखित पोथी होती. तो ग्रंथ वाचण्याचा त्याचा नियम असे. एकदोन अध्याय वाचल्यावर तो पुन्हां नामस्मरणांत दंग होई. जगद्गुरुंची व त्याची गांठ पडल्यावर जगद्गुरूंनीं त्याला विचारलें, "भक्तविजय या ग्रंथाचा लेखक कोण? मला त्या ग्रंथाची प्रत मिळेल कां?"

तो वारकरी म्हणाला, "भक्तविजय हा ग्रंथ ताहराबादच्या महिपतींनीं लिहिला आहे. पांडुरंगानें या ग्रंथाची रचना महिपतींना सांगितली व त्यांनीं तो ग्रंथ लिहिला. आपण सांगत असाल तर महिपतींची व आपली भेट करून देईन."

आचार्य म्हणाले, "माझी व त्यांची भेट घडवून आणलीत तर मला अतिशय आनंद होईल."

मग महिपतींचा शोध करून श्रीशंकराचार्य महिपतींकडे गेले. त्यावेळीं महिपति जेवण्यास बसण्याच्या तयारींत होते. आचार्यांना आलेले पाहून त्यांना अत्यानंद झाला.

जेवण झाल्यावर महिपतींनीं जगद्गुरूंना आदरानें नमस्कार केला व ते म्हणाले, "माझ्यावर आपला अनुग्रहच झाला. आपण जर मला आज्ञा केली असती तर मीच आपणांकडे आलों असतों. आपण कशाला उगाच त्रास घेतलांत?"

नंतर वेगवेगळ्या विषयांवर आचार्य आणि महिपति यांचीं बोलणीं झालीं. वैराग्य, द्वैत-अद्वैत वगैरे वेदान्तपर विषय त्यांच्या बोलण्यांत आले. महिपतींचा 'भक्तविजय' हा ग्रंथ आचार्यांनीं उतरवून घेतला.

चातुर्मासांत पंढरीला राहून महिपति मग आळंदीला आले. आळंदीला

आल्यावर त्यांनीं ज्ञानेश्वरीचीं कांहीं पारायणें केलीं. एक दिवशीं सकाळीं अजानुवृक्षाखालीं ज्ञानेश्वरी वाचीत असतांना एका ब्राह्मणानें त्यांना विचारलें, " या ठिकाणीं बसून जर ज्ञानेश्वरी वाचली तर ज्ञानेश्वरीचा यथार्थ अर्थ कळतो व प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांचें दर्शन होतें, असें लोक म्हणतात. तेव्हां कृपाकरून आपला काय अनुभव आहे हें मला सांगा. "

महिपति त्याला म्हणाले, " मला या गोष्टीचा प्रत्यय आलेला आहे. मी जर आपणांस ओळखलें नसतें तर तुमच्यासारखाच प्रश्न मी तुम्हांला विचारला असता. "

नंतर त्यांनीं त्या ब्राह्मणाला—प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांना नमस्कार केला व ते म्हणाले, " माझ्या जन्माचें सार्थक झालें. पूर्वसंचितानेंच आपलें दर्शन घडलें. आपली खूण पटली. "

नंतर महिपति देहूला येऊन राहिले. त्याहि ठिकाणीं संत तुकारामांनीं त्यांना स्वप्नांत दर्शन दिलें.

• • •

सारा संचार आटोपून महिपति ताहराबादला स्वगृहीं परतले. ते जेव्हां ताहराबादला आले तेव्हां तेथें महाभयानक दुष्काळ पडला होता. अन्नावांचून लोक पटापट मरूं लागले आणि जे जिवंत राहिले ते गांव सोडून गेले. महिपति ताहराबादला परत आले आहेत हें कळल्यावर दुष्काळग्रस्त भागांतील ब्राह्मण त्यांच्या घरीं आले, व म्हणाले, " अन्नदान करून आमचे प्राण वाचवावेत. आम्ही व्याकुळ झालों आहोंत. साक्षात् पांडुरंग तुमचा ऋणी आहे. त्याला आमची दया आली नाहीं म्हणून तर आम्ही तुमच्या दारीं आलों आहोंत. "

महिपति त्या सर्वांना नमस्कार करून म्हणाले, " आपण साक्षात् भूलोकींचे देवच आहांत. मी आपला सेवक आहे. तुमची विनंती मला मान्य आहे. "

मग त्यांच्या जेवणाची तयारी झाली व सर्व ब्राह्मणमंडळी जेवायला बसली. नाना तऱ्हेचीं पकान्नें केलीं होतीं. सर्व पदार्थ वाढले. तूप वाढून संकल्प सोडला तेव्हां सर्व ब्राह्मण खिन्न असलेले दिसले. महिपतींनीं त्यांच्या खिन्नतेचें कारण विचारलें तेव्हां ते म्हणाले, "आम्ही इकडे पंचपक्वान्नें झोडणार पण आमची बायका-मुलें मात्र घरीं तडफडत असतील. खरोखर आम्ही निर्दय आहोंत."

महिपति म्हणाले, "तुम्ही मुळींच खेद करूं नका. पांडुरंगाच्या कृपेनें मी तुम्हांला शक्य तें साहाय्य करीन. तुम्ही सुखानें जेवा."

सर्वांचीं जेवणें झालीं. महिपतींनीं त्या ब्राह्मणांना विडा-दक्षिणा दिली नंतर त्यांनीं आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवलें व ते म्हणाले, "आतां माझें घर निःसंकोच मनानें लुटा."

असें म्हणून ते घराबाहेर पडले. मग ज्याला जें सांपडेल तें त्यानें नेलें. कपडे, धान्य सारें कांहीं धुवून नेलें. कोणाला मुसळ सांपडलें, कोणाला वरवंटा सांपडला, कोणाला पोळपाट तर कोणाला जातें, दोरखंड, लांकूडफाटा, या गोष्टी सांपडल्या. एकानें चुलींतील राख घेऊन ती आपल्या कपाळाला लावली व तो म्हणाला, "माझें कुलदैवत संत असल्यामुळें ही राखच माझें संरक्षण करील."

याप्रमाणें भर दुष्काळांत महिपतींनीं आपल्याजवळ होतें-नव्हतें तें सारें दान करून टाकलें व तें केल्यानंतर ते कृतकार्य झाले.

• • •

ताहराबादला एखादें पांडुरंगाचें देवालय बांधावें असें एकदां महिपतींच्या मनांत आलें. पण मंदिर बांधणें ही गोष्ट कांहीं साधी नव्हती. त्यासाठीं पैसा हवा व महिपतींच्याजवळ तर द्रव्याचा अभाव होता. त्यांचें घर नुकतेंच ब्राह्मणांनीं लुटलें होतें. त्यामुळें त्यांच्याजवळ आतां कांहींहि शिल्लक उरलें नव्हतें. ज्यांच्या अंगीं कमालीचें दातृत्व असतें त्यांच्याजवळ

द्रव्याची नेहमींच वाण असते. महिपतींचा सारा भार पांडुरंगावर होता. एके दिवशीं हात जोडून ते पांडुरंगाला म्हणाले, " पांडुरंगा, तुझें मंदिर बांधावें असें माझ्या मनांत फार आहे. पण माझ्याजवळ द्रव्य नाहीं ही गोष्ट तूं जाणतोस. तुला अशक्य काय आहे ? चंद्र, सूर्य अथवा ग्रह यांच्या भ्रमणाला तूंच कारणीभूत आहेस. अचेतनाला चेतना आणण्याचें सामर्थ्य तुझ्यांत आहे. तुझ्या वाणीनें वेद निर्माण केले. असें तुझें सामर्थ्य असतांना मी निष्कारण कशाला काळजी करूं ? "

थोड्याच वेळांत कांहीं श्रीमंत मंडळी महिपतींकडे आली व म्हणाली, " पांडुरंगाचें एखादें मंदिर बांधावें असें आमच्या मनांत आहें. संतांचा सल्ला घ्यावा म्हणून आम्ही आपणांकडे आलें आहोंत. तरी आम्हांला आज्ञा करावी. "

महिपतींच्या मनांतील इच्छा पूर्ण होणार होती. त्यामुळें त्यांना आनंद झाला. ते त्या लोकांना म्हणाले, " आपण जर देऊळ बांधलें तर सर्वांना फार आनंद होईल. तेथें झाडें लावलींत तर पक्ष्यांना छाया मिळेल. अन्नछत्र घातलेंत तर भुकेल्यांना संतोष होईल. सारे लोक तेथें दर्शनाला येतील; आणि त्यायोगें भरपूर पुण्यसंचय होईल. "

महिपतींची इच्छा पाहून सर्वांनीं तेथें देऊळ बांधलें. महिपतींना समाधान झालें. त्या देवळांत भजन-पूजनास गर्दी लोटूं लागली. एक माकडीणहि त्या देवळांत येई व टाळ वाजवून भजन करी. तिचा ताल मुळींच चुकत नसे. ती अगदीं भजनांत तल्लीन होऊन जाई. जेव्हां जेव्हां इतरांचें भजन सुरूं होई तेव्हां ती शांतचित्तानें तें ऐकत बसे. हा चमत्कार पाहून अनेकांना आश्चर्य वाटे.

एके दिवशीं कोणीतरी महिपतींना म्हणाले, " या माकडीचें आम्हांला अशुभ दर्शन नको. "

त्या माकडीला महिपतींनीं आपल्या मांडीवर घेतलें व त्यांनीं तिला

एक रुमाल दिला. ते तिला म्हणाले, "कोणी स्त्री-पुरुष दर्शनाला आल्यावर त्यांना तुझें तोंड दाखवूं नकोस. या रुमालानें तोंड झाकत जा. कीर्तनांत मात्र साधुसंतांना आदरानें नमस्कार करण्यास चुकूं नकोस."

असें कांहीं दिवस गेले. त्या माकडीचे निजधामास जाण्याचे दिवस जवळ आले. एके दिवशीं प्रातःकाळी ती उठली. तिनें स्नान केलें. पांडुरंगापुढें हात जोडून तिनें प्रदक्षिणा घातल्या. माळ घेऊन जप जपला. नंतर महिपतींच्या मांडीवर ती गडबडा लोळूं लागली. महिपति म्हणाले, "आज हिचा अवतार संपणार."

नंतर तिच्या अंगावरून त्यांनीं हात फिरविला. लगेच त्या माकडीचे प्राण ब्रह्मांत विलीन झाले. सर्वांना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, "या माकडीला पशु कोण म्हणेल? चौऱ्याऐंशीं लक्ष योनींमध्यें अत्यंत श्रेष्ठ असा मानवदेह असतो. त्या मानवी देहाचें साध्य हिनें पशु होऊन साधलें."

महिपतींनीं मग त्या माकडीची यथासांग उत्तरक्रिया केली. योग्यांनाहि दुर्लभ असा जटायूसारखा योग तिनें साधला.

• • •

कांहीं दिवसांनीं ताहराबादचे नागरिक महिपतींना म्हणाले, "आमची तुम्हांला एक विनंती आहे. या गांवांत पाण्याचें अत्यंत दुर्भिक्ष्य आहे. गांवांतील सर्व स्त्री-पुरुषांना पाणी म्हणजे भयंकर काळजीचा विषय आहे. पशुपक्ष्यांचें काय हाल होत असतील याची कल्पनाच करवत नाहीं. आपण विष्णुभक्त आहांत. साक्षात् पांडुरंग आपणांस सहकार्य देतो. मग आम्ही दुसऱ्या कोणाकडे जावें? आपल्या गांवांत कोठेंहि पाणी लागेल तर आपली त्रिभुवनांत कीर्ति होईल."

महिपतींना त्यांची दया आली. ते देवापुढें उभे राहिले; व हात जोडून म्हणाले, "पंढरीनाथा, तूं माझ्या पाठीमागें विनाकारणच एकेक

उपाधि लावीत आहेस. अर्थात् कर्ताकरविता तूंच असल्यामुळें या सर्व क्रिया मी तुझ्याचसाठीं करीत असतों."

मग पांडुरंग महिपतींना म्हणाला, "तूं सांगशील तेथें पाणी लागेल."

हें ऐकून महिपतींना आनंद झाला. त्यांनीं गांवच्या लोकांना बोलाविलें व अमुक ठिकाणीं पाणी लागेल, असें सांगितलें. त्याप्रमाणें बरेच लोक तेथें जमले. मुहुर्त पाहून खणण्यास प्रारंभ झाला; आणि काय आश्चर्य ! गांवांतील सगळ्या विहिरी, तलाव, आड आटले असतांना तेथें जिवंत पाण्याचा झरा लागला. संतकृपेचें सर्वांनाच कौतुक वाटलें. मग महिपति सर्वांना म्हणाले, "तुम्ही नित्य पंढरीला जात जा. परमेश्वरावर श्रद्धा व भरंवसा ठेवल्यावर तुला कांहींच कमी पडायचें नाहीं."

ताहराबादजवळ महिपतींची एक बाग होती. गर्द अशा वृक्षराईमुळें तें ठिकाण अतिशय रम्य व चित्ताकर्षक होतें. महिपति रोज सकाळीं तेथें फुलें, तुळशी वगैरे आणावयास जात असत. पण उन्हाळ्यांत पाणी नसल्यामुळें फुलें, झाडें सुकून जात. तेव्हां तेथें एक विहीर खणावी, असें महिपतींच्या मनांत आलें. मग त्यांनीं एक जागा निश्चित करून विहीर खणण्यास सुरुवात केली. त्यावेळीं चमत्कार घडला. बारा वर्षांचा एक मुलगा धांवत येऊन महिपतींना म्हणाला, "विहिरीसाठीं तुम्ही निवड-लेली जागा, थोड्याशा फरकानें चुकली आहे. मी तुम्हांला दुसरी योग्य जागा दाखवितो."

महिपतींनीं त्या मुलाकडे कुतूहलानें पाहिलें असतां त्या दैदीप्यमान बालकाला कोठेंहि पाहिल्याचें त्यांना आठवलें नाहीं. त्याच्या कोमल कंठांत तुळशीची माळ होती. भालप्रदेश कस्तुरीच्या टिळ्यांनीं शोभायमान झाला होता. कमरेला पीतांबर होता. त्याच्या पायांत तोडे होते. त्याचा तो थाट पाहून महिपतींना हर्ष झाला; आणि त्यांनीं त्या मुलाला मिठी मारली.

मग त्या बालस्वरूपांत आलेले चक्रपाणी म्हणाले, "आतां तर याच ठिकाणीं भागीरथीसारखें पाणी लागेल. तें पाणी प्यायल्यानें एखाद्याचें बुद्धिमांद्यसुद्धां जाईल."

असें म्हणून पांडुरंग अदृश्य झाले. आकाशांत क्षणार्धांत विद्युल्लता चमकून ती नाहींशी व्हावी तसाच प्रकार घडल्यानें महिपतींना आश्चर्य वाटलें.

• • •

नांदूर गांवच्या खंदर माळावर धोंडीबुवा या नांवाचे एक संत राहात असत. ते वारकरी संप्रदायांतले होते. बरेच दिवस ते व महिपति बरोबरच पंढरपूरला जात असत.

एकदां महिपतींनीं त्यांना विचारलें, "आमची व तुमची एवढी मैत्री आहे. तेव्हां आमच्याबरोबर तुम्ही निजधामाला याल कां?"

यावर धोंडिबुवा म्हणाले, "मी आपणाला कधींहि व कोठेंहि अंतर देणार नाहीं."

आणि घडलेंहि तसेंच. आषाढ कृष्ण द्वादशी हा दिवस निजधामास जाण्यासाठीं महिपतींनीं ठरविला पण तो दिवस महोत्सवाचा असल्यानें त्यांनीं आपला बेत पुढें ढकलला. गोकुळाष्टमी झाल्यावर श्रावणी सोमवारच्या एकादशीचा मुहूर्त त्यांनीं निश्चित केला. त्याप्रमाणें संतांना निमंत्रणें गेलीं. राहुरीहून संन्यासीबुवांना बोलाविलें.

सारी मंडळी गोळा झाल्यावर महिपतींनीं सर्वांना वंदन केलें व ते म्हणाले, "मी सर्व बाजूंनीं दीन आहे. पांडुरंगानें आज्ञा केली म्हणूनच भक्तांच्या गोष्टी मी लिहून ठेवल्या. 'संत-विजय' ग्रंथ लिहिण्याची माझी मनीषा होती. पण हृदयस्थ पांडुरंगाची मला आज्ञा झाली कीं, 'या भूतलावर माझे भक्त अनेक होतील. त्यांचीं चरित्रें मी कोणाला तरी लिहावयास सांगेन.' मला पांडुरंगाची निजधामास जाण्याची आज्ञा झाली आहे."

मग आपले पुत्र विठ्ठल व नारायण या दोघांना उद्देशून महिपति म्हणाले, "आपला कुळधर्म म्हणून वारीक्रम पुढें चालवा. तसेंच आषाढ महिन्यांतील महोत्सव वर्षानुवर्षें आपल्या वंशजांनीं चालवावा. भजन, पूजन, कथाकीर्तन यांत तुमचें मन सदैव असावें. संतांचा सदैव सहवास करावा व त्यांची सेवा करावी. मध्यान्ह वेळीं कोणी याचक आल्यास त्याला मोठ्या आदरानें संतुष्ट करावें. त्याला प्रत्यक्ष विष्णूप्रमाणें मानावें. एकादशी वगैरे व्रतांचें पालन करावें. गळ्यांत तुळशीच्या माळा घालण्याचा नियम कधीं खंड्ं देऊं नये."

महिपतींचें हें निरवानिरवीचें बोलणें ऐकून सर्वांना मनस्वी खेद झाला. तेथें जमलेल्या सर्व स्त्री-पुरुषांनीं महिपतींना नमस्कार केला व त्यांच्याकडे ते टक लावून बघूं लागले. जणूं महिपतींचें अखेरचें रूप ते आपल्या डोळ्यांत कायमचें सामावून घेत होते.

मग महिपतींनीं विठ्ठलाचें नांव घेऊन कीर्तनास प्रारंभ केला. त्यांनीं प्रथम संतांच्या महिम्याचें वर्णन केलें. नंतर नामस्मरणाचें महत्त्व कथन केलें. पुढें ते म्हणाले, "तुमच्या कल्याणासाठींच पांडुरंग वेळोवेळीं अवतार घेत असतो व अज्ञानी जनांचा तो उद्धार करतो. सर्व प्राणिमात्रांत व ठायीं ठायीं परमेश्वराची वसती आहे, या गोष्टीचा बोध होण्यासाठींच संतांचा अवतार असतो. संत हेहि साक्षात् देवच असतात. सूर्य व त्याचे किरण हे जसे अभिन्न असतात त्याप्रमाणें देव व संत हे अभिन्न आहेत. साखर व गोडी किंवा तीर्थ व गंगेचें पाणी या गोष्टी जशा अभिन्न आहेत त्याचप्रमाणें देव आणि संत अभिन्न समजावेत. संतांचा निवास हें पृथ्वीचें महान् वैभव आहे. परमेश्वराचें गुणगान करण्यासाठींच व जगाचा उद्धार करण्यासाठीं कालमानपरत्वें संत हे अवतार घेत असतात."

महिपति पुढे म्हणाले, "कलियुग हें सर्व युगांत अत्यंत दुर्धर असें

युग आहे. या युगांत संतच पापी जनांचा उद्धार करतात. माझ्या मस्तकावर हात ठेवून ज्यानें मला भवसागराच्या पलीकडे नेलें ते तुकाराम महाराज मला देवाहूनहि थोर वाटतात. या प्रयाणाच्या सुप्रसंगीं जगद्गुरु तुकाराम महाराजांचें नांव आलें हा एक उत्तम योगच म्हणायचा. यथाशक्ति मी संतांची सेवा केल्यानें माझ्या मनाला समाधान वाटत आहे. सगळ्यांचा माझ्यावर लोभ असूं द्यावा. ”

अशा प्रकारें निवेदन-कीर्तन करून महिपतींनीं संतमंडळींचे पाय धरले व ‘ भक्तविजय ’ वगैरे ग्रंथांना आदरानें नमस्कार केला. नंतर लोकांना हात जोडून महिपति म्हणाले, “ आजपर्यंत तुमच्या गांवांत राहिलों. येथूनच भूवैकुंठाला-पंढरपुराला वरचेवर जात-येत होतों. आतां वैकुंठाला जात आहे. आतां परत येणें-जाणें नाहीं. मी आतां माझ्या माहेरीं जात आहे. माझ्या आई-वडिलांनींच मला निमंत्रण पाठविलें आहे. आतां माझी तुम्हां सर्वांना नम्र विनंती आहे कीं, दररोज पांडुरंगाचें स्मरण करीत जा. आतां यापेक्षां जास्त काय सांगूं ? असाच जर बोलत राहिलों तर मला जावयास उशिर होईल. तुम्ही सर्वांनीं आतां शांत बसावें, मन स्थिर करावें व विठ्ठलाचा जयजयकार करावा. ”

हें ऐकतांच सर्वांच्या डोळ्यांत अश्रू दाटले. त्यायोगानें त्यांना महिपतींची मूर्ति दिसेना. साऱ्यांनीं विठ्ठलाचा जयजयकार केला आणि महिपतींचा देखील ! ‘ जय महिपति ’ असें म्हणून सर्वांनीं त्यांना अखेरचें वंदन केलें. ‘ पुंडलीक वरदा हरिविठ्ठल ’ असा गगनभेदी नामगजर सुरूं झाला तेव्हां महिपति पांडुरंगचरणीं विलीन होत होते. स्वर्गांत देवांनीं पुष्पवृष्टि केली आणि पृथ्वीवर लोकांनीं अश्रुवृष्टि केली. महिपतींच्या महानिर्याणानें तेथें जमलेल्या मंडळींना आपला शोक आवरतां आवरेना. भगवान् श्रीकृष्णांच्या महानिर्याणानंतर व्रजवासी जनांची जी शोकाकुल अवस्था झाली तीच अवस्था महिपतींच्या निर्याणानंतर ताहराबादकर

मंडळींची झाली. पुन्हां त्यांना आतां महिपतींची भक्तवत्सल अशी अति-प्रेमळ मूर्ति दिसणार नव्हती. दशदिशा उदास झाल्या. ताहराबाद नगरीचा कुंकुमतिलक पुसला गेला आणि ती नगरी दीन बनली. नदींतील जलाशय जणूं कोरडा पडला होता. सूर्याला सोडून त्याचे किरण जणूं अलग झाले होते. शके १७७२ मध्यें महिपतींचें महानिर्याण झालें. त्यांच्या पार्थिव देहाला लोकांनीं रीतसर अग्नि दिला आणि महिपतींच्या पार्थिव देहाच्या सान्निध्यानें अग्नीचें तेज शतगुणित झालें.

• • •

महिपतींनीं महानिर्याणानंतर अनेक लोकांना दर्शन देऊन आपल्या अखंड अस्तित्वाची जाणीव करून दिली. पंढरीला जाऊन आलेले वार-करी पंढरपूरला महिपति भेटल्याचें सांगत. अंदरसूल या गांवांत आनंदराव सटवाजी या नांवाचे एक गृहस्थ लष्करांत नोकरीला असत. ते अहर्निश महिपतींचें चिंतन करीत असत. 'मला भेटावयास या' असें महिपतींनीं त्यांना स्वप्नांत येऊन सांगितलें. त्याप्रमाणें बरोबर कांहीं नोकर घेऊन आनंदराव घोड्यावरून निघाले. जातां जातां एक पठार लागलें. अवाचित त्यांना त्या ठिकाणीं महिपति दिसले. आनंदरावांना अत्यानंद झाला. घोड्यावरून ते खालीं उतरले; व महिपतींना नमस्कार करून 'कोठें जात आहांत?' अशी त्यांनीं पृच्छा केली. महिपति म्हणाले, "मी तुम्हांला त्वरित बोलाविलें असतां तुम्हांला जरा उशिर लागला म्हणून मी तुम्हांला स्वप्नांत भेटलों. आतां मी प्रवरेवर स्नाना-साठीं जात आहें. आतां तुम्ही घरीं जा. घरीं विठ्ठल भेटल्यावर सर्व कांहीं तुम्हांला कळेल."

त्याप्रमाणें आनंदराव ताहराबादला आले व महिपतींचे चिरंजीव विठ्ठल याला भेटले. त्यांना बघतांच विठ्ठलाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. तो म्हणाला, "महाराज निजधामास गेल्याला बरेच दिवस

झाले. त्यांनीं प्रयाणाच्या वेळेला तुम्हांला निरोप दिला होता. पण तुम्हांला येण्यास वेळ लागेल म्हणून तुम्हांला सर्व वृत्तान्त कळविण्याबद्दल त्यांनीं मला सांगितलें आहे."

थोडा वेळ थांबून विठ्ठल पुढे म्हणाला, "जातांना ते म्हणाले कीं, 'लौकिक दृष्ट्या जरी मी निजधामास जात आहें तरी जे प्रेमळ भक्त असतील त्यांना मीं दर्शन देत जाईन.' असें सांगून त्यानीं देह ठेवला."

विठ्ठलाची ही हकीगत ऐकत असतांना आनंदरावांना फारच आश्चर्य वाटत होतें. ते म्हणाले, "तुम्ही हें भलतेंच काय सांगतां? मला महाराज नुकतेच पठारावर भेटले व 'मी प्रवरेवर स्नानास जात आहे' असें ते म्हणाले. त्यावेळीं मी काय शुद्धीवर नव्हतों? मग खरा प्रकार कोणता मानावा?"

चित्रकार केशवबुवानें महिपतींचें एक चित्र काढलें होतें. त्या चित्राला वंदन करून आनंदरावांनीं ताहराबादला महिपतींची समाधी बांधली. त्यावेळीं पुढील चमत्कार घडला.

आनंदराव महिपतींच्या तसबिरीची पूजा करीत होते. पूजेंत ते अत्यंत तल्लीन होऊन गेले होते. आनंदसुखाच्या ल्हरींत ते डोलत असतांना समाधीहि डोलूं लागली व नंतर ती स्थिर झाली. तीर्थ घेण्यासाठीं आनंदराव विहिरीपाशीं गेले असतां महिपतींनीं त्यांना विचारलें, "आमच्या समाधीची पूजा झाली कां?" लगेच आनंदरावांनीं नमस्कार केला व वरती दृष्टि करून बघतात तों त्यांना कोणीहि दिसलें नाहीं. ही हकीगत आनंदरावांनीं सर्वांना सांगितली तेव्हां त्या भक्तश्रेष्ठाच्या चिरंतन अस्तित्वाविषयीं कोणालाच शंका राहिली नाहीं व त्या सर्वांच्या माना त्या पुरुषोत्तमाला वंदन करण्यासाठीं खालीं वाकल्या.

• • •

# अमळनेरचे सखाराम महाराज : : २

* * * * * * * * * * * * * * * * * * *

खानदेशांतील अमळनेर येथें रामभटजी थेटे या नांवाचे एक यजुर्वेदी ब्राह्मण राहात होते. त्यांना दोन बायका होत्या. रामभटजींकडे जोशी वृत्ति होती. त्यांना भिक्षुकीचें जें उत्पन्न होई त्यांतून कुटुंबांतील माणसांचा उदरनिर्वाह चालत असे. त्यांना एकुलती एक मुलगी होती पण मुलगा नव्हता. आपल्याला पुत्रसंतान नाहीं या गोष्टीचें रामभटजींना शल्य टोचत असें. कारण आपली एकुलती एक मुलगी लग्न होऊन सासरीं जाणार व पुन्हां आपण एकाकी पडणार ही बोचणी त्यांच्या मनाला सदैव असे. यासाठीं आपल्याला मुलगा व्हावा अशी त्यांना उत्कट इच्छा होई. त्या विचारानें ते रात्रंदिवस बेचैन असत. अशी स्थितींत त्यांचें कोठेंहि लक्ष लागेना, धड प्रपंचांत मन रमेना आणि हातून ईश्वरसेवाहि घडेना. मनाच्या या बेचैन अवस्थेंत त्यांना वाटूं लागलें कीं, संतांचा समागम घडल्यावांचून आपल्याला मनःशांति लाभणार नाहीं.

हा विचार आल्यानंतर त्यांनीं अमळनेर हें गांव सोडलें व अमळनेरपासून सहा मैलांवर असलेल्या पिंपळी या गांवीं आपल्या दोन्ही बायकांसह ते राहाण्यास गेले. तेथेंहि ते भिक्षुकीवरच आपला निर्वाह करीत. त्यांच्या बायकाहि पुत्रप्राप्तीसाठीं नवस करीत. रामभटजींचें मात्र येथेंहि संसारांत फारसें मन रमत नसे. कधीं त्यांना वाटे, ' मला दोन बायका असूनहि पुत्रसुख मिळत नाहीं यावरून पूर्वजन्मीं माझ्या हातून कांहींतरी घोर पातक झालें असावें. '

याप्रमाणें रामभटजींचें विचारचक्र चालू असतांना एके दिवशीं त्यांच्या मनांत आलें, ' सर्वान्तर्यामी असलेला परमेश्वर हा आपल्या भक्तांचे मनोरथ पुरवीत असतो. परमेश्वराच्या नामजपानें पाण्यावर दगड तरंगतात, प्रखर विषहि मनुष्य सहज पचवूं शकतो आणि आलेलीं संकटें

बारा वाटांनीं पळत सुटतात; आणि मी तर अशा परमेश्वराची सेवा न करतां पुत्रप्राप्तीची इच्छा करीत आहे. किती वेडा मी!'

रामभटजींच्या मनांत वरील विचार आला आणि त्या क्षणापासून त्यांनीं पुत्रप्राप्तीसाठीं ईश्वरावर विसंबून राहाण्याचें ठरविलें आणि नामजपाला भक्तिभावानें प्रारंभ केला.

नामजपाला प्रारंभ केल्यापासून थोड्याच कालावधींत त्यांना त्यांच्या तपाचें फळहि मिळालें. त्यांच्या प्रथम पत्नीला मुलगा झाला. त्या मुलाचें सखाराम असें नांव ठेवलें. नवसासायासांनीं दीर्घ कालानंतर झालेला हा मुलगा. त्याचे विशेष लाड व्हावेत यांत कांहींच नवल नाहीं. एक क्षणभरहि त्याचे आईवडील त्याला विसंबत नसत. मुलगा वाढतां वाढतां चार वर्षांचा झाला. त्याच्या आईची–सीताबाईची–प्रकृति बाळंतपणापासून बिघडलेली होती. अखेर तिच्या या दुखण्याचें पर्यवसान बाळंतरोगांत झालें. तिला हा रोग जडला होता तरी फार दिवसांनीं झालेल्या आपल्या प्रिय पुत्राकडे बघून ही माऊली आपलें दुखणें विसरून गेली होती. अशा स्थितींत रोग बळावत जाऊन अखेरीस सीताबाईची जीवनज्योत कायमची विझून गेली.

अशा रीतीनें सख्खी आई सखारामाला सोडून गेली पण सावत्र आईनें–नानीनें–मोठ्या प्रेमानें या पोरक्या पोराचें पालनपोषण केलें. सखाराम थोडा मोठा झाला. त्याला थोडेंफार कळूं लागलें. एकें दिवशीं सखाराम आपल्या वडिलांना म्हणाला, "माझी आई मला तर मुळींच आठवत नाहीं. पण तुम्ही सारे म्हणतां कीं, ती मला सोडून गेली. खरोखर किती दुर्दैवी मी! माझ्यापासून वास्तविक तिला काय सुख मिळालें?"

आपल्या प्रिय पुत्राचे हे करुणाजनक बोल ऐकून रामभटजींचा कंठ दाटून आला. त्याच्या सवत्र आईनें म्हणजे नानीनें तर त्याला उचलून

कडेवर घेतलें व ती त्याला म्हणाली, "बाळा, खरंच तुझी आई देवाघरीं गेली. तुला खरं सांगूं, आमच्या साऱ्यांचे खरे आईबाप पांडुरंगच होत. बाकी प्रेम वगैरे साऱ्या-साऱ्या गोष्टी खोट्या आहेत. माया आहे रे ती सारी !"

असे प्रसंग अधूनमधून येत आणि ते आले म्हणजे रामभटजी आणि नानी सखारामाचें नाना प्रकारें सांत्वन करीत.

सखारामाची आई गेली तरी नित्यनियमानुसार जगरहाटी सुरूच होती. जगाचे सारे व्यवहार सृष्टिक्रमानुसार चालच होते. माणसाच्या आयुष्यांत चक्रनेमिक्रमेन सुखदुःखें येत होतीं, जात होतीं आणि पुन्हां तीं येत होतीं. त्याच्या आयुष्यांत हर्षामर्षाचे खेळ चालले होते. कालहि पुढे सरकत होता, ऋतुचक्र फिरत होतें. सखाराम सात वर्षांचा झाला. सातव्या वर्षी त्याचा व्रतबंध उरकण्यांत आला. व्रतबंधांच्या वेळीं उपाध्यायानें उच्चारलेले मंत्र त्याला तात्काळ तोंडपाठ होऊन गेले एवढेंच नव्हे तर एकदांच सांगितलेले वेदमंत्रहि त्याला पाठ होत असत. ज्या विद्वत्ताप्रचुर गोष्टी विद्वान पंडितांना येत नसत त्या सखारामाला चटकन् समजत असत. पत्नीविरहाचें एक वैगुण्य सोडलें तर रामभटजींना आतां कांहींहि कमी नव्हतें. सारीं सुखें त्यांच्या संसारांत नव्यानें नांदूं लागलीं होतीं. नवसानें झालेला हा मुलगा पंडितांनाहि मागे सारणारा झाला होता. खरोखर हें केवढें सुख रामभटजींच्या पदरीं पडलें होतें? पण सुख उपभोगायलादेखील दैव अनुकूल लागतें. पण दुर्दैवानें रामभटजींना ती अनुकूलता नव्हती. प्रिय पुत्राचे सुखसोहाळे पाहण्यास देवानें त्यांना फार दिवस या जगांत ठेवलें नाहीं. सखारामाला सोडून ते कायमचे निघून गेले. बिचारा सखाराम ! तो पुरता पोरका बनला. त्याची आई गेली आणि बापहि तिच्या भेटीला पाठोपाठ निघून गेला.

अशा पोरक्या अवस्थेंत सखाराम नानीसह म्हणजे आपल्या सावत्र

आईसह पुन्हां अमळनेरीं आला. अमळनेरला नानीचा चुलतभाऊ रंगभटजी हा राहात असे. त्याच्याकडे हीं निराधार मंडळीं आश्रयार्थ आली. नानीची भावजय बयाबाई ही जरा खाष्टच बाई होती. तिला या मंडळींचें येणें फारसें आवडलें नाहीं. नानी ही जरी तिची नणंद होती तरी सखाराम हा तिचा सावत्र मुलगा होता. त्याच्यावर प्रेम करण्याचें बयाबाईला काय कारण होतें ? जगांत पोरक्या माणसांवर प्रेम करणारीं माणसें फारच क्वचित आढळतात आणि वस्तुतः अशाच माणसांना प्रेमाच्या सावलीची अत्यंत आवश्यकता असते. पोरका सखाराम या घरांत आश्रयाला आला आणि तेव्हांपासून त्याच्या निमित्तानें घरांत धुसफूस होऊं लागली.

अशा अशान्त वातावरणांत यापुढे वास्तव्य करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें नानीच्या मनानें घेतलें आणि तिनें सखारामासह तें घर सोडलें. चोपडें या गांवीं नानीचें आजवळ होतें. आपल्या सावत्र मुलासह नानी चोपडें या गांवीं आपल्या आजोळीं राहण्यास गेली. या ठिकाणीं आल्यावर सखारामाचा विद्याभ्यास व्यवस्थित झाला. सखारामाची कुशाग्र बुद्धि असल्यामुळें त्याचें सर्वत्र नांव झालें.

विद्याभ्यास पुरा झाल्यावर यथाकाल गंगा नांवाच्या मुलीशीं सखा-रामाचा विवाह झाला; व नानी आपल्या या नव्या सुनेसह पुन्हां अमळनेरीं रंगभटजींकडे राहण्यासाठीं आली. सखारामहि अर्थात् तिच्या-बरोबर होताच.

हीं मंडळी रंगभटजींकडे राहण्यास आल्यानंतर पुन्हां पूर्वींचे पाढे सुरूं झाले. घरांत कोणत्या ना कोणत्या निमित्तानें भांडण झालें म्हणजे सखारामाची बायको त्याला कांहीं ना कांहीं कानगोष्ट देई. आपलें प्रतिपादन करी. पण बायकोचें हें सारें सांगणें वाया जाई. सखारामाच्या कानांत तिचें सांगणें कधीं शिरतच नसे. तो सदासर्वकाळ पांडुरंगाच्या

ध्यानांत निमग्न असे. विठ्ठलाचा त्याला ध्यास लागला होता आणि त्या विठ्ठलाच्या पंढरीला आपण केव्हां जातो इकडे त्याचें लक्ष लागलें होतें. माणसाची इच्छा खरोखरच उत्कट झाली म्हणजे त्याच्या पदरांत त्या इच्छेचें फल आज ना उद्यां पडतें हीच गोष्ट खरी ! पंढरीला जाण्याचा योग सखारामाच्या दारीं चालून आला.

एकदां सखारामाच्या स्नेह्यानें त्याला 'पंढरीला येतोस कां?' म्हणून विचारलें. रंगभटजींच्या अनुज्ञेची आवश्यकता होतीच. त्यांची संमति मिळविण्यासाठीं सखाराम त्यांच्याकडे गेला तेव्हां रंगभटजी म्हणाले, "तुला पंढरपूरला जायचें असेल तर आपल्या बायकोला माहेरीं पाठव; व नानीला आपल्याबरोबर घेऊन जा. कामधंदा करायचा सोडून तुला पंढरीला जाण्याचें सुचतेय ! बरें झालें; जाच एकदां कायमचा पंढरीला ! नाहींतरी तुझ्यामुळें आमची पतसुद्धां नाहींशी होत चाललीय. तूं आपला कायमचाच तिकडे राहा."

रंगभट व बयाबाई यांचे हे कुत्सित बोल ऐकून सखारामाला आतां वाईट वाटलें नाहीं. उलट त्याला वाटलें कीं आपला भाग्यकाल जवळ आला. कारण एकप्रकारें आपण संसाराच्या आधीव्याधीपासून मुक्त होत आहोंत.

सखारामाची पत्नी गंगाबाई हिला मात्र या साऱ्याच प्रकारची खंत वाटली. ती अतिशय दुःखीकष्टी झाली. तिला दिवस गेले होते. त्यामुळें तिच्या आयुष्यांत नव्यानेंच आनंद निर्माण झाला होता. पण त्या आनंदाला ओहोटी लागणार होती. तिचा पति पंढरीला निघाला होता. विरहाच्या कल्पनेनें तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. ती आपल्या पतीला म्हणाली, "मी सासूबाईना घेऊन माहेरीं जातें. तेथें बाळंतपण झालें म्हणजे आपण पुन्हां सुखानें एकत्र राहूं."

गंगाबाई तिच्या माहेरीं निघून गेली आणि सखाराम पंढरीला निघाला. पंढरीच्या प्रवासांत त्यानें अत्यंत क्लेश भोगले–मानसिक आणि शारीरिक.

भरल्या संसारांतून तो पंढरीची वाटचाल करीत चालला होता. मार्गांत आलेल्या कोणत्याहि संकटाला त्यानें जुमानलें नाही. ध्यानींमनीं विठ्ठलाचें चिंतन करीत त्याचें पाऊल पंढरीच्या दिशेनें पुढें पुढें पडत होतें. अखेरीस एकदांची पंढरी आली. त्याच्या विठ्ठलाच्या प्रिय पंढरींत पाऊल टाकतांच सखाराम हर्षभरित झाला. जन्मोजन्मीं केलेल्या पुण्य-संचयाचें फळच जणूं आपल्या हातीं लागलें असें त्याला वाटलें. त्यानें चंद्रभागेचें स्नान केलें, क्षेत्राला प्रदक्षिणा घातली आणि महाद्वारांतून प्रवेश करून तो मंडपांत येऊन दाखल झाला. आपल्यासमोर साक्षात् परब्रह्म विटेवर उभें आहे, असा भास त्यावेळीं त्याला झाला.

लगेच पांडुरंगाला नमस्कार करून सखाराम म्हणाला, " हे विठ्ठला, तुझें सत्य स्वरूप आकलन करून घेण्यासाठीं मला अद्याप कोणी गुरुच मिळत नाहीं. तरी माझी एवढी इच्छा तूं पुरी कर. मला माझा गुरु दाखव. "

असें म्हणून सखारामानें अन्नपाणी वर्ज्य केलें आणि विठ्ठलासमोर धरणें धरलें. तिसऱ्या रात्रीं पांडुरंग सखारामाच्या स्वप्नांत आले आणि म्हणाले, " नुकतेच स्वगृहीं गेलेले रघुनाथस्वामी हेच तुझे सद्गुरु होत. वारकरी सांप्रदाय यथासांग चालवा. संसाराची वाताहत. "

एवढे शब्द कानीं पडतात न पडतात तोच सखारामाला जाग आली. आपल्याला कोण दिसले, आपल्याशीं कोण बोललें हें त्याला कांहींच कळेना. सखाराम बावरला, हारखून गेला. मात्र पंढरीच्या पांडुरंगाचा त्याला पुरेपूर प्रत्यय आला, पंढरीचा महिमा त्याला आकलन झाला. कांहीं झालें, मार्गांत वाटेल तीं संकटें आलीं तरी यापुढे आषाढी-कार्तिकीची वारी कधीं चुकवायची नाहीं, अशी प्रतिज्ञा करून सखारामानें पंढरी सोडली व तो अंमळनेरला परतला.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय



सखाराम--नव्हे सखारामपंत अमळनेरला पुन्हां रंगभटजींकडे आले. त्या मंडळींना सखारामपंतांच्या आयुष्यांत केवढा बदल झाला आहे याची गंधवार्ताहि नव्हती. आध्यात्मिक अनुभवांनीं त्यांचें सारें आयुष्य ढवळून निघालें होतें, त्यांच्या अंतःकरणाला नवा परमेश्वरी साक्षात्कार झाला होता. पण रंगभटजींना किंवा त्यांच्या घरांतील अन्य मंडळींना या गोष्टीची कल्पना कोठून असणार ? त्या गोष्टी त्यांच्या आकलनापलीकडच्या होत्या. सखारामपंत एका अननुभूत अशा आनंदांत घरीं परतले पण त्यांच्याशीं कोणीहि भाषण केलें नाहीं किंवा त्यांची साधी विचारपूसहि कोणी केली नाहीं. रंगभटजींच्या घरीं त्यांना जेवण मिळालें यांतच सखारामपंतांनीं समाधान मानलें. तें जेवणहि त्यांना सरळपणानें मिळालें नाहीं. रंगभटजींची बायको बयाबाई हिनें ताट वाढून सखारामपंतांच्यासमोर तें आदळलें व कांहींतरी कुत्सित शब्द बोलत ती जी आंत गेली ती पुन्हां बाहेर आलीच नाहीं.

पण सखारामपंतांचें लक्ष भोजनांत होतेंच कोठें ? आपणांस सद्गुरुकृपा केव्हां होते इकडे त्यांचें सारें लक्ष लागलें होतें. इतक्यांत दरवाजा उघडून कोणीतरी आंत आलें व " सखाराम, लवकर चल ! " असें म्हणून परतलें. स्वप्नांत साक्षात्कार झालेले रघुनाथस्वामी ते हेच, ही गोष्ट सखारामपंतांनीं तात्काळ ताडली. मग खरकटा हात धुण्याचीहि शुद्ध त्यांना राहिली नाहीं. ते तडक उठले आणि रघुनाथस्वामींच्या मागें पळत एरंडोलपर्यंत गेले.

एरंडोलला पोचल्यावर सखारामपंतांनीं स्वामींच्या चरणांवर मस्तक ठेवलें. स्वामी त्यांच्याकडे बघत हंसत म्हणाले, " अरे सखाराम, आतां तरी हात धू."

नंतर ते दोघेजण एकान्तांत बसले. मग सखारामपंतांनीं स्वामींना अत्यंत नम्रपणानें विचारलें, " ईश्वरभक्ति कशी करावी तें आपण मला

सांगा. तसेंच योगसाधना कशी साधावी, ईश्वरकृपा कशी मिळवावी याहि गोष्टी मला नीट समजावून सांगा."

स्वामी सखारामपंतांना म्हणाले, "पंढरीच्या वारीबद्दल तर साक्षात् विठ्ठलानेंच तुला सांगितलें आहे. शिवाय रामानुजपंथी श्रीनिवास समर्थ यांचा अनुग्रह तुला होणार आहे. तरी तूं त्यांना लगेच शरण जा."

स्वामींच्या सांगण्याप्रमाणें लगेच सखारामपंत श्रीनिवासगुरू यांच्या गांवीं जाऊन त्यांना शरण गेले. सद्गुरूंनीं त्यांच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला. सखारामपंतांकडून कांहीं दिवस गुरुसेवा घेतली व ती पुरी झाल्यावर त्यांना नाममंत्र दिला. नाममंत्र दिल्यावर आपल्या शिष्याला उपदेश करतांना श्रीनिवासगुरू म्हणाले, "पंढरीच्या वारींत कधीं खंड पाडूं नकोस. दुर्जनाची संगत कधीं करूं नकोस. नेहमी सत्संगतींत राहा. ब्रह्मचर्यव्रताचें काटेकोर रीतीनें परिपालन कर; व घरीं जाऊन पुढच्या उद्योगाला लाग."

सद्गुरुंना नमस्कार करून सखारामपंत अमळनेरला आले. कांहीं मंडळींनीं सखारामपंतांच्यावतीनें रंगभटजींना पृच्छा केली, "सखारामाला तुम्ही काय देणार आहांत? त्याला जरी तुम्ही दोन खण जागा दिली तरी त्या ठिकाणीं बिचारा सुखानें कालक्रमणा करील."

रंगभटजींना सखारामपंतांची किंमत कळलेली नव्हती. त्यांनीं मान-भावीपणानें उत्तर दिलें, "परमार्थाच्या मागे लागलेल्याला काय कमी आहे हो? त्याला माझ्याकडून कांहींसुद्धां मिळणार नाहीं."

हे सुविचार ऐकल्यावर सारी मंडळी घरीं निघून गेलीं. मग सखाराम-पंतांनीं रंगभटजींना नमस्कार केला व म्हटलें, "आपल्या बोलण्यानें मला खरोखर आनंदच होत आहे. कारण एकेक उपाधीपासून मी मुक्त होत चाललोय!"

असें म्हणून सखारामपंतांनीं अमळनेराहून काढता पाय घेतला आणि

ते निसर्गरम्य अशा बोरी नदीच्या किनारीं वस्ती करून राहिले. आपल्या बरोबर फक्त दोन धोतरें व भजनासाठीं दोन दगड एवढीच सामग्री आपल्याबरोबर घेतली. माध्यान्हसमयीं मधुकरी मागावी, कोणी अतिथि आल्यास त्याला प्रथम तृप्त करावें व त्यांतून जर कांहीं उरलें तर स्वतः खावें, नाहींतर उपवास काढावा, अशी त्यांची दिनचर्या चालली होती.

बोरी नदीच्या कांठीं सखारामपंतांची अशा प्रकारची दिनचर्या चाललेली आहे, ही गोष्ट जेव्हां त्यांच्या धर्मपत्नीला समजली तेव्हां ती साध्वीहि उपवास करूं लागली. पतीकडे जाण्याचा आपला मनोदय गंगाबाईनें व्यक्तविला; आणि आपल्या लहानग्या मुलासह ती बोरी नदीच्या तीरावर आली देखील ! आपल्या पत्नीला पाहून सखारामपंत म्हणाले, " तुला जर माझ्याजवळ येथे राह्यचें असेल तर सर्व अशाश्वत अशा गोष्टी तुला माहेरीं पाठवाव्या लागतील. "

आपल्या पतिदेवाचें हें बोलणें ऐकून त्या पतिव्रतेनें आपलें ऐश्वर्य खरोखरच दूर सारलें आणि पतीप्रमाणेंच ती त्या झोपडींत सुखानें कालक्रमणा करूं लागली. विचारीनें कधींहि त्या कष्टमय संसाराचें दुःख केलें नाहीं, किंवा प्राप्त परिस्थितीबद्दल कधींहि विषाद मानला नाहीं.

सखारामपंतांची प्रतिवर्षींची पंढरीची वारी चालूंच होती. एकदां पंढरीची वारी करून परत येतांना त्यांचा मुक्काम बोपोडी या गांवांत पडला. त्या ठिकाणीं मुक्कामावर असतांना आपला एकुलता एक पुत्र काळानें हिरावून नेल्याची दुःखद वार्ता त्यांना समजली. सखारामपंत घरीं आले तेव्हां पुत्रशोकानें व्याकुळ झालेली पत्नी त्यांना दिसली. तिचा एकुलता एक प्रिय पुत्र काळानें तिच्यापासून ओढून नेला होता. ती माता पुत्रशोकानें वेडी बनली होती.

तिच्याकडे बघून तिच्या सांत्वनार्थ सखारामपंत म्हणाले, " ज्यानें आपल्याला पुत्र दिला त्यानेंच तो नेला. मग उगाच दुःख कां करावें ?

आपल्या अंगणांत पक्षी येतात व आपला चारा घेऊन निघून जातात, त्याचप्रमाणें हा प्रकार घडला, असें समज. वृक्षवेलींना उत्तम अशीं सुगंधी फुलें येतात व कोणीतरी तीं तोडून नेतात, त्याप्रमाणें आपल्या संसारवेलीवर हें पुत्रपुष्प फुललें व तें कांहीं काळानें कालानेंच हिरावून नेलें. मग उगाच क्षिति कां बाळगावी ?"

परंतु गंगाबाईच्या विचाराची पातळी पतीसारखी उच्च नव्हती. तिच्या मुळांतल्या अशक्त प्रकृतीला पुत्रशोकाचा हा धक्का सहन झाला नाहीं. तिची प्रकृति दिवसेंदिवस खालावत चालली आणि अखेरीस एके दिवशीं ही दुःखी माता आपल्या प्रिय पुत्राच्या भेटीस कायमची निघून गेली.

मग सारे सगेसोयरे सखारामपंतांच्या समाचाराला गोळा झाले. त्यांचें सांत्वन करतांना ते त्यांना म्हणाले, "सदासर्वकाळ विठ्ठलाच्या नादीं लागलास म्हणून तुझा संसार असा उद्ध्वस्त झाला."

सखारामबुवांनीं लगेच त्यांना प्रत्युत्तर दिलें, "जर होणारें चुकत नाहीं तर उगाच माणसांनीं शोक वा चिंता कां करावी ? बरें, विठ्ठलाचें नांव न घेणारे तरी अमर कुठें होतात ? तेव्हां आतां तरी सुखानें परमार्थ साधतां येईल."

सखारामपंतांचा संसार संपला होता. पंढरपूरला त्यांना दृष्टान्त झाल्या-प्रमाणें त्यांच्या संसाराची खरोखरच वाताहत झाली होती. सखारामबुवा परमार्थ करायला आतां मोकळे झाले होते. संसाराचें सारें संपल्यानंतर ते आपल्या सद्गुरूला भेटण्यासाठीं अडावदेला निघून गेले. कात टाक-लेल्या सतेज भुजंगाप्रमाणें संसारांतून मुक्त झालेल्या सखारामपंतांना त्यांचे सद्गुरू म्हणाले, "आतां तूं मोकळा झालास हें उत्तम झालें. पंढरीची वारी चुकवूं नकोस. दृढ श्रद्धेनें उपासना कर म्हणजे तुझें ईप्सित साध्य होईल."

हा गुरुपदेश घेऊन सखारामपंत अमळनेरला आले व तेथें कांहीं दिवस

राहून ते पंढरीला गेले. पंढरीच्या दक्षिणद्वाराच्या विस्तीर्ण जागेंत सखारामबुवा उतरत. गांवांतून पीठ मागून आणून त्याचे पानगे करून जठराग्नीच्या तृप्तीसाठीं ते खात. एका द्वादशीला सखारामबुवांनीं पानगे केले पण पारण्यासाठीं कोणी ब्राह्मण न मिळाल्यानें ते चिंताक्रांत होऊन भजन करीत बसले. इतक्यांत जीर्ण धावळी नेसलेला एक अतिवृद्ध ब्राह्मण त्यांच्याजवळ आला आणि काकुळतीनें म्हणाला, "मी अत्यंत दुबळा ब्राह्मण आहे. माझी वृद्ध पत्नीहि घरीं उपाशी आहे. मी पंढरींत असूनहि मला कोणी विचारीत नाहीं. तरी तुम्हीं सांगत असाल तर माझ्या पत्नीला घेऊन येतों."

ब्राह्मण भेटल्यामुळें सखारामबुवांना परमावधीचा आनंद झाला; व पत्नीला घेऊन येण्याबद्दल त्यांनीं त्या ब्राह्मणाला सांगितलें.

त्या वृद्ध ब्राह्मणानें मग आपल्या पत्नीला आणलें. वृद्धावस्थेमुळें ती बाई कापत होती. तरीहि ती सखारामबुवांना म्हणाली, "मी स्वयंपाक करते. मला निःसंकोचपणानें सारें सांगा."

पण सखारामपंतांनीं आधींच पानगे तयार करून ठेवले होते; व नवा स्वयंपाक करायला भांडीकुंडीहि नव्हती. त्यामुळें तयार असलेल्या पानग्यांचा समाचार घेऊन ते वृद्ध पती-पत्नी सुखानें जेवले व भरल्या पोटानें त्यांनीं सखारामबुवांना भरघोस आशीर्वाद दिला. भोजनाला आल्याबद्दल सखारामबुवांनींहि त्यांचे हार्दिक आभार मानले. तृप्त झालेलें तें मेहूण आपल्या घरीं गेलें व सखारामबुवा अमळनेरला परतले.

इकडे अमळनेरला रंगभटजी दिवंगत झाले होते. सखारामबुवांची सावत्र आई व रंगभटजींची पत्नी बयाबाई यांच्याशिवाय कोणीहि राहिले नव्हते. घराच्या भिक्षुकीसाठीं एक माणूस नेमून त्या मिळकतीवरच या दोघींनीं आपला चरितार्थ चालविला होता. घरचा पूर्वींचा दिमाख नाहींसा झाला होता आणि पैशाबरोबर येणारी आढ्यताहि उरली नव्हती.

सखारामबुवा अमळनेरला परतले आणि ब्रोरी नदीच्या कांठीं पुन्हां वसतीला राहिले. त्यांच्या आचरणांत कसलाहि फरक पडला नव्हता. ते झोपडींत राहात होते आणि माधुकरीवर आपला उदरनिर्वाह करीत होते. त्यांची पंढरीची वारी सुरूच होती. एकदां आषाढांत बऱ्याच मंडळींसह सखारामबुवा पंढरीला गेले. परंतु जो तो आपलीच व्यवस्था पाही. सखारामबुवा पंढरीस दक्षिणद्वारीं अन्नपाण्यावांचून नऊ दिवस एक-सारखे भजन करीत उभे होते. ही गोष्ट त्यांच्याबरोबर असलेल्या कोणा-च्याच ध्यानांत आली नाहीं. सखारामबुवांचें एकसारखें भजन सुरूच होतें. पोटांत अन्न नसल्यामुळें द्वादशीच्या रात्रीं त्यांना भूक लागली. भूक दडपावी या हेतूनें सखारामबुवांनीं फडक्यानें आपलें पोट बांधलें; व पुन्हां भजन सुरूं केलें. पण पोट बांधून भूक कां शमते? अखेरीस सखारामबुवांना मूर्च्छा आली व ते खाली पडले. तरीहि त्यांच्याकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं.

सखारामबुवा मूर्च्छित अवस्थेंत असतांना पीतांबर नेसलेला एक अत्यंत तेजस्वी ब्राह्मण त्यांच्याकडे आला व म्हणाला, "महाराज उठा. मी आणलेलें दही-पीठ खा. आपणांस फार श्रम झाले आहेत. तुमचा हा केवढा निर्धार ! आणि तुम्ही संकटें तरी किती सोसलीत ! असें असतां परमेश्वर तुमच्यावर प्रसन्न होत नाहीं !"

सखारामबुवा त्या अवस्थेंत त्या ब्राह्मणाला म्हणाले, "मी आपणांस ओळखलें नाहीं. पण मी अशीं कोणतीं संकटें सोसलीं किंवा अशी कोणती तपश्चर्या केली कीं ज्यांमुळें परमेश्वर माझ्यावर कृपा करीत नाहीं, असें आपण म्हणतां? खरोखर परमेश्वर अत्यंत दयाळू आहे."

सखारामबुवांनीं दहीपीठ खाल्लयावर तो तेजस्वी पुरुष निघून गेला. इकडे पुन्हां सखारामबुवांचें भजन सुरूं झालें.

कान्हेरे नांवाचे एक बडवे पंढरपूरला राहात होते. त्या दिवशीं रात्रीं

त्यांच्या स्वप्नांत उग्र चेहेऱ्याचा एक सरदार हातांत चाबूक घेऊन आला व त्यांना म्हणाला, "तुम्ही स्वतःला पांडुरंगाचे बडवे म्हणवतां. पांडुरंगासाठी म्हणून धनसंचय करतां. पण प्रत्यक्ष मंदिरांत मात्र कांहींच व्यवस्था ठेवीत नाहीं ! बिचारा सखारामबुवा भजनासाठी म्हणून अमळनेरहून दक्षिणद्वारीं आला व आज तो चार दिवस उपाशी असतां तुम्ही कोणी त्याची चौकशी तरी केलीत कां?"

असें म्हणून त्या सरदारानें कान्हेऱ्यांच्या अंगावर चाबूक मारण्यास सुरुवात केली. त्यांच्या अंगावर वळ उठले. कान्हेरे त्या सरदाराच्या हातापाया पडले, आपली चूक कबूल केली व आपलें संरक्षण करण्यास सांगून त्या सरदाराला त्यांनीं वंदन केलें. इतक्यांत कान्हेरे जागे झाले आणि पाहतात तो काय? सारें स्वप्नच !

पण मग ते तेथें थांबले नाहींत. धांवत धांवत ते दक्षिणद्वारीं गेले व सखारामबुवांचा शोध करूं लागले. पण त्यांच्याबद्दल कोणाला कांहींच माहिती नव्हती. अखेर कान्हेरे यांना सखारामबुवांचा शोध लागला.

सखारामबुवांना बघतांच कान्हेऱ्यांनीं त्यांना नमस्कार करून म्हटलें, "आपण साक्षात् भूलोकींचे देवच आहांत !"

उलट सखारामबुवा कान्हेऱ्यांना म्हणाले, "आपण दयाळू आणि थोर आहांत. आपणच मला दहीपीठ आणून दिलें."

नंतर घरीं येण्याबद्दल कान्हेऱ्यांनीं सखारामबुवांना विनंती केली. घरीं गेल्यावर त्यांनीं सखारामबुवांना सारी हकीगत सांगितली; पाठीवर उठलेले वळ दाखविले व सखारामबुवांच्यामुळेंच आपल्याला हरिदर्शन होऊन आपण धन्य झाल्याचें सांगितलें; व यापुढे पंढरीस याल तेव्हां माझ्या घरींच भोजन करीत जावें अशी विनंती केली. पंढरीसारखें पुण्यक्षेत्र व चंद्रभागेसारखें पावनतीर्थ दुसरीकडे नाही यास्तव चातुर्मासांत पंढरपुरींच वास्तव्य करण्याचें सखारामबुवांनीं ठरविलें.

पुढें सखारामबुवा अमळनेरकर म्हणून त्यांची कीर्ति दूरवर पसरली. पेशव्यांच्या सरदारांनीं त्यांना पुण्याला पाचारण केलें आणि त्यांची व पेशव्यांची गांठ घालून दिली. पेशव्यांच्या वाड्यांत सखारामबुवांचें भजन झालें. बुवांची रसाळ वाणी ऐकून श्रीमंतांनीं एका चांदीच्या ताटांत मोहरा भरल्या व त्या बुवांना अर्पण केल्या. तसेंच भरजरी मंदिल व किनखापी अंगरखा महाराजांना नजर केला. इकडे बुवांचें भजन ऐन रंगांत आलें असतांना त्यांच्या अंगावरील पोषाख जळूं लागला व खालच्या शामियान्यालाहि आग लागली तेव्हां सर्व श्रोते घाबरले व त्यांनीं भराभर आग विझविली. पण त्यावेळीं एक चमत्कार सर्वांच्या दृष्टीस पडला. बुवांच्या अंगावरील कपडे जळले पण त्यांचें अंग यत्किंचितहि भाजलें नाहीं.

मग सर्व स्थिरस्थावर झाल्यावर सखारामबुवांनीं श्रीमंतांना विचारलें, " मला कशाचीच इच्छा नसतांना आपण हें द्रव्य व पोशाख मला कशासाठीं देत आहांत? ज्याला ज्याची इच्छा आहे तें त्यांस दिलें असतां विशेष फलदायक होतें. तेव्हां आतां ब्राह्मणांना निमंत्रण द्या व त्यांना हें सारें द्रव्य द्या. म्हणजे आपलें कल्याण होईल. "

यावरून सखारामबुवा तुकाराम महाराजांच्याप्रमाणें द्रव्याचा द्वेष करीत होते, ही गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते.

एकदां देशमुखांचीं मुलें विनाकारण पुण्याला नेऊन श्रीमंतांनीं त्यांना डांबून ठेवलें. पुढें सखारामबुवा जेव्हां पंढरीहून पुण्याला आले तेव्हां श्रीमंतांनीं त्यांना भोजनास बोलाविलें तेव्हां बुवा म्हणाले, " आपल्याकडचें भोजन आम्हांला कसें बरें गोड वाटेल? कारण विनाकारण तुम्ही आमच्या देशमुखांचीं मुलें तुरुंगांत टाकलींत. अर्थात् ही गोष्ट जर कारणपरत्वें घडली असती तर मी रदबदली केलीच नसती. जेथें नीति संपुष्टांत येते तेथें अधोगति ही ठरलेलीच असते. "

सखारामबुवांचे हे बोल ऐकून देशमुखांच्या मुलांना तीनचार दिवसांत

मुक्त करण्याचें अभिवचन श्रीमंतांनीं दिलें. श्रीमंत म्हणाले, "पण आम्हांला या अपराधाबद्दल क्षमा करावी, अशी आपण माझ्यावतीनें पांडुरंगाला प्रार्थना करा!"

बुवांच्या सांगण्यावरून पांडुरंग आपणांस खरोखरच क्षमा करील अशी श्रीमंतांची खात्री होती. त्यांचा हा अधिकार ओळखून श्रीमंतांनीं सखारामबुवांना हिंगोणें हा गांव मंदिरासाठीं सनद करून दिला. भाग्यवंतांनाहि न लाभणारा असा योग बुवांना लाभला असता गांवकऱ्यांना त्यांचें महत्त्व कळलें नाहीं. पण देशमुख मात्र बुवांचे उपकार विसरले नव्हते. कारण सखारामबुवांच्याच रदबदलीनें त्यांचीं मुलें तुरुंगांतून सुटलीं होतीं. या उपकाराची अंशतः फेड करावी या हेतूनें वाडींत विठ्ठलाच्या मूर्तीची प्रस्थापना करण्याचा आपला मनोदय त्यांनीं बुवांना कळविला. त्याप्रमाणें सारी व्यवस्था होऊन उत्सव, यज्ञ, पूजा वगैरे कार्यक्रम यथासांग पार पडले. गोपाळदेवाच्या नातवानें सर्व उत्सवाची जबाबदारी अंगावर घेतल्यामुळें सर्व समारंभ उत्तम प्रकारें पार पडला. सारी मंडळी आनंदांत डुंबून निघाली.

उत्सवाच्या अखेरीस मात्र एक खेदजनक प्रकार घडला. सुग्रास भोजन व्हावें आणि अखेरीस घशांत माशी अडकावी तसा प्रकार झाला आणि सर्व लोकांचा विरस झाला. आपले शिष्य गोविंदबुवा यांना सखारामबुवा म्हणाले, "आतां आमच्या पश्चात् हा उत्सव तुम्हांला पुढे चालवावा लागेल. तरी सर्व विधि नीट पाहून ठेवा. मला सद्गुरूंच्या दर्शनासाठीं जायचें आहे. एकट्याला जायला भीति वाटते. माझ्याबरोबर तुम्ही कोणी येत असाल तर चला!"

बुवांचें अशा तऱ्हेचें निरवानिरवीचें बोलणें ऐकून गोविंदबुवा उद्विग्न झाले. मार्गांत भीति वाटते असें दर्शवितांच सर्वजण बुवांना म्हणाले, "अहो, आमच्यासारखे मर्द बरोबर असतांना आपणाला कसली आली

आहे भीति ! मात्र तुमचा विरह आम्हांला सहन होणार नाहीं."

आपले शिष्य गोविंदबुवा व इतर मंडळी यांच्यासह सखारामबुवा निघाले. चोपडे गांवाची हद्द ओलांडल्यावर एक ओढा लागला. ओढा पाहतांच सर्वांना जेवणाची इच्छा झाली. सर्वजण जेवायला बसले असतांना पलीकडे सातपुड्याच्या डोंगरांतून सशस्त्र भिल्लांची एक टोळी त्यांच्या रोखानें आली. सखारामबुवा व गोविंदबुवा सोडून सर्वांची घाबरगुंडी उडाली. जो तो वाट फुटेल तिकडे पळाला. इकडे भिल्लांनीं गुरु शिष्यांना पकडून तुम्ही कोण आहांत असें विचारलें. सखारामबुवा म्हणाले, "आम्ही गरीब ब्राह्मण आहोंत. आमचा रक्षणकर्ता पांडुरंग आमच्या-बरोबर आहे. तुम्ही न्याल तिकडे आम्ही येतो व सांगाल तें काम करतों."

त्या भिल्लांचें ठिकाण पर्वताच्या कड्यावर वसलें होतें. त्या दुर्गम अशा कड्यावर एकें ठिकाणीं या गुरुशिष्याच्या जोडीला बसविण्यांत आलें. एका बाजूला तुटलेला कडा आणि गगनचुंबी अशा वृक्षांनीं वेढलेलें तें महाभीषण ठिकाण संध्याकाळच्या वेळीं अधिकच भीषण भासूं लागलें.

सायंकाळीं आरती करण्यासाठीं गोविंदबुवांनीं आपल्या पडशींतून देव काढले. भिल्लांच्या नायकाला आरतीसाठीं निमंत्रण केलें. विठ्ठलाच्या गज-रांत आरती झाली. संतांचे दुर्लभ पाय आपल्या घराला लागलेले पाहून ते चोर भिल्ल बुवांना म्हणाले, "तुमची सेवा करण्याची संधि आम्हांस द्यावी. आम्ही आनंदानें आपली सेवा करूं."

'सखारामबुवा त्यांना म्हणाले, "तुम्हांला सुबुद्धि सुचली ही गोष्ट ठीकच झाली. आतां असें करा कीं, अमळनेरला वैशाख महिन्यांत शुक्ल पक्षांत एक उत्सव होत असतो. त्या उत्सवांतील मंडपासाठीं तुम्ही लांकडे पुरवा."

तसें करण्याचें आश्वासन देऊन त्या भिल्लांनीं सखारामबुवांना अडावदेस पोचविलें. तेथें सद्‌गुरुंचें दर्शन झाल्यावर बुवांना परमावधीचा 'आनंद

झाला. गोविंदबुवांना आपल्या दर्शनासाठीं घेऊन आलों आहे, असें सखारामबुवांनीं सद्गुरूंना सांगितलें.

सद्गुरु बुवांना म्हणाले, "तुम्हांला आतां नानीशिवाय संसाराचा कांहींच पाश उरला नाहीं."

नंतर सद्गुरू गोविंदबुवाला उद्देशून म्हणाले, "चातुर्मास, वारीक्रम वगैरे तुम्ही पुढे चालविणार आहांत असें कळलें. हें सर्व निष्ठेनें करा."

सद्गुरूंना वंदन करून सखारामबुवा गोविंदबुवासह अमळनेरला परत आले. बुवांनीं वैशाख शुद्ध एकादशीला नामसप्ताह सुरूं केला. पहिल्या दिवसापासून बुवा भजनांत उभे राहिलें. एके दिवशीं गोविंदबुवास बोलावून ते म्हणाले, "भजनाचा वेळ भोजनांत जाऊं नये यासाठीं मी उपवास करणार आहे, तरी मला कोणीहि खाण्याचा आग्रह करूं नका. आम्हीं आतां जाणार. तेव्हां उगाच माया, ममता वाढवूं नका. पुढेंहि आम्ही आहोंतच असें समजून चातुर्मास व वारीक्रम उत्तम रीतीनें चालवा."

असें म्हणून सखारामबुवांनीं भजन सुरूं केलें. बुवांचें बोलणें ऐकून गोविंदबुवांचें मन कष्टी झालें. त्यांनीं विचार केला कीं, आपल्या गुरूनंतर आपण तरी कशाला राहावें? म्हणून त्यांनींहि उपोषण सुरूं केलें.

सखरामबुवांनीं गोविंदबुवांची समजूत काढून त्यांना अन्न घेण्यास सांगितलें. स्वतः सखारामबुवांनीं मात्र उपोषण करून अष्टौप्रहर भजन चालू ठेवलें. खांद्यावर वीणा घेऊन अठ्ठावीस दिवसपर्यंत त्यांचें भजन चालू होतें. सखारामबुवा जाणार म्हणून दूरदूरच्या गांवचे लोक गोळा झाले होते. बोरी नदीच्या किनारीं ठायीं ठायीं भजनी मेळे जमले. विठ्ठल-नामाच्या गजरानें दाही दिशा दुमदुमल्या. गोविंदबुवांनीं गहिंवरून सखारामबुवांना अन्न सेवन करण्याची पुनः पुन्हां विनंती केली. परंतु बुवा फक्त खाली घोंगडीवर बसले व गोविंदबुवांना म्हणाले, "उत्सव समाप्त झाल्यावर चतुर्दशीस मी जाईन."

एकादशीला दिंडी मिरवली. द्वादशीला भोजन झालें. त्रयोदशीला हरिकीर्तन झालें. नंतर चतुर्दशीचा दिवस उगवला. महोत्सवाचा भाग संपला होता. सखारामबुवा सर्वांना उद्देशून म्हणाले, "सांप्रदायक्रम उत्तम रीतीनें चालवा. माझ्या जागीं गोविंदबुवा आहेत, असें समजून त्यांच्या सल्ल्यानें तुम्ही वागा. त्यांतच तुमचें कल्याण होईल."

मग सखारामबुवा पुढें म्हणाले, "आतां फारसा वेळ उरला नाहीं. पांडुरंग माझी वाट पाहात आहे. म्हणा, पुंडलीक वरदा हरिविठ्ठल."

सखारामबुवांचे हेच अखेरचे शब्द. हे शब्द उच्चारून ते पांडुरंग चरणीं विलीन झाले. जिकडे तिकडे हलकल्लोळ उडाला. साऱ्यांचे आवडते सखारामबुवा कायमचे दृष्टीआड झाले होते. प्रथम ते अज्ञात होते, पुढे साऱ्यांना ते ज्ञात झाले आणि अल्पावधींतच अज्ञाताकडे त्यांनीं महाप्रयाण केलें.

सखारामबुवांचे और्ध्वदेहिक संस्कार सुरू असतांना एक चमत्कार घडला. चोपड्याहून अमळनेरला एक वाणी येत असतां अंबऋषीच्या टेकडीजवळ सखारामबुवा त्याला भेटले. वाण्यानें त्यांना नमस्कार केला. व एकटेच कुठे निघाला अशी पृच्छा केली. त्याला उत्तरादाखल सखारामबुवा म्हणाले, "मी सद्गुरुंच्या दर्शनाला जात आहे, असें गोविंदबुवास सांग. तसेंच माझ्या बसण्याच्या खोलींतील कोपऱ्यांत तुळशीची माळ आहे. ती झांशीच्या शिवदासबुवांकडे पोचती करावी, असें सांग."

सखारामबुवांचा निरोप घेऊन तो वाणी अमळनेरला आला. अमळनेरला आल्यावर बुवांच्या निजधामगमनाची वार्ता कळतांच त्याला आश्चर्य वाटलें. गोविंदबुवांना त्यांनीं सखारामबुवांचा निरोप कळविला. तो वृत्तान्त ऐकून साऱ्यांना फारच आश्चर्य वाटलें. सखारामबुवांनीं सांगितलेल्या ठिकाणीं सर्वांनीं त्यांची माळ बघितली. त्या पुण्यभूमीला व जपमाळेला वंदन करून सारे लोक सखारामबुवांचें स्मरण करीत आपापल्या घरीं निघून गेले.

● ● ●

# नाशिकचे यशवंतराव महाराज : : ३

* * * * * * * * * * * * * * * * * * * *

निरानरसिंहपूर पासून आठ मैलावर भोसें नांवाचें गांव आहे. तेथें धोंडोपंत नांवाचें देशस्थ ब्राह्मण राहत असत. त्यांच्या घराण्यांत कुलकर्णीपण आणि देशपांडेपण अशी दोन वतनें होतीं. आपलीं कामें व्यवस्थितपणानें करून ते आपली कालक्रमणा करीत. त्यांना महादेव नांवाचा मुलगा होता. तो स्वभावानें फार भोळा असल्यानें त्याला लोक चेष्टेनें भोळा महादेव असें म्हणत. त्याचें कुलदैवत नृसिंह. महादेवाची या देवतेवर अतिशय श्रद्धा होती, यामुळें महादेव त्याच्या भजनांत दंग असे, आणि त्यामुळें तो कशाची फिकीर करीत नसे. त्याच्या पत्नीचें नांव हरिबाई. ती शीलसंपन्न अशी पतिव्रता होती. पतिसेवा करणें हेंच आपलें मुख्य कर्तव्य आहे असें ती मानीत असे.

एके दिवशीं महादेव आपल्या पत्नीसह नरसिंहपुरास गेला. उभयतांनीं आपल्या कुलदैवताला नमस्कार केला. त्यांच्या पूर्वपुण्याईनें त्यांना तेथें संतदर्शन झालें. संतांनी त्यांना सांगितलें, " तुम्हांला सात पुत्र आणि एक कन्या होईल. त्यांपैकीं एका पुत्राची कीर्ति साऱ्या त्रिभुवनांत होईल. आमचा शब्द खोटा होणार नाहीं याबद्दल तुम्ही खात्री बाळगा."

संतांच्या आशीर्वादानें उभयतांना आनंद झाला. त्यांनीं संतांना नमस्कार केला आणि ते आपल्या गांवीं परत आले. नंतर त्यांना पहिल्यानें मुलगा झाला. नंतर दुसऱ्या खेपेला जेव्हां हरिबाई गरोदर राहिली तेव्हां तिला विलक्षण डोहाळे होऊं लागले. तिला भजन करावेसें वाटे. त्याचप्रमाणें याचक जेणेंकरून समाधान पावतील—संतुष्ट होतील असें कांहींतरी करावें असे तिला वाटत असे. नऊमास भरल्यावर हरिबाई प्रसूत झाली. शके १७२४ च्या भाद्रपद शुद्ध पक्षांत यशवंताचा जन्म झाला. जन्मकाळीं जिकडे तिकडे तेज पसरलें आहे असें माणसांना दिसून आलें. हाच

यशवंत पुढें यशवंतराव महाराज झाला. यांचेंच चरित्र आम्हीं थोडक्यांत देत आहोत. यशवंताच्या पाठीवर मनोहर, आबा, रामचंद्र, प्रल्हाद, वासुदेव व बलभद्र हीं मुलें आणि सखू ही मुलगी झाली.

यशवंताचा व्रतबंध आठव्या वर्षीं झाला. टेंभुर्णी गांवांत जिवाजीपंत म्हणून एक गृहस्थ राहत होते. त्यांनीं आपली मुलगी यशवंताला दिली. यशवंतरावांनीं गृहस्थाश्रमांत पदार्पण केल्यावर तो व्यवस्थित चालविला. त्याची भक्ति शंकरावर होती यामुळें रोज तो विधिपूर्वक शिवपूजा करी आणि श्रद्धायुक्त अंतःकरणानें नामस्मरण करीत असे. त्यानें आपल्या इंद्रियांना नेमधर्मानें वळण लावलें, भूतमात्रांना दया दाखविली, परोपकारार्थ आपलें शरीर कारणीं लावलें आणि अन्नदानहि केलें.

अशी कालक्रमणा करीत असतां नगर जिल्ह्यांतील पारनेर तालुक्यांत यशवंतरावांना कारकुनीची नोकरी मिळाली. अंगी हुशारी असल्यामुळें ते नोकरीत चढत जाऊन लवकरच मामलेदार झाले. ते चाळिसगांवीं मामलेदार असतांना त्यांचें दातृत्व लोकांच्या निदर्शनाला येऊं लागलें. अंमलदाराच्या जागेवर असून सुद्धां त्यांच्या अंगीं अभिमानाचा लेशहि नव्हता. सर्वांशी ते मोकळेपणानें वागत. क्षमा, दया, सत्य, इत्यादि अनेक गुण त्यांच्या ठिकाणीं वास करीत होते.

यशवंतरावांची बदली चाळीसगांवाहून शहादे तालुक्याला झाली. त्यांना तेथें कामुकांचा कल्पवृक्ष असें लोक म्हणूं लागले. त्यांचें घर हें याचकांचें माहेरघरच बनलें होतें. अशा प्रकारची त्यांची ख्याति सर्वत्र पसरल्यामुळें त्यांच्याकडे दूरदूरचीं माणसें याचकवृत्तीनें येऊं लागलीं.

करवीर येथें एक शुचिर्भूत ब्राह्मण रहात असे. तो दरवर्षी माघ महिन्यांत गंगेची कावड नेऊन रामेश्वराला घालीत असे. त्यानें हा नियम अकरा वर्षेपर्यंत अखंड चालविला. बारावी कावड काशीहून आणली तेव्हां वाटेंतच तो शीतज्वरानें आजारी पडला. आतां ही कावड आपल्या

हातून रामेश्वरीं कशी जाणार याची त्याला काळजी पडली आणि त्याचे मन विषण्ण झालें. त्याला चैन पडेना. तो म्हणाला, " देवा आजपर्यंत तूं माझी सेवा घेतलीस आणि अखेरीस माझ्या नेमांत कां विघ्न आणलेंस? एखादें अमृतासारखें मधुर फळ हातांत पडणार इतक्यांत तें कोणी हिसकावून न्यावें त्याप्रमाणें आजारीपणानें माझ्यावर आयत्या वेळीं घाला घातला. आतां येथपर्यंत मी आणलेली कावड रामेश्वरीं कोण नेणार?" असे विचार त्याच्या डोक्यांत घोळत असतां त्याला शंकरानें रात्रीं दृष्टान्तांत सांगितलें कीं, ' तूं शहाद्याला जाऊन तेथें यशवंतराव मामलेदारांना कावड घाल. ते माझाच अंश असल्यानें तुझी सेवा मला पोहचेल, आणि तुझ्या नियमाची परिपूर्तता होईल. '

दृष्टान्तांत शंकराची आज्ञा झाल्याप्रमाणें तो ब्राह्मण कावड घेऊन शहादें येथें आला आणि त्यानें यशवंतरावांना, दृष्टान्तांतील वृत्तान्त निवेदन केला. तेव्हां यशवंतराव म्हणाले, "तुम्ही याल असा मलाहि दृष्टान्त झालाच होता." मग ते आपल्या मनाशीं म्हणालें, "विश्वनाथा तूं काय केलेंस हें? तूं मला विनाकारण मोठेपण कशाला दिलेंस? माझ्यामागें ही उपाधि कशाला लावलीस? देवा, कीर्ति ही मी विषासमान मानतों. हें नसतें संकट माझ्यावर कशाला घातलेंस?"

त्या ब्राह्मणानें यशवंतरावांवर कावड घालतांच आपण रामेश्वरालाच ती घालीत आहोंत असा त्याला भास झाला. तो म्हणाला, " हे कैलासनाथा, मी बारा वर्षें मनोभावें तुझी सेवा केली त्यामुळें माझें पूर्ण समाधान झालें. तू खरोखर माझे मनोरथ पूर्ण केले आहेस" असें म्हणून तो ब्राह्मण निघून गेला.

यशवंतराव मामलेदार यांना रामेश्वर समजून ब्राह्मणाने गंगेची कावड घातली ही वार्ता शहादे गांवांत पसरण्यास उशीर लागला नाहीं. सर्व लोक म्हणूं लागले कीं हा दिसायला मामलेदार, पण खरोखर प्रत्यक्ष

रामेश्वर आहे. सर्वांची ही भावना झाल्यावर यशवंतरावांच्या दर्शनाला रोज गांवांतील व परगांवांतील स्त्री पुरुषांची गर्दी होऊं लागली. याचकांना ती एक पर्वणीच आली असें म्हटलें तरी चालेल. याचक यशवंतरावांकडे येऊन वाटेल तें मागूं लागले. तरी पण यशवंतरावांनीं त्यांना विन्मुख पाठविल्याचें एकहि उदाहरण सांपडणार नाहीं.

एक ब्राह्मण आपल्या पत्नीसह यशवंतरावांच्या दर्शनाला आला. तो लांबून आला होता. पोटांत अन्न नसल्यामुळें त्याचे झोक जात होते. त्यानें यशवंतरावांच्या पायावर आपलें डोकें ठेवलें आणि तो म्हणाला, "मी दारिद्र्यानें अतिशय वैंगलो आहे, यामुळें जीव सुद्धां नकोसा झाला आहे."

यशवंतरावांनीं गोड शब्दांनीं उपदेश करून त्या ब्राह्मणाचें समाधान केलें. प्रथमतः त्यांना जेवायला घालून यशवंतराव म्हणाले, "हा मानवी देह अशाश्वत आणि नाशिवंत आहे. प्रत्येकजण नानाविध भोग भोगण्याची इच्छा करीत असतो; पण प्रत्येकाच्या पूर्वकर्मांप्रमाणेंच त्याला भोग्य वस्तूंची प्राप्ति होत असते, आणि आपआपल्या कर्मानुसार त्याला भोग भोगावे लागतात. परमेश्वर त्याला काय करणार? परंतु ईश्वराची अखंड सेवा किंवा चिंतन केलें असतां तो आपला योगक्षेम चालवितो आणि आपल्या अडचणी दूर करतो; म्हणून नित्य त्याचें भजन-पूजन करीत जा. म्हणजे तुमच्यावर त्याची कृपा होईल आणि तुम्हांला चांगले दिवस येतील."

यशवंतरावांनीं त्या ब्राह्मणाला असा उपदेश केला आणि त्या ब्राह्मणाला पीतांबर आणि त्याच्या पत्नीला पैठणी देऊन त्यांची रवानगी केली. यशवंतरावांनीं सांगितल्याप्रमाणें त्या ब्राह्मणाला पुढें चांगले दिवस आले.

यशवंतरावांच्या दातृत्वाची ख्याति ऐकून त्यांच्याकडे एक गृहस्थ आला व त्यानें याचना केली, "माझी वायको निवर्तली असून मुलें

ल्हान आहेत. त्यांचें पालणपोषण करण्यास घरांत कोणीच नाहीं. तरी आपण कांही मदत करावी. ”

हा गृहस्थ धादांत खोटें बोलत आहे हें यशवंतरावांनीं जाणलें व ते त्याला म्हणाले, “अरे गृहस्था तुझी बायको जिवंत असतांना ती मेली असें खोटें कां सांगतोस? असत्य बोलण्यानें कोणाचेंहि कल्याण होणार नाहीं. ”

यावर तो गृहस्थ पांडुरंगाची शपथ घेऊन म्हणाला, “महाराज, मी जर खोटें बोलला असेन तर जगच बुडेल. ”

यशवंतराव त्याला म्हणाले, “अहो तुम्हीच साक्षात् परमेश्वर असतां विनाकारण देवाची शपथ कशाला घेता? मी तुम्हाला पाचशे रुपये देतो ते घेऊन जा. पुन्हां तुम्हाला गरज लागली तर माझ्याकडे या. तुम्हांला येतां आलें नाहीं तर शंकराचें स्मरण करा, तो कैलासनाथ तुमची गरज भागवील. ”

तो गृहस्थ परत जातांना विचार करूं लागला, “आज दैवयोगानें लाभ पदरी पडला तेव्हां आपलें भवितव्य उज्ज्वल दिसत आहे. आतां आपण बायकोला दागिने करूं. त्यामुळें तिला आनंद होईल. ”

असा शेखमहंमदी मेनारथांचा डोलारा उभारीत असतां तो आपल्या घरीं येऊन पोहचला. तेव्हां बायकोचें प्रेतच त्याच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्याचे सर्व मनोरथ ढासळून पडले. आपण खोटें बोलून यशवंतरावांकडून पैसे उकळले त्याचा तर हा परिणाम नसेल ना अशी त्याच्या मनाला टोचणी लागली. पण त्याचा आतां उपयोग नव्हता; कारण घडणारी गोष्ट होऊन गेली होती.

माणसें तरी किती क्षुद्र वृत्तीचीं असतात! एका बाईच्या घरीं उत्तम नवीन कोरें लुगडें संग्रहाला असून ती एक फाटकें लुगडें नेसून यशवंतरावांकडे गेली आणि त्यांना म्हणाली, “या चिंध्या नेसून चारचौघांत

जाण्याची मला लाज वाटते. मला फक्त एकच लुगडें मिळालें तरी माझें काम भागेल. आपल्याला त्रास देणें सुद्धां माझ्या जिवावर येतें. पण प्रसंगच पडला, आणि आपण गरिबांची दाद घेतां म्हणून मी आलें आहे."

यशवंतराव ज्ञानी. त्यांनीं त्या बाईचा कावा ओळखला. ते तिला म्हणाले, "बाई तुमच्या घरीं नवें लुगडें असतांना या चिंध्या कां बरें नेसतां? तुम्हांला लुगडें हवें तर मी तुम्हांला तें देतों. पण तेवढ्यासाठीं विनाकारण खोटें कशाला सांगतां?"

असें बोलून यशवंतरावांनी तिला नवें लुगडें दिलें, आणि पुन्हां असें खोटें बोलूं नका असें सांगून त्या बाईला त्यांनीं जाण्यास सांगितलें. बाई नवें लुगडें नेसून घरीं गेली पण आपल्याजवळ दुसरें एक कोरें लुगडें ठेवणीला आहे हें मात्र दुसऱ्या कोणालाहि कळूं न देण्याची तिनें दक्षता बाळगली. कारण तिचें मन तिला खात होतें.

यशवंतराव हे क्षमा, दया आणि शान्ति या सद्‌गुणांची केवळ मूर्तीच होती. कोणीहि याचक त्यांच्याकडे जावो तो कधींच विन्मुख गेला नाहीं. यामुळें त्यांच्याकडे याचकांची फार गर्दी असे. साखरेजवळ जशा मुंग्या जमतात त्याप्रमाणें यशवंतरावांभोंवतीं याचक जमत.

शहाद्याहून यशवंतरावांची बदली सिंधखेडला आणि तेथून नाशिक जिल्ह्यांत सटाणें येथें झाली. तेथेंहि यशवंतरावांच्या दारांत याचकांचे थवे उपस्थित होते. असेल नसेल तें दुसऱ्याला देऊन टाकण्याची संवय असल्यामुळें यशवंतरावांजवळ देण्याला असें त्यावेळीं कांहींहि नव्हतें. अशा एका प्रसंगीं त्यांच्याकडे पाटण गांवचा पाटील भेटण्यास आला. तेव्हां यशवंतरावांनीं त्याच्याजवळ पैशाची गोष्ट काढली. ते पाटलाला म्हणाले, "मला पाचशे रुपयांची फार निकड आहे, तेवढी तुम्ही भागविलीत तर पुढल्या महिन्यांत मी आपली रक्कम परत करीन."

पाटील घरचा श्रीमंत होता. त्यानें रक्कम जमवून यशवंतरावांना

ती लगेच आणून दिली. रक्कम हातीं येतांच यशवंतरावांनीं ती सर्व याचकांना वाटून दिली. ते पाहून पाटलाला आपले पैसे सत्कारणीं लागले म्हणून आनंद झाला. तो मनांत म्हणाला, " मामलेदारासारख्या थोर माणसाने माझ्याजवळून पैशाची मागणी केली तेव्हां माझी पूर्वपुण्याई थोर असली पाहिजे; नाहींतर माझ्याजवळ त्यांनी कशाला रक्कम मागितली असती ? "

गांवांतील आपलीं कामें उरकून पाटील पाटणला निघून गेला.

एके दिवशीं यशवंतराव चिंतातूर होऊन बसले होते. पाटणच्या पाटलानें दिलेली पाचशे रुपयांची रक्कम वायद्याप्रमाणें परत करावयास पाहिजे होती. यशवंतरावांपाशीं तर त्या वेळीं पैसे नव्हते. त्यांचा पगार येण्याला बराच अवधि होता, आणि रक्कम तर ताबडतोब जायलाच हवी होती.

त्यांच्या पत्नीनें त्यांना विचारलें, " आज आपण कशाची काळजी करीत आहांत ? "

ते म्हणाले, " पाटलाला वचन दिल्याप्रमाणें त्यांचे पांचशे रुपये ताबडतोब परत केले पाहिजेत आणि माझ्या पगाराला तर अजून पत्ता नाहीं म्हणून काय करावें या विचारांत मी आहे. "

पत्नी म्हणाली, " काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. माझ्या माहेरचे आणि तुम्ही केलेले असे दागिने विकून पाटलाची रक्कम परत करा; विनाकारण काळजी करीत बसूं नका. "

असें म्हणून तिनें आपले दागिने यशवंतरावांपुढें ठेवले.

यशवंतराव तिला म्हणाले, " पाटील भला माणूस आहे. तो माझ्या मागें रुपयांचा तगादा लावणार नाहीं असें मला वाटतें. मी त्याला पत्र पाठवून कळवितो कीं तुमची रक्कम पुढल्या पगाराला पाठवून देतो. तो महिना दीड महिना थांबेल असें मला वाटतें. इतकें असून त्यानें अगोदर

रक्कम मागितलीच तर दागिने मोडून रक्कम पाठवूं. तोपर्यंत दागिने तुझ्यापाशींच राहूं दे."

यशवंतरावांच्या हाताखाली अनंतसिंग या नांवाचा जमादार होता. पांडुरंगानें त्याचें रूप धारण केलें. डोक्यावर झोंकदार पगडी, काळ्याभोर पीळदार मिशा, आंगरख्यावर तांबडी फीत व तीवर पट्टा अशा थाटांत पांडुरंगानें अनंतसिंगाचें रूप धारण केलें आणि ते पाटण गांवाला आले. त्यांनीं कुळकर्ण्याला बरोबर घेतलें आणि ते पाटलाकडे गेले.

पाटील अनंतसिंगाला म्हणाले, "अनंतसिंग, तुम्हीं येथपर्यंत येण्याची कशाला तसदी घेतलीत? मी आज तिकडे येणारच होतो."

अशा तऱ्हेनें एकमेकांची बातचीत झाल्यावर अनंतसिंगानें पाचशे रुपये पाटलांपुढें ठेवले आणि त्यानें आपल्या मालकाच्या नांवानें पावती मागितली.

पावती हातीं पडताच अनंतसिंगानें पाटलाला रामराम केला आणि तेथून परत जाण्यास निघाला. निघतांना अनंतसिंग पाटलाला म्हणाला, "पाटील, आमचा मालक म्हणजे सद्गुणांची खाण आहे बरें."

पाटलानें अनंतसिंगाकडे बारकानें पाहिले तेव्हां तो तेजःपुंज दिसला. तो निघून गेल्यावर थोड्याच वेळांत यशवंतरावांचा पुतण्या पाटलाकडे आला आणि त्यानें आपल्या काकांचें पत्र पाटलाला दिलें. पाटलांनीं तें पत्र लगेच वाचलें. त्यांत रक्कम पुढल्या पगाराला पाठवून देण्याचें अभिवचन दिलें होतें. अनंतसिंग थोड्या वेळांपूर्वीं रकमेची भरपाई करतो काय आणि लगेच यशवंतराव रक्कम पुढील महिन्यांत देऊं असें लिहितात काय! याचा कांहींच उलगडा पाटलाला होईना. त्याच्या मनांत गोंधळ माजून राहिला. आतां खुद्द यशवंतरावांची भेट घेतल्यावांचून या गोष्टीचा खुलासा होणें शक्य नाहीं असें समजून तो यशवंतरावांकडे जाण्यास निघाला. तो सटाण्याला येऊन यशवंतरावांना भेटला.

यशवंतराव पाटलाला म्हणाले, “ मी पोथी वाचीत असतांना आपण दिलेली पावती मला पोथींत दिसली. मी तर तुमच्याकडे रुपये पाठविले नाहींत; मग ही पावती कोठून आली असा माझ्या मनाचा गोंधळ झाला आहे, तरी ही भानगड काय आहे हें मला समजलें तर बरें होईल. ”

पाटील म्हणाला, “ रावसाहेब, माझ्याकडे अनंतासिंग जमादार आला, त्यानें मला पाचशे रुपये दिले आणि मी दिलेली पावती तो घेऊन गेला. तो जाऊन थोडा वेळ गेला नाहीं तोंच आपला पुतण्या आला आणि त्यानें आपलें पत्र मला दिलें. त्यामुळें माझ्या मनांतहि गोंधळ माजला; आणि म्हणूनच मी मुद्दाम आपणांकडे आलों. ”

यशवंतरावांनीं अनंतासिंगाला हांक मारून विचारलें, “ तूं पाटलांकडे जाऊन त्यांना पांचशे रुपये दिलेस कां? त्यांनीं तुला पांचशे रुपये पोचल्याची पावती दिली का? ”

या दोन्ही प्रश्नांचीं उत्तरें त्यानें नकारार्थीं दिलीं. तो म्हणाला, “ मला याबाबतींत कांहींच माहिती नाहीं. ”

हें ऐकून यशवंतराव व पाटील असें दोघेहि चकित झाले. पाटील मात्र म्हणाला, “ तुमच्या अनंतासिंगापेक्षां माझ्याकडे आलेला अनंतासिंग तेजस्वी दिसला. ”

यशवंतरावांनीं तर्क केला कीं हें काम पांडुरंगावांचून दुसऱ्या कोणाचेंहि नाहीं. भक्त संकटांत असतां पांडुरंग त्याचें संकट दूर करण्यासाठीं धावून येतो ही गोष्ट यशवंतरावांना माहीत होती. आपल्यासाठीं पांडुरंगाला तसदी पडली याबद्दल त्यांना वाईट वाटलें.

यशवंतराव आपल्या मनाशीं म्हणाले, “ माझ्यासाठीं प्रत्यक्ष देवाला त्रास पडला ! जो निर्गुण, निराकार, निष्काम आणि निरुपमेय आहे त्याला अनंतसिंग जमादाराचें रूप घ्यावें लागलें ना ! ज्याच्या मुकुटाच्या तेजानें कोट्यवधि सूर्य निस्तेज होतात त्याला साधी पगडी मस्तकावर

धारण करावी लागली ! ज्याच्या गळ्यांत वैजयंतीमाळा आणि तुळशीहार रुळत असून शोभा देत असायचे त्यानें प्रेमानें आपल्या गळ्यांत साधा पट्टा वागविला, आणि नुपुरें टाकून बिचारा तुटक्या वाहणा घालून पाटण गांवापर्यंत चालत गेला ! ”

यशवंतरावांना फारच पश्चात्ताप झाला. रुपयांची वार्ता ऐकून सर्व लोक आश्चर्यचकित झाले.

या प्रसंगानंतर यशवंतरावांनीं सरकारी नोकरी सोडली आणि आपल्या पत्नीसह पुष्कळ तीर्थयात्रा केल्या. गांवोगांवीं स्त्रीपुरुष त्यांच्या दर्शनाला येऊं लागले आणि त्यांना नवस करूं लागले. आंधळे, पांगळे, मुके, बहिरे आणि सर्व प्रकारचे त्रस्त आणि व्याधिग्रस्त लोक त्यांचा तीर्थप्रसाद घेण्यास येऊं लागले. त्यांच्या तीर्थानें सर्व लोकांच्या व्याधि नाहींशा होत. या सर्व गोष्टींमुळें त्यांची विशेष प्रसिद्धि झाली आणि उपाधि वाढली. जे कोणीं त्यांना आदरानें बोलावीत असत त्यांच्याकडे ते जात असत. जात, गोत, लहान-मोठा असा भेद ते कधींच करीत नसत. सर्व तीर्थें आणि क्षेत्रें करून ते संगमनेरला आले. तेथें फार मोठा उत्सव झाला.

या उत्सवप्रसंगीं गांवांत कोणत्याहि दुकानांत नारळ शिल्लक राहिला नाहीं. मिठाईवाले उद्दामपणानें वागूं लागले. मिठाईच्या पदार्थांत पीठ मिसळून ती महाग दरानें विकूं लागले आणि ते चांगले गबर झाले. नवस फेडण्यासाठीं कोणी असले मिठाईचे जिन्नस यशवंतरावांपुढें ठेवले तर ते म्हणत कीं, “ हे जिन्नस शुद्ध नाहींत. ”

मिठाईवाल्यांना त्यांच्या या कर्माबद्दल वाईट फळें भोगावीं लागतील म्हणून यशवंतरावांचें मन विपण्ण होई.

एक यवन यशवंतरावांच्या साधुत्वाची परीक्षा करण्यासाठीं आला. त्यानें एका कांचेच्या भांड्यांत अभक्ष्य अन्न घालून त्यांच्यापुढें ठेवलें.

तें दिसूं नये म्हणून त्याच्यावर रुमालाचें आच्छादन घातलें होतें. यशवंतराव त्याला म्हणाले, “ अरे, तुळशी आणि फुलें झांकून कशाला आणलीस ? अरे, सरळपणानें वागावें म्हणजे कल्याण होतें. सत्कर्माचें फळ चांगलें मिळतें. आपण आरशांत जसें पाहूं तसेंच आपल्याला दिसतें. म्हणून चांगलें वागावें. ”

कांचेच्या भांड्यावरील रुमाल बाजूला केला. तेव्हां त्यांत तुळशी आणि फुलें आढळून आलीं. तो यवन खजिल झाला आणि त्याला पश्चात्ताप झाला. यशवंतरावांपुढें त्यानें हात जोडले आणि तो म्हणाला, “ मला वाटलें होतें कीं तुम्हीं भोंदू आहांत, पण खरोखर आपण साधु आहांत अशी माझी खात्री झाली, आणि भ्रमनिरास झाला. आपली परीक्षा पाहिल्याबद्दल मला क्षमा असावी.”

शेवटीं यशवंतराव—देव मामलेदार—गोदावरीतीरीं नाशिक येथें जाऊन राहिले. त्यांनीं तेथें शके अठराशे नऊ या वर्षीं मार्गशीर्ष वद्य एकादशीला प्रातःकाळीं आपला देह ठेवला.

ही वार्ता लोकांना कळतांच असंख्य लोक त्यांच्या पार्थिव देहाच्या दर्शनाला धांवून आले. त्यांना पाहून लोकांचे डोळे दुःखानें पाणावले. नंतर भजनाच्या गजरांत त्यांची अंत्ययात्रा निघाली. लोकांनीं त्यांच्या देहावर गुलाल, फुलें, बुक्का उधळला. ‘ पुंडलीक वरदा हरि विठ्ठल ’, ‘ राम राम ’ या नामघोषानें सर्व दिशा दुमदुमून गेल्या. चंदन, तुळस आणि कापूर यांत त्यांचा पार्थिव देह भस्मीभूत झाला.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों. दि: ....................

# जळोजी आणि मळोजी : : ४

* * * * * * * * * * * * * * * * * *

ईश्वरापाशीं उच्चनीच असा भेदभाव नाहीं. त्याचें भजन-पूजन भक्तिभावानें केलें असतां कोणताहि मानवी प्राणी त्याची प्राप्ति करून घेऊं शकतो. श्रीमद्भगवद्गीतेंत हा अधिकार स्त्रियांना आणि शूद्रांनाहि देऊन ठेवलेला आहे. मनुष्य, आपल्या पोटासाठीं कोणताहि व्यवसाय करीत असला तरी त्याला परमेश्वराची भक्ति करण्याला प्रतिबंध नाहीं. म्हणून नामदेव, तुकाराम, गोरोबा कुंभार, सांवता माळी, चोखा मेळा, रोहिदास चांभार, सेना न्हावी इत्यादि भिन्न भिन्न जातींच्या आणि व्यवसायांच्या लोकांनीं भगवद्भक्तीनेंच ईश्वर आपलासा केला. नामदेव, तुकाराम आदिकरून कांहीं संतांचीं नांवें त्यांच्या मागें राहिलीं. परंतु असेहि कांहीं संत होऊन गेले कीं ज्यांचीं नांवें आज बहुजन समाजाला माहीत नाहींत. अशा पैकीं जळोजी आणि मळोजी या दोन संतांची माहिती आम्हीं देत आहोंत.

एका अप्रसिद्ध अशा खेड्यांत जळोजी आणि मळोजी हे राहत होते. ते सख्खे बंधू असून त्यांचें एकमेकांवर अत्यंत प्रेम असे. जातीनें ते सुतार असून सुतारकीच्याच धंद्यावर ते आपली उपजीविका करीत असत. ते संसारांत राहून विरक्त होते. त्यांनी संसाराची काळजी कधीं केली नाहीं आणि पंढरीची वारी कधीं चुकविली नाहीं. कामधंदा करून जें मिळेल त्यांत समाधान मानून ते आपली कालक्रमणा करीत. त्यांना कोणी साधुसंत भेटले तर ते त्यांना आपल्या घरीं आणून प्रेमानें त्यांचा आदरसत्कार करीत. कामधंदा करीत असतांनासुद्धां तोंडानें त्यांचा नामजप चालत असे, व रोज रात्रीं भजनी मंडळी जमवून ते भजन करीत असत. कोणी अडचणींत असला तर त्यांना दया येऊन ते आपल्या ऐपतीप्रमाणें त्याच्या उपयोगी पडत. परोपकाराची संधि त्यांनीं

कधी वाया दवडली नाहीं. कितीहि अडचण असली तरी पंढरीची वारी चुकवूं नका असें त्यांच्या वडील-मातुश्रींनीं त्यांना सांगून ठेवलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं वारी कधींहि चुकूं दिली नाहीं.

या उभयतां बंधूंना कामधंद्याचा वीट आला होता. साधुसंतांचें माहेरघर आणि भूलोकांतील वैकुंठ असें जें पंढरपूर त्या ठिकाणीं जाऊन कायमची वस्ती करावी असें त्यांना नेहमी वाटे. आषाढी-कार्तिकीला जर काम निघालें तर तें त्यांना नकोसें वाटे.

दोघां भावांना एक घर बांधण्याचें काम मिळालें. त्याच सुमारास आषाढीची वारी आली. वारकरी पंढरीला जात होते. त्यांच्या गांवांत वारकऱ्यांनीं मुक्काम केला होता व दुसऱ्या दिवशीं ते पुढें जाण्यास निघाले. त्याच वेळीं या भावांचे एक जवळचे आप्त वारले. या दोन भावांच्या वारींत विक्षेप आला म्हणून लोकांना वाईट वाटलें. त्यांची वारी बुडली म्हणून कांहीं लोक पांडुरंगाला दोष देऊं लागले. जळोजी-मळोजी हे मात्र शांत होते. ते म्हणाले, "पांडुरंगाला दोष देण्यांत काय अर्थ आहे? मृत्यु कां कोणाला चुकला आहे? जें ज्यावेळीं व्हायचें तें होऊन जातें. मग वृथा शोक कशाला करायचा? आपण आपली वारी चुकवूं नये म्हणजे झालें."

कोणी म्हणाले, "अशा स्थितींत वारीला जाणें मूर्खपणाचें आहे."

त्या बंधुद्वयांनीं विचार केला कीं आपल्याला वाटखर्चापुरते पैसे जरी मिळाले तरी पुरे आहेत. म्हणून जेथें ते घराचें बांधकाम करीत होते तेथें जाऊन त्यांनीं त्या घराच्या मालकाला वाटखर्चासाठीं पैसे मागितले. त्या मालकावर विश्वासून आतांपर्यंत त्यांनीं पैशाची उचल केली नव्हती. मालक म्हणाला, "आधीं बांधकाम पुरें करा मग पैसे मिळतील. तोंपर्यंत पंढरीस जाऊं नका."

हे ऐकून ते घरीं आले. दुसरीकडून पैशाची तजवीज लावून ते कोणालाहि न सांगतां मध्यरात्रीं पंढरीला निघून गेले.

इकडे पांडुरंगानें त्यांचीं रूपें घेतलीं, आणि ते त्यांच्या घरीं राहिले. यामुळें त्या बंधूंची अनुपस्थिति कोणासहि जाणवली नाहीं. त्या घर-मालकाचें बांधकाम त्यांनीं-म्हणजे पांडुरंगानें-पुरें केलें. मालक खूष झाला. मालकानें बांधकामाचा हिशेब करून सर्व पैसे देऊन टाकले. मालक म्हणाला, " मी तुमची वारी चुकविली पण माझें बांधकाम मात्र पुरें झालें. आतां तुम्हीं खुशाल वारी करीत जा. मी तुम्हाला पैसे देईन."

ते बंधू म्हणाले, " तुमच्या पैशाची आम्हाला गरज नाहीं. पांडुरंग आमची उपेक्षा करणार नाहीं.तो आम्हांला गरज लागली म्हणजे वेळेवर पैसे देतो."

असें म्हणून ते बंधू आपल्या कामाचे पैसे घेऊन घरीं आले. त्या पैशां-तून मुलांना दागदागिने केले. कपडे शिवले. घरांत आनंदीआनंद झाला.

खरे जळोजी-मळोजी पंढरीस जाऊन त्यांनीं विटेवरील परब्रह्माचें दर्शन घेतलें. ते म्हणाले, " पांडुरंगा तुझी वारी चुकत होती रे. लोकांनीं मोडा घातला होता, पैशाची अडचण होती पण तुझ्या कृपेनें आम्हीं येथें येऊं शकलों आणि आम्हांला तुझ्या दर्शनाचा लाभ झाला. आतां येथेंच राहून रोज तुझें दर्शन घेत जावें असें वाटतें."

ते बंधु चार महिने पंढरपुरांत राहिले. तोपर्यंत पांडुरंग मात्र त्यांच्या घरीं नाहीं नाहीं तीं कामें करीत होता. जळोजी-मळोजी मात्र पंढरपुरांत भजन-पूजनांत संपूर्णपणें रंगून गेले होते. त्यांना घरादाराची शुद्धि नव्हती.

पंढरींत हे बंधु एके दिवशीं निद्रिस्त असतां त्या दोघांच्या स्वप्नांत रुक्मिणीमाता आली आणि त्यांना म्हणाली, " तुम्हीं आतां आपल्या घरीं जाऊन आपल्या कामधंद्याला लागा आणि नंतर आपल्या मुलांबाळांना घेऊन येथें राहावयास या."

ते जागे होऊन पाहतात तों त्यांना कोणीच दिसेना. दोघांना एकच स्वप्न पडलेलें पाहून त्यांना फार नवल वाटलें आणि स्वप्नांत रुक्मिणी-मातेचा आदेश मिळाल्याप्रमाणें ते आपल्या घरीं आले.

त्यांनी आपल्या अंगणांत पाऊल ठेवतांच पांडुरंग अदृश्य झाले. हे बंधुद्वय घरांत जाऊन पाहतात तों सर्व बायकामुलें दागिन्यांनीं नटलेली दिसलीं. दागदागिने आणि रेशमीं जरीचीं वस्त्रें पाहून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. शिवाय धनधान्याची विपुलता पाहून ते तर भांबावूनच गेले. तुम्ही पंढरीहून केव्हां आला अशी कोणीहि चौकशी केली नाहीं. इतकें ऐश्वर्य एकाएकीं कसें आलें हेंहि त्यांना कळेना. ज्या घराचें काम अर्धवट राहिलें होतें तिकडे ते गेले तेव्हां त्या घराचें काम पुरें झालेलें त्यांना दिसलें. जळोजी म्हणाले, "आम्हीं पंढरीहून आतांच आलों पण आमची विचारपूस कोणीच केली नाहीं. शिवाय आपलें हें घर बांधलें कोणी हेंहि आम्हांला कळत नाहीं."

मालक म्हणाला, "मी तुमची वारी चुकविली म्हणून तर तुमच्या हातून हें घर पुरें बांधून झालें. तुम्हीं पंढरीला गेलां असतां तर घराचें बांधकाम अर्धवटच राहिलें असतें. तुम्हीं रोज माझ्याकडे कामाला येत होतां; काम संपल्यावर हिशेब करून आपले सर्व पैसे घेऊन गेलांत आणि आतां सांगतां की 'आम्हीं पंढरीहून आतांच आलों' आणि मला विचारतां की घर कोणी बांधलें. तुम्हीं वेडाच्या भरांत कांहीं तरी बरळत आहांत असें मला वाटतें."

मालकाचें हें बोलणें ऐकून खरोखरच आपल्याला भ्रम झाला आहे काय अशी त्या सुतार बंधूंच्या मनांत शंका आली. त्यांना सर्वच प्रकार विचित्र वाटला. ते मुकाट्यानें आपल्या घरीं निघून आले.

नंतर त्यांनी चौकशी केली. घरच्या माणसांनीं त्यांना सांगितलें, "तुम्हीं रोज घर बांधण्याचें काम करीत होतां. घर पुरें झाल्यावर तुम्हीं मालकाकडून पैसे आणलेत, दागदागिने केलेत, आणि धान्य आणून साठविलेत. असें असतां, तुम्हीं पंढरीला गेलों होतो असें कां म्हणतां हेंच आम्हाला कळत नाहीं."

जळोजी-मळोजींनी विचार केला, "आपण तर चार महिने पंढरींत घालविले, आणि येथील माणसें म्हणतात कीं आपण येथेंच होतो.. आपण येथें नव्हतों असें म्हणावें तर येथें एक घर बांधण्याचें काम आपण अर्धवट सोडून गेलों तें घर पुरें बांधून झालें आहे आणि त्याचे पैसे आम्हांला दिले आहेत असें मालक स्पष्ट म्हणत आहे. अर्थात् तें म्हणणें खोटें आहे असें म्हणण्याला जागा नाहीं. घरांतील माणसांनाहि खोटें बोलण्याचें कांहीं कारण नाहीं. या सर्व गोष्टींवरून आपण पंढरींत होतो आणि येथेंहि होतों हें उघड दिसतें. यावरून पांडुरंगानें आपलीं रूपें घेऊनच आपल्यासाठीं कष्ट केले असले पाहिजेत यांत संशय नाहीं."

आपल्यासाठीं पांडुरंगाला राबावें लागलें याबद्दल त्यांना अत्यंत वाईट वाटलें.

घरांत सर्व गोष्टींची समृद्धि पाहून तें सिद्धीचें लक्षण आहे असें त्यांना वाटलें. परमार्थाच्या मार्गांत सिद्धि विघ्नें आणीत असतात हे त्यांना माहीत होतें. म्हणून उपाधीचीं बंधनें तोडून टाकण्याचा त्यांनीं विचार केला. त्यांनीं ब्राह्मणांना बोलावून आणलें आणि त्यांच्याकडून आपलें घर लुटविलें. घर पूर्वीच्या स्थितींत असलेलें पाहून मगच त्यांनीं घरांत प्रवेश केला. त्यांनीं त्यांच्याकडे असलेल्या वतनाची व्यवस्था लावली आणि नंतर घरच्या मंडळींना घेऊन ते पंढरीला गेले, आणि तेथें कायमचे राहिले. मग मात्र त्यांनी तें पुण्यक्षेत्र कधींहि सोडलें नाहीं.

ते उभयतां बंधू पंढरपुरांत वास करीत असतांना बाजीराव रघुनाथ हे विठ्ठलाच्या दर्शनाला आले. हे बंधु जगाच्या उद्धारासाठींच भूतलावर अवतरले आहेत आणि त्यांचें वैराग्य फार वाखाणण्याजोगें आहे असें बाजीरावाला समजलें. तेव्हां बाजीरावांनीं त्यांना बोलावून आणण्याबद्दल आपल्या नोकरांना सांगितलें. नोकर त्यांना बोलावण्यास गेले असतां ते पळून गेल्याचें त्यांना आढळलें. ते वनांत कोठे तरी लपून बसले होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
महिपति ताहराबादकर व इतर
अनुक्रम ............ वि: ....................
क्रमांक ... ...................

वाजीरावाच्या नोकरांनी परत येऊन, जळोजी-मळोजी ... पळून जाऊन वनांत कोठें तरी लपून बसल्याचें सांगितलें.

ते म्हणाले, " सरकार, त्या दोघां भावांच्या वैराग्याची लोक फार वाखाणणी करतात. त्यांनीं आपलें स्वतःचें घर लुटविलें आणि ते पंढरींत येऊन राहिले. ऐश्वर्याला भिऊन ते दूर पळतात. "

मग बाजीरावानें त्यांची परीक्षा पाहण्यासाठीं ते ज्या ठिकाणीं भजन करीत त्याजागीं एका थाळींत मोहरा भरून नेऊन ठेवल्या. जळोजी-मळोजींनीं रात्रीं तेथें दिवा लावला तेव्हां त्यांना तेथें मोहरा असलेली थाळी दिसली. ती पाहून ते म्हणाले, " हें काय आपल्या भजनांत विघ्न आलें? "

त्यांनीं नंतर त्या मोहरांवर राख घातली आणि ती रस्त्यावर नेऊन टाकली. नंतर त्यांनीं ती जागा शेणानें चांगली सारवून घेतली. अशा तऱ्हेचें त्यांचें तीव्र वैराग्य पाहून लोक चकितच झाले. बाजीरावांना तो वृत्तांत समजल्यावर त्यांनाहि मोठा विस्मय वाटला.

एके दिवशीं पंढरींत वासकरांचें कीर्तन होतें. मळोजी तें ऐकावयास गेले होते. वासकरांनीं कीर्तनांत सांगितलें कीं जे वारकरी पंढरींत सतत राहतात पण आळंदीला जाऊन ज्ञानेश्वरांचें दर्शन घेत नाहींत त्यांचें तोंड कोणीहि पाहूं नये. हें ऐकून मळोजी फारच खिन्न झाले, कारण ते कधीं आळंदीला गेले नव्हते. घरीं जाऊन ते जळोजीला म्हणाले, " आपण येथें बरेच दिवस राहिलों. एकदां आपण आळंदीला जाऊन ज्ञानराजाचें दर्शन घेऊन येऊं. "

त्या बंधूंनीं वासकरांना विचारलें, " आपल्या म्हणण्याला कांहीं आधार आहे काय? आमचा देह पंढरींत ठेवण्याचा विचार होता. "

जळोजी म्हणाले, " आपल्या आज्ञेप्रमाणें मी असा विचार केला आहे कीं मी आपल्या कीर्तनांतच देह ठेवावा आणि नंतर लिंगदेहानें आळंदीला

जाऊन ज्ञानेश्वरांचें दर्शन घ्यावें व पुन्हां पंढरींत यावें. नंतर माझा पार्थिव देह चंद्रभागेवर नेऊन त्याची पुढील व्यवस्था व्हावी. देहपातानंतर जर पुन्हां माझ्या देहांत चेतना निर्माण झाली तर आळंदीला जाऊन मी ज्ञानेश्वरांचें दर्शन घेऊन आलों असें समजा. निधनानंतर माझ्या शरीरांत जीव आला नाहीं तर दर्शन घडलें नाहीं असें समजा."

जळोजी म्हणाले त्याप्रमाणेंच सर्व गोष्टी घडून आल्या. जळोजींनीं कीर्तनांत आपला देह ठेवला, आणि थोड्या वेळानें ते उठून बसले आणि म्हणाले, "मी आपला सेवक आहे. आपल्यामुळें मी कृतार्थ झालों आहे. हे पांडुरंगा तुझ्या चरणांची अद्भुत कीर्ति आहे. तूं आमच्यासाठीं सगुण रूप घेऊन श्रमलास. तूंच आम्हां भक्तांचा महिमा वाढवितोस. आतां तुझ्या चरणांचा आसरा द्यावा एवढेंच तुला मागणें आहे तें पुरें कर. तूच आमचा विसावा आहेस. पांडुरंगा आतां कृपा कर." असें म्हणून जळोजी स्तब्ध झाले. त्यावेळीं त्यांच्या देहांतून जीवनज्योति गेलेली सर्वांच्या दृष्टीस पडली. त्यांचें शेवटचें दर्शन घेण्यास लोक धांवून आले.

जळोजी गेलेले पाहून त्यांचे बंधु मळोजी मूर्च्छित पडले. तेथें माणसांची खूप गर्दी जमली होती. त्या माणसांनीं त्यांची समजूत घातली. मळोजी शोकाकुल होऊन म्हणाले, "हे बंधुराया, असा प्रकार कधींच घडला नव्हता. आजपर्यंत तूं कधींच भेदभाव केला नाहींस. मग आजच मला टाकून कसा गेलास? मला आणि सर्व बायकामुलांना नेण्याचें सामर्थ्य तुझ्यांत नव्हतें का? मी तरी तुझ्याबरोबर येण्यास तयार असतांना तूं एकटाच कसा गेलास? मला वाटलें होतें कीं तूं आपल्या भावाला टाकून जाण्याइतका निष्ठुर होणार नाहींस" असें म्हणून त्यांनींहि आपला देह आपल्या बंधूच्या देहाजवळ ठेवला. दोघांनीं जवळ-जवळ एकाच वेळीं मृत्यूलोकांतून प्रयाण केलें आणि ते वैकुंठवासी झाले.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वामित्व.
अनुक्रम ................... दि: ...................